# प्रस्तावना

श्री. बी. एल. सामंत, माझे वडील ह्यांचा आयुष्याची ही रोचक कहाणी.

कोकणातल्या एका छोट्या गावात जन्म झाल्यापासूनचा हा प्रवास परुळे, बेळगाव, कोल्हापूर ते मुंबई आणि अनेक गावा शहरातून आपल्याला ते त्यांच्याबरोबर घडवतात. आपण त्यांचं लिखाण त्रयस्थ म्हणून वाचत नाही, तर सहप्रवासी म्हणून अनुभवतो. त्यांची सुख–दुःख, त्यांचे राग, आनंद आपले होतात.

त्यांच्या निधानानंतर हा ठेवा हातात पडला. कदाचित तो तसाच पडावा ही त्यांची इच्छा असावी. ही जेवढी त्यांची कहाणी आहे, तेवढीच त्यांच्या कुटुंबाची सुद्धा कहाणी आहे. कहाणीचे हीरो ते असले तरी सहप्रवासी सुद्धा तेवढेच महत्त्वाचे असतात. त्यांच्या आयुष्याचा प्रवास एका टप्प्यात आव्हानात्मक होता. त्यात कष्ट खूप होते आणि यशाचा मार्ग व खात्री दोन्ही नव्हते. सुखावर जास्त भाष्य नाही आणि त्यामुळेच हे लिखाण मनाचा ठाव घेतं. एका सामान्य कौटुंबिक माणसाची असामान्य कहाणी बनते, मनाला भिडते...

“ सर्व सुखी कुटुंबाचं सुख (कथा) सारख्याच प्रकारचं असलं तरी प्रत्येक दुःखी कुटुंबाचं दुःख (व्यथा) वेगवेगळं असतं.”

- लीओ टॉलस्टॉय

# अनुक्रमाणिका


१. माझी माती माझी माणसं
२. पूर्वज
३. मळगावचं आमचं घर आणि दुकान
४. बाबा, आजी आणि शेती
५. आजी
६. नातेवाईक व आठवणी
७. मळगाव
८. मुक्काम पोस्ट परुळा
९. आमचे मामा ज्यांच्याशी जिव्हाळा
१०. भाई
११. बालपण व शाळा
१२. पडझडीचा काळ
१३. शिक्षणाचा प्रवास
१४. कॉलेज
१५. बेळगाव
१६. बेळगावच्या आठवणी
१७. माई एक परिपूर्ण व्यक्तिमत्व
१८. कोल्हापूर
१९. मुंबईच्या महासागरात उडी
२०. मुंबईचे दिवस
२१. कुडाळ
२२. अमरावती
२३. आठवणी एक कृतज्ञता
२४. माझे बाबा

## ।। श्री वेतोबा प्रसन्न ।।

अनेकदा एकांतात आपण माणसे आपल्या आयुष्याचा चित्रपट पहात असतो. कुठूनही त्या चित्रपटाची सुरुवात होते. त्या चित्रपटात आपले असे फार थोडे असते. जणु काही अनेकांनी आपल्या आयुष्याचा चित्रपट प्रकाशमय केलेला असतो. त्यात एखाद्या फुलाचा वास दरवळत असतो. एखादं हिरवंगार गवताचं पान डोकावत असतं. कुणीतरी द्वेषाचा झेंडा घेऊन अनुयायी गोळा करणारा डोळ्यापुढे येतो. एखादा विषारी साप मधे मधे डोकावत असतो आणि कधी प्रकाशाची जागा अंधाराने पण व्यापलेली असते.

हल्लीच मी मळगावला म्हणजे माझ्या गावी गेलो होतो. संध्याकाळी सुलुच्या (मामेबहीण) खोलीवरून परतताना भास्कर-मेरीच्या घराजवळून दत्ताच्या देवळात येत होतो आणि एक धक्काच बसला. तिथे ते वडाचं झाड नव्हतं. त्याचं समूळ उच्चाटन. ह्या झाडाशी माझ्या किंबहुना भाईच्या (माझ्या मोठ्या भावाच्या) स्मृती पण निगडीत आहेत. तो ऋषीतुल्य वड अनेकांची सुखदु:ख, खरीनाटकं पहाणारा. शेकडो पक्ष्यांचं वसतिस्थान उद्ध्वस्त झालं होतं आणि आता आयुष्यातल्या स्मृती जाग्या व्हायला लागल्या. 'A man lives in his childhood and that is his material.'

माझ्या बाबांनी केलेल्या टिपणावरून आणि शाळेच्या दाखल्यावरून मी आजोळी म्हणजे परूळ्याला दि. ५ ऑक्टोबर १९३७ ला दुपारी जन्मलो. माझ्या जन्माचा दिवस आईला चांगला आठवतो व ती ह्या उत्सवातील दिवसाचं रसभरीत वर्णन करीत आली आहे. मी माझ्या आई-वडिलांचं तिसरं आपत्य. पहिला भाई म्हणजे - बाळकृष्ण. ह्याचा जन्म ५ मार्च १९३३ ला झाला. त्यानंतर काशीबाई ऊर्फ बेबी. हिचा जन्म १९३६ मधे झाला. मी माझे आजोबा म्हणजे बाबांचे वडील, श्री बाबुराव लक्ष्मण सामंत ह्यांच्या मृत्युनंतर लगेचच जन्माला आलो. कुटुंबाच्या रिवाजाला अनुसरून माझं नाव बाबुराव - म्हणजे मला आजोबांचं नाव ठेवण्यात आलं. मला आजोबांच्या पेट नावाने म्हणजे ''दादा'' - पण म्हणतात. ह्या माझ्या नावात आमच्या कुटुंबाचा मागासलेपणा डोकावतो म्हणून कित्येकवेळा मी उदास झालो आहे. श्री. दादा तेंडोलकरांनी माझ्या टिपणावरून पत्रिका व कुंडली करताना - माझं नाव पंढरीनाथ असं कुंडलीत लिहून घेतलं.

•••

# पूर्वज

माझे पणजोबा हे मणेरीला होते असं सांगतात. मणेरी हे गाव गोव्याच्या सीमेवर आहे. ते मी पाहिले आहे. आम्हाला सबंध गावात मणेरकर म्हणून ओळखतात. आमचं भटकं कुटुंब मूळचं गोव्याच्या सीमेवरच असावं, कारण मणेरीवरून नंतर हे कुटुंब आरोंदा – म्हणजे परत गोव्याच्या सीमेवर आलं होतं.

माझ्या –आजोबांबद्दल अगदी त्रोटक माहिती उपलब्ध आहे. आमच्या घरात वंशावळी वगैरे काही लिहून ठेवलेली नाही. मी जे काही ऐकलं आहे त्यावरून माझे आजोबा सावंतवाडी संस्थानात नोकरीला होते. मला वाटतं त्यांचं शिक्षण वगैरे जास्त झालं नसावं. ते दफ्तरदार म्हणून काम करीत असायचे व एक दिवशी त्यांचा कुठेतरी अभिमान डिवचला म्हणून – ''हाच माझा राजीनामा'' समजावा असं करून तडकाफडकी त्यांनी नोकरी सोडली. त्यांचं आरोंद्याला हॉटेल होतं व नंतर ते मळगावला आले.

मळगावात आमचे घर गोसावी वाड्यात विठ्ठलाच्या देवळाशेजारी होतं. शांतुबुवांनी ही आमच्या गोसावी वाड्यातली घराची जागा अनेकवेळा मला दाखविली आहे. मळगावच्या गोसाव्यांना सावंतवाडी संस्थानाने गोसावी वाडा हा इनाम म्हणून दिला होता. हे सगळे गोसावी वारकरी पंथाचे व आम्हाला ते त्यांचे भाचे म्हणून ओळखतात. सावंतवाडी संस्थानिकांनी ह्या गोसाव्यांना म्हणजे आमच्या जातवाल्यांना दहा एकर जमीन दिली होती. तिथे ५/६ गोसाव्यांची कुटुंबे आहेत व त्यांचे विठ्ठल मंदिरही आहे. त्यांचा मूळ पुरुष – गोपाळ बोध बुवा ह्यांची समाधीही आहे. ही समाधी फार जुनी आहे व त्यांनी ती ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणे जिवंत समाधी घेतली आहे. आम्ही त्यांना मानतो.

आजोबा गोसावी–कीर्तनकारांबरोबर सदैव असत. ते विठ्ठलाचे भक्त होते व त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी आरोंदा सोडून मळगावात घर व हॉटेल थाटलं. म्हणून गोसावी वाड्यात विठ्ठल मंदिराबरोबर इतर गोसाव्यांप्रमाणे आमचंही घर होतं.

सावंतवाडी–शिरोडा–वेंगुर्ले रस्त्यावर भाड्याच्या घरात चहा–भजांचे हॉटेल बाबा, आजी, आत्या सगळी मिळून चालवत असत. सध्या शाळेच्यासमोर जिथे पोस्ट ऑफीस आहे, तिथे आमचं हॉटेल होतं. अर्थात ही भाड्याची जागा होती.

आजोबांना आणखी एक भाऊ होता व त्याचं नाव भिकाजी. आजोबांचे बंधु भिकाजी, हे मॅट्रीक झाले होते व ते मुंबईला नोकरी करीत होते. त्यांनी लग्न केलं नव्हतं व ते लवकर वारले.

आमच्या आपाचं (धाकट्या भावाचं) नाव आजीने आग्रहास्तव भिकाजी ठेवलं. मला आठवतं त्याला इतिहास पण आहे आणि कारण पण. आईची आपा पूर्वीची दोन मुलं जगली नव्हती – त्यात एक शशिकांत नावाचा मुलगा होता. म्हणून आजीने ह्या नावाचा आग्रह धरला होता. एक दिवस मला काहीतरी हुक्की आली. मी आईला बोललो की आपाला आपण 'दिवाकर' म्हणून हाक मारूया. मला हे नाव बाबुराव परुळेकरांच्या मुलावरून सुचलं व आपाला एक चांगलं नाव असावं असं मला वाटायला लागलं होतं. आईने त्या दिवसापासून लोकांशी बोलताना विशेषत: परुळ्याच्या मामांशी आणि वेंगुर्ल्याच्या काकीशी बोलताना 'दिवाकर' हेच नाव पॉप्युलर केलं.

माझी आजी मातोंडची. मातोंड हे गाव मळगावपासून ६/७ मैलावर आहे. आजीचे नातेवाईक म्हणजे चुलत भावंड तुळशीला राहत असत. आजी ही आडनावाने मातोंडकर. तिच्याबद्दल जास्त माहिती उपलब्ध नाही. पण तुळसकर कुटुंबाशी आमचे घनिष्ठ संबंध होते. समस्त तुळसकर कुटुंबीय आमच्या घरी येत असत. आजी त्यांचे मायेने स्वागत करीत असे. ही सगळी लोकं रंगाने काळी होती. तुळशीचा जैतीर हा सण प्रसिद्ध आहे. आजी ह्या सणाला कित्येकवर्षी जात असे. मला वाटतं आजीबरोबर भाई पण ह्या सणाला गेलेला आहे.

आजीला एकूण ४ मुली. बाबा हे एकुलते एक पुत्र रत्न. त्यात साळगावची आते सर्वात थोरली, त्यानंतर झारापीची आते व नंतर तेंडोलीची व शेवटची मळगावची म्हणजे मंजू आते जी बामणआळीला दिली होती. साळगावच्या आतेचं नाव मला माहीत नाही व मी तिला कधीच पाहिलंही नाही. झारापीच्या आतेचं नाव भीमा, तेंडोलीच्या आतेचं नाव काशी व बामणअळीच्या आतेचं नाव मंजू – बहुतेक मंजुळा.

•••

## मळगावचं आमचं घर आणि दुकान

आई–बाबांचं लग्न बहुतेक १९३१/३२ सालातलं असावं. मंजू आतेचं लग्न बाबांनी व आईने केलं. – त्याअर्थी मंजू आतेच्या लग्नाच्या वेळी आजोबा जिवंत नसावेत. मला वाटतं आईच्या लग्नानंतर दोन–तीन वर्षात आजोबा वारले असावेत व आतेचं लग्न १९३५–३६ च्या दरम्यानचं असावं. आतेच्या लग्नाच्यावेळी आमचं सध्याचं घर नव्हतं असं ऐकलं, त्या अर्थी आमचं घर १९३६/३७ मधे बांधलं गेलं असावं. बाबांना घर बांधण्यासाठी आपा – म्हणजे सासऱ्याने रुपये दोनशेची मदत केली व बाबांनी ही जमीन सुमारे एक एकर विकत घेऊन एका महिन्यात आमचं सध्याचं घर उभं केलं.

संबंध मळगावातील ही एकमेव मोक्याची जागा. इथे बाबांनी घर तर बांधलच पण आपलं किराणा मालाचं दुकान पण थाटलं. घराच्या मागच्या बाजूला सुंदर शेतीवाडी तयार केली. त्यापूर्वी आमच्या घराण्यात कायम स्वरूपाचे असे घर नव्हते. बाबांच्या पूर्वी आमच्या पिढ्यान् पिढ्या एक भटकं जीवन जगत होते. बाबांनी आपली स्वतंत्र वास्तू निर्माण केली व ह्या भटकणाऱ्या कुटुंबाला स्थैर्य देण्याचं महान कार्य केलं. थोडं अंतर्मुख होऊन विचार केला, काही लोकांशी तुलना केली तर ह्या बाबांच्या महान कार्याचं महत्त्व पटेल. हे त्यांनी त्यांच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी केलं.

त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीला अनुसरून बाबांचे शिक्षण अगदी बेताचं झालं होतं. बाबांचे शिक्षण इंग्रजी १ पर्यंत बस! पण त्यांची सोयरीक कोकणातल्या एका नामांकित आणि मातब्बर घराण्याशी झाली होती व ह्याबद्दल सगळ्यांना अभिमान होता.

आमचं दुकान सुद्धा दृष्ट लागण्यासारखं चाललं होतं. त्यात वेंगुर्ल्याहून बैलगाडीने माल येत होता. गुळाच्या ढेपी, तेलाचे डबे, साखरेची पोती, शेंगदाण्याची पोती, रताळी, तांदूळ, मीठ, नारळ ह्यांनी बाहेरचा ओटा सदैव भरलेला असायचा. हे मी अनुभवलं आहे. सुमारे १९४३ सालाच्या नंतरचा काळ मला आठवतो.

घर बांधल्यावर व किराणा दुकान थाटल्यावर बाबांनी मागीलदारच्या जमिनीत लक्ष घातलं. त्यात आंब्याची कलमं, फणस, काजू, शेवग्या, जांभळी ही झाडं तर लावलीच पण त्याचबरोबर आईन, किंदळ, नरम, बांबू ह्यासारख्या झाडांची सुद्धा लागवड केली व सतत पाणी मिळावं म्हणून विहीर खोदली. घराच्या मागे मांगर बांधला. गायी विकत घेतल्या. घराच्या आजूबाजूला केळी, पपया, पपनस ह्यांची झाडं लावलीच, पण मोगरा, जाई, जुई, अबोली, कृष्णकमळ, कोरांटी, तुळशी ह्यासारखी सदैव फुल देणारी रोपटी पण लावली.

बाबा हे व्यापारी कधीच नव्हते. कारकून तर मुळीच नाही. ते एक निसर्ग वेडे सदान्‌कदा निसर्गात रमणारे होते. कवी नव्हते पण रसिकता नक्कीच होती.

बाबा व आजी यांनी अक्षरश: रात्रंदिवस राबून त्या ओसाड जागेचं नंदनवन केलं होतं. एका रांगेत ४ हापूसची कलमं लावली होती. विहीरीजवळ व मांगराच्यामागे मिळून तीन पायरीची कलमं लावली होती. त्याशिवाय मानकुरादाची दोन कलमं व एक अल्फान्सो आंब्याचे कलम लावलं होतं. घराच्या मागे पपनसाचं प्रचंड झाड होतं. घराच्या उजव्या बाजूला एक प्रचंड काजूचं झाड होतं. त्याशिवाय विहीरीला लागून पाच सहा काजूची झाडे होती. पावसाळ्याच्या सुरुवातीला सगळे कुणगे, जवळ जवळ १४ कुणग्यांचं आमचं शेत होतं, ते आजी स्वत: कुणालातरी मदतीला घेऊन झाडत असे. गोळा केलेला पाला पाचोळा जाळायचं काम नंतर चाले. उन्हातान्हातही हा जाळ चालू असताना आजीबरोबर अनेकवेळा मी उभा असे. कारण कलमांना जाळ पोहोचू नये याची काळजी घ्यावी लागे. जमिनीची मशागत करताना आजीचा कटाक्ष असे. प्रत्येक तण जळला जावा कारण नंतर पावसाळ्यात कुणग्यात भाताची पेरणी आम्ही करत असू. पंढरीबुवा हा कलम करण्यात वाकबदार होता. तो कलम करताना, बाबांबरोबर मी तासन्‌तास उभा असे. १९४५ नंतर सगळी कलमं थोडे थोडे आंबे द्यायला लागली. मग एप्रिल-मेच्या दरम्यान बाबा हापूस आंब्याची पिशवी भरून परुळ्याला सायकल घेऊन आजोबांना आंबे घेऊन जात.

पावसाळ्यात आम्ही दुसऱ्याकडून जमीन नांगरून घेत असू. जमीन नांगरण्याचं काम पहिल्यांदा नारायण गावकर म्हणजे अनंत गावकराचे वडील करीत असत. नंतर आत्माराम गावकर, अनंत गावकर, दत्तू नाईक व काहीवेळा गंगाराम न्हावी यांनी पण आम्हाला नांगरणी करून दिली आहे. धो धो पावसात रव उपण्याचं काम आम्ही करीत असू. आजी ह्या काळात भयंकर कष्ट करी. अनंत गावकराला वगैरे मग कोंबडीचं जेवण आम्ही घालत असू.

पावसाळ्यात बाबा व आजीचा दुसरा कार्यक्रम म्हणजे भाजी लावणे. ह्यात दारासमोर पडवळ, मागच्या बाजूच्या शेतात दोडकी, घोसाळी, भोपळा, काकडी ह्याची लागवड होत असे. करांदे हे बाबांचं आवडतं खाद्य म्हणून करांद्याची लागवड एका वाफ्यात करीत असत. त्याचप्रमाणे कणग्या, हळद, दिवाळीला मळणी. भात कधीच १ खंडीच्यावर म्हणजे दीड दोन पोत्यांच्यावर पिकला नाही. पण करांदे मात्र दोन तीन टोपल्या मिळत. कणग्या जवळ जवळ आम्हाला भरपूर खायला मिळत. हळद थोडीशी मिळे. ह्यापैकी एकही वस्तू विकण्यासाठी नसे. बाबांचा हा एक छंद होता.

फणस म्हणजे बाबांनी लावलेले असे खूप होते, पण १९४८ पर्यंत विशेष असे लागत नसत. आमचा दारातला फणस मात्र आम्हाला प्रचंड फणस देत असे व ह्याचे गरे मधूर असत. एप्रिल-मे मध्ये कधीतरी घमघमाट सुरू होई. मग कोणीतरी फणस पिकल्याची वर्दी देई. मग दत्तू नाईक, काका न्हावी किंवा अनंत गावकर हा फणस उतरून देत असत. हा फणस असल्याने आमचा भाजीचा प्रश्न त्या दिवसात सुटलेला असायचा. त्या फणसाशी माझ्या अनेक स्मृती निगडीत होत्या.

आम्हाला आमच्या झाडापासून जवळ जवळ दोन डबे काजू मिळत असत. हे काजू आम्ही कुणग्यात वाळत ठेवत असू. आमच्या शेजारी बायला म्हणून एक बाई राहात असे. ही कधी कधी दुपारच्या वेळी आमची नजर चुकवून काजू घेऊन जात असे. मग आमची बेबी तिची चंपी काढत असते.

बायला ही एक आमच्या कामाला उपयोगी पडणारी व माझ्यावर माया करणारी आमची शेजारीण. ही तशी निराधार होती. मला ती ''दादा'' (आमच्या आजोबांचं

नाव) म्हणायची. नेहमी कडेवर घेऊन आपल्या खोपटात घेऊन जात असे. तिच्याबद्दलच्या आठवणी अगदी हृद्य आहेत. ती मी बेळगावला असताना वारली. पण एक लाघवी व्यक्तिमत्व.

बाबा थंडीत मिरची, कांदे, मुळा ह्याची विहिरीजवळ लागवड करत. साधारण दिवाळी नंतर विहिरीवर ते लाठं घालण्याचं काम अनंत गावकरकडून करून घेत असत. हे एक जोखमीचं काम असायचं. मग आजीचं काम सुरू व्हायचं. मग मिरचीची रोपटी व कांद्याची झूल गावकरांच्या शेतातून आणून ती लावीत असे. हा खरोखर नको तो व्याप असायचा. यात कधीच आम्हाला एक पायली पेक्षा जास्त मिरची मिळाल्याचं आठवत नाही. पण हा एक आजीचा विरंगुळा आणि बाबांचा अव्यापारेषु व्यापार बस!

ह्या व्यतिरिक्त बाबा रानात-डोंगरात जाऊन प्रचंड वृक्ष तोडत व लाकूड आणत. लाकूड आम्ही जळणासाठी तर वापरत असूच पण बाबा मुद्दाम वासे आणण्यासाठी जंगलात जात असत. हे वासे मांगराच्या पाडव्यांना लागत व कलमांना टेकू देण्यासाठी पण लागत. कलमाची फांदी खाली वाकून मोडू नये म्हणून पावसाळ्यात टेकू देण्याचं काम पाळ, कोयता पहार घेऊन मी बाबांबरोबर करीत असे. बाबा पहाटे उठून रानात जात असत.

बाबांचा दुसरा आवडता छंद म्हणजे मासे गरवणे. ह्यात सावंतवाडीचे एक दोन ख्रिश्चन असायचे. जेवल्यावर गांडूळ जमा करायचं काम मी व राजाने (धाकटा भाऊ) अनेकवेळा केलेली आहे. सांड पाण्यात, घाणीत हे गांडूळ मिळत असत. फावडा करवंटी घेऊन आम्ही घाण उकरून गांडूळ गोळा करून एका करवंटीत जमा करीत असू. मग ती करवंटी मातीने गच्च करीत असू. हे आमिष घेऊन बाबा कधीतरी दुपारी उफालीत किंवा वेत्याच्या बांधावर अगर निरवड्याच्या पुलावर गरवायला जात. उफालीत डेमके सापडत, बांधावर काड्या किंवा ढिगुर आणि निरवड्याच्या पुलावर वाळये, मरल हे मोठे मासे मिळत असत. आमच्या घरातल्या कुणाही व्यक्तीने म्हणजे बाबा सोडून हे मासे कधीच खाल्लेले नाहीत. बाबांना हे मासे आवडत. मी व भाई जर गरवायला गेलो तर गरवलेले मासे कुणालातरी देऊन टाकत असू. पण गरवण्याचा आनंद भरपूर उपभोगीत असू. थोड्या प्रमाणात आम्ही हा छंद आत्मसात केला होता.

बाबा हे फुलांचे शौकीन होते. दरवेळी सावंतवाडीहून येताना न विसरता आईसाठी फुलं आणीत असत. मग त्यात सोनचाफा असेल, सुरंगी असेल, केवडा असेल किंवा बकुळीची फुलं. सावंतवाडीहून आल्यावर घरात फुलांचा घमघमाट सुटत असे.

आमच्याकडे सुरुवातीला एक गाय होती. आईचं काम म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी तिचं दूध काढणं. दुसरं आईचं काम उत्कृष्ट स्वयंपाक करणे. गाईचं दूध काढणं व बाईच्या म्हणजे दत्ताच्या देवळाजवळच्या विहिरीवर जाऊन एक घागर (आंघोळ केल्यावर) पाणी आणणं. हे पाणी देवाच्या पूजेसाठी असायचं. येताना विहिरीवरील पारिजातकाची फुलं आणणं. दादा खानोलकरांच्या घराच्या अंगणात एक छान पारिजात होता. बाकी गावात पारिजातकाचं झाड कुठेही नव्हतं. देवासाठी पाणी आणल्यावर गंध उगाळणं हे पण आईचच काम.

बाबा संध्याकाळी वासराला घेऊन गाईजवळ उभे असायचे व आई दूध काढायची. कुठे दिवसाला अर्धा पाऊण शेर दूध मिळत असावं. अर्थात सकाळी वेंगुर्लेकर आम्हाला आपल्या म्हशीचं दूध द्यायचा. रात्री दुधाची खरवड खाणे मला आवडायचे. भाई घरी असेल त्यावेळी तो हे खायचा.

●●●

## आजी

गुरांसाठी चारा कापून आणणं हे आमच्या आजीचं महत्त्वाचं काम असायचं. ह्या चाऱ्यासाठी ती वणवण भटकायची. अक्षरश: तहान भूक विसरून. आणि चारा एवढा साठवायची की मांगराच्या दोन्ही बाजूच्या पडव्या चाऱ्याने नेहमी भरलेल्या असायच्या. घरात जेवण झालं तरी तिला भान नसायचं. मग मी तिला शोधायला तळीवर किंवा डोंगराच्या पायऱ्यांपर्यंत जायचो व शोधून आणायचो. पावसाळ्यात तिला शोधणं हे एक जिकीरीचं काम असायचं. पण आजी चारा काढताना इर्ल घेऊन जात असे. मग शेतात कुठे इर्ल घेऊन काम करणारं दिसलं म्हणजे मी जवळ जाऊन हाक मारायचो.

गाईचं शेण जमा करण्यासाठी मांगराच्या मागच्याबाजूला एक गायरी केली होती. हे गाईचं शेणखत म्हणून माडांना घालणे किंवा शेणी करण्यासाठी आजी वापरत असे. आजीच्या जिवंतपणी सगळी कलमं अगदी बहरून लागत होती. आमचे आंबे एवढे यायचे की मांगरात व वायनाच्या खोलीत आम्ही आंब्यांची प्रचंड आडी घालीत असू. मागील दारचा कापा व रसाळ फणस १९४८ पासून फळं द्यायला लागला होता. फक्त पाच नारळाच्या झाडांपैकी एकच घराजवळच्या नारळाच्या झाडाला कुठे एखादी पेंडी नारळ मिळायचे.

आमच्या दारात फणसाच्या झाडाखाली एक रामफळाचं झाड पण होतं. त्याला वर्षातून कुठे ३/४ रामफळं येत. आजीला ही रामफळं फार आवडत. ती कच्ची असतानाच कोंड्यात घालून ती पिकवीत असे. पपनस विपूल मिळायची पण त्यात आम्हाला विशेष काही वाटायचं नाही. पपनसाचं झाड फक्त झाडावर चढायच्या प्रॅक्टीसला राजाला उपयोगी पडलं. नंतर ते आम्ही तोडून पण टाकलं.

आजीची एक पत्र्याची बॅग होती. त्यात ती सुकं खोबरं ठेवीत असे. त्याचप्रमाणे एक बांबूच्या पट्ट्यांची रवळीसारखी (बटवा) एक वस्तू होती. त्यात सर्व प्रकारच्या औषधाच्या मुळ्या असायच्या. त्यात एक डुकराचा दात पण होता. आजी, शेजारी कोणी आजारी पडला तर त्या बटव्यातली औषधं देत असे. शेजारच्या दादा नायकाच्या किंवा चंद्रा कावळणीच्या घरात कोणी आजारी पडलं तर आजी त्यांच्या घरी जाऊन त्यांची सुश्रुषा करताना मी पाहिलं आहे. ह्या ठिकाणी आजी जातपात बघत नसे. बाबांच्या गैरहजेरीत कित्येकवेळा दुकान पण चालवीत असे, अर्थात मनोहर (बाबांचा भाचा) खरं दुकान चालवीत असे.

गोसावी कुटुंबाबद्दल आजीला फार माया होती आणि गोसाव्यापैकी प्रत्येकजण आजीला आपला आधार व एक जवळची नातेवाईक समजत. आजीचे उपवास फार कडक असत. त्यात एकादशी, शिवरात्र, श्रावणातले सगळे सोमवार ती मांगरात सोवळ्यानी स्वयंपाक करीत असे, अर्थात एक वेळ – म्हणजे संध्याकाळी. ही मला व भाईला पर्वणी असायची. कारण आजी मांगरात घावणे वगैरे पदार्थ करायची व बाबा त्याचवेळी सुळे, इणगा वगैरे मासे घेत असत. तिची श्रावणातली आंघोळ म्हणजे एक मोठा प्रकार असायचा. त्यात आगाड्याची पानं व दत्ताच्या विहीरीवर जाऊन आंघोळ करणं.

आजीच्या तोंडी सदैव पंढरीनाथाचं – म्हणजे विठोबाचं नाव असायचं. त्याचप्रमाणे समाधी पुरुष म्हणजे गोपाळ बोध बुवा यांना ती फार मानायची. ती गोसावी वाड्यात गेल्यावर तिला भेटायला समस्त गोसावी येत. प्रत्येक घरात (गोसावी वाड्यातल्या) तिला मान असायचा. त्यात बाबा गोसावी, जनार्धन गोसावी, आबा गोसावी, सोनू गोसावी, आत्माराम व तुकाराम.

आषाढी एकादशी म्हणजे आमच्या घरात उत्साह. उपासाला मुगाचं कढण व शेंगदाणे हे आजीचं खाद्य. संध्याकाळी लवकरच आजी गोसावी वाड्यात आम्हाला घेऊन जात असे. मी ''दादा'' असल्याने गोसावी त्यावेळी माझे लाड करीत. संध्याकाळी गोसावी वाड्यातून निघताना मी कुणाच्यातरी खांद्यावर बसून जात असे. त्यात आत्मो हरमलकर हा एक माणूस आज आठवतो.

दुसरा मोठा उत्साहाचा दिवस म्हणजे पुण्यतिथी. श्राद्धपक्षात शेवटच्या दिवशी म्हणजे पितृ आमावास्येला आम्ही सगळी फक्त आई सोडून, गोसावी वाड्यात जात असू. हा दिवस समाधी पुरुष गोपाळ बोध बुवा यांच्या स्मृती प्रित्यर्थ असे. गोसावी वाड्यात या दिवशी शेकडो माणसं जेवत असत. पंगत विठोबाच्या देवळात बसे. जेवणात वडे, वाटाण्याची आमटी अनेक भाज्या व गुळणी नावाचं एक गोड पेय. समस्त गोसावी अगदी पोट फुटेपर्यंत स्पर्धा लावून जेवत असत. प्रत्येक जण (मोठ्या माणसांपैकी) पितांबर नेसून जेवायला बसत. जेवताना श्लोक म्हणणे हा एक कार्यक्रम असे.

आषाढी एकादशीला रात्री कीर्तन असे. कीर्तन सांगण्याचं काम प्रथम बाबा गोसावी, ते वारल्यावर शांतुबुवा करीत. शांतुबुवाची पेटंट गोष्ट म्हणजे जन्मेजयाचं सर्पमंत्र. मला वाटतं परीक्षित तक्षक ह्यापैकी पौराणिक कथा असावी. आषाढी

एकादशीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी भव्य दहीकाला असायचा. त्यात पण शांतुबुवांचे विनोदी किस्से असायचे. द्वादशीला दुपारी देवळात गावजेवण असायचं. एकादशीचा सण किंवा पुण्यतिथी झाल्यावर प्रसाद म्हणून आजी एका पितळी तांब्यातून गुळणी घेऊन घरी येत असे.

म्हाळाच्या पंधरवड्यात आम्हाला जेवायची आमंत्रणं येत असत. पण बटु म्हणून मी व भाई फक्त बामणआळीला 'बा'कडे जात असू. बाकी जेवणासाठी किंवा पोहे खाण्यासाठी फक्त तात्या खानोलकरकडेच जात असू. त्यावेळी कोण आमचा जातवाला वगैरे कळत नसे. फक्त कुळवाडी व बामण येवढाच फरक कळत असे.

आमच्या आजीला न कळत का होईना सामाजिक व कौटुंबिक बांधिलकी होती यात शंका नाही. आजीचं एका मैत्रिणीशी गुळपीठ पण होतं. त्यात – बामणआळीची 'बा' (म्हणजे बाळा बामण आळकरांची आई), आका – म्हणजे बाळ झारापकरांची आई, मामी–बारदेसकर (आमच्या रस्त्यावरच्या आवाठात न्हाव्याच्या घरासमोर स्वत:चं घर बांधून राहाणारी निराधार बाई). ह्या चौघी केशवपन केलेल्या स्त्रिया. त्यात मामी–बारदेसकरीण सोडली तर बाकी सगळ्या पांढरे पातळ नेसत. मामी मात्र तांबडं आलवण नेसत असे. ह्या चौघीजणी सोनुर्लीच्या जत्रेला न चुकता खटाप्याच्या गाडीतून लोटांगण घालण्यासाठी जात असत. जाण्यासाठी खटाप्या गाड्याची व्यवस्था असायची. त्याचप्रमाणे सोमवतीला आरलीच्या समुद्रावर जात असत. बाया ही सावंतवाडीत राहाणारी आमची एक दूरची नातेवाईक – अनेकवेळा त्यांची लीडर असायची.

आजीचा आवडता पदार्थ म्हणजे वाटाण्याची आमटी व वडे. स्वयंपाकघरात आमटी भात हे पदार्थ बनत असत. पण ज्यावेळी टोपल्यानी वडे करण्याची गरज भासायची तेव्हा आजी मांगरात चूल पेटवून वडे तळीत असे. आजीचा दुसरा आवडीचा पदार्थ म्हणजे कंदमूळ. एका भल्या मोठ्या टोपात आमच्या घरात कंदमूळ बनत असे. मग येईल त्याला कंदमूळ दिलं जात असे. सगळ्या कुळवाड्यांनी कंदमूळ चाटून चोखून खाल्ल्यावर आजीला एक प्रकारची धन्यता वाटत असे.

मासळीच्या भानगडीत आजी विशेष पडत नसे. तो सर्वस्वी आईचा प्रांत. पण ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये बांगड्याचा मोसम सुरू झाला म्हणजे ओटवण्याहून बांगडे येत असत. त्या ओटवण्याच्या गावतिणी भल्या पहाटे आमच्या दारावरून जात असत. आजीला पहाटे हाक मारून भली मोठी जवळ जवळ पाच सहा फूट व्यासाची टोपली

त्या आमच्या खळ्यात उतरवीत असत. आजी मग सकाळी बांगडे घेत असे. त्यांची चौकशी करीत असे. त्यांना गुळपाणी वगैरे काहीतरी देत असे. हा पैशाचा व्यवहार बहुतेक नसे कारण संध्याकाळी घरी परतताना त्या भात किंवा तांदूळ किंवा शेणी वगैरे घेऊन जात असत.

दुपारी आजी बाहेरच्या ओट्यावर सुपारी आणि आडकित्ता घेऊन बसत असे. मग गावकर येऊन गप्पा मारीत असत. सुपारी खात असत.

गादी-पलंग बाबा वापरीत असत. आजीजवळ गोधड्या मात्र भरपूर असत. ती स्वत: गोधड्या शिवत असे किंवा शिवून घेत असे. सध्याची बाहेरची गणपतीची खोली ही आजीची खोली. तिथेच मला घेऊन ती झोपत असे. आजीने आपल्या नातवंडावर फार प्रेम केले. सगळ्यांचं हगण्यापासून ते आंघोळ घालीपर्यंतची कामं ती करत असे. कधी कधी पावसाळ्यात व्हाळावर (ओढा) जाऊन पण कपडे धूत असे. पण जास्त करून कपडे धुण्याचा व आम्हाला आंघोळ घालण्याचा प्रकार निदान दिवाळीपर्यंत तरी बाईच्या म्हणजे दादा खानोलकरच्या विहीरीवर ज्या ठिकाणी प्रचंड पाथर होती तिथे व्हायचा. उन्हाळ्यात आम्हाला ती गुळवेल व वेखांडी डोक्यावर थापायची. त्यात मी भाई, इंदू, सिंधू, शाली, दिगंबर, निरा, बेबी, राजा असायचो. आमच्या अंगावर काजूच्या चिकामुळे फोड खरूज असले प्रकार उठायचे. मग आजी अक्षरश: सोनकेळी निवडून आम्हाला लावायची.

मोठ्या माणसात आजीने माया केली. त्यात विष्णुमामा आणि रघुमामा. तिला ह्या दोन व्यक्तींबद्दल माया आणि आदर पण होता. ती म्हणायची ''विष्णुचा आणि रघुचा गोरेपणा म्हणजे हळदीचा गोरेपणा.'' विष्णुमामा, रघुमामा आले म्हणजे त्यांनी निदान १-२ दिवस राहावं असं तिला वाटायचं. कदाचित तिला सुगावा लागला की जेवल्यावर लगेच ते निघणार - तर मग ती मनोहरला सांगून त्यांचे कपडे मांगरात लपवून ठेवायला मदत करायची व हसायची.

आजीची विरंगुळ्याची स्थानं म्हणजे गोसावी वाडा किंवा बामणआळी, म्हणजे आतेचं घर. कदाचित प्रसंगी ती झारापीला जाऊन राहिली आहे. कधीतरी तुळशीला.

केशवपनामुळे आजीला न्हाव्याची गरज दर पंधरवड्याला असायची. आमचा नामदेव न्हावी हा एक बारा बलुत्यांपैकी एक तो हे काम न विसरता करीत असे.

श्रावणात व इतर सणाला देव कार्याला आजीला भटजीची गरज असायची. तिचे आवडते भटजी म्हणजे सुर्लेकर. हा प्राणी आठवला म्हणजे दुर्वास ऋषी असाच असेल

काय? असं वाटतं. हा आमच्या मांगरात राहून आपला स्वयंपाक करून जेवत असे. आमच्याकडून सर्व शिधा त्याला मिळत असे. तो डाळीची आमटी फार छान करायचा. त्यात तो बटाटे उभे चिरून त्याच्या काचऱ्या करून टाकत असे व छान फोडणी देत असे. जेवताना बोलवून एक पेलाभर आमटी तो आजीला देत असे.

आजी कधी श्रीमंतीत वाढलेली नसेल पण त्या काळात निदान १९४५ पर्यंततरी आमची आजी इतर माणसांबरोबर म्हणजे आका, बा, मामी बारदेसकर ह्यांच्याबरोबर तुलना केली तर बऱ्या परिस्थितीवर होती. आम्ही जमीनदार नव्हतो. खोत नव्हतो. कुलकर्णी नव्हतो. पण गावात आमचं घर हे सर्वांचा आधारवड होतं. आजीने हे सुख पुरेपूर उपभोगलं. पण १९४६ पासून मात्र तिचे भोग सुरू झाले. आमचं दुकान चालेनासं झालं. बाबांना सगळं सोडून बेळगावला नोकरीसाठी जावं लागलं. आजीचं हसू मावळलं. भाजण्या, आमट्या, वडे, उत्तम मासे दुर्मिळ व्हायला लागले. १९४८ नंतर १ आण्याचं ताक आणून उकडा भात आम्हाला खावा लागला. शेवग्याची फुलं वेचून भाजी करावी लागली. सगळी गुरं कायमची शिलातल्या भटाला द्यावी लागली. घरी कोणी येईनासं झालं. आजी फार खचली. आंबे जे मिळत होते ते विकावे लागत होते. फणस पण विकावे लागत.

आजीला प्रत्येक झाडाबाद्दल प्रेम होतं. घाम गाळून विहिरीवरचं कळशीने पाणी घालून कलमे तिने वाढविली होती. त्यांची फळं नातवंडाना मिळण्याऐवजी विकावी लागत होती. समोरचा फणस लिलावात कुणीतरी घेतला व त्याला काटेरी कुंपण घातलं गेलं. त्यावेळी मात्र ती चिडली. सर्व बळ एकवटून तिने दुर्गेचा अवतार धारण केला. तिने हातात कोयता घेतला. ज्या माणसाने लिलाव करून हा फणस घेतला होता त्याची तिने सर्व सामर्थ्यानिशी खरडपट्टी केली. कुंपण तोडून टाकलं. माणसाबद्दल तिला जशी बांधिलकी होती तशी झाडाबद्दल पण होती.

त्याच दरम्यान म्हणजे १९४९ मध्ये मी पाचवीत बामणआळीच्या शाळेत जात होतो. ही शाळा २ मैल आमच्या घरापासून दूर आहे. वाटेत तीन चार व्हाळ ओलांडावे लागतात. एका पावसाळ्यात संध्याकाळी फार पाऊस पडला. सगळे व्हाळ दुथडी भरून वाहात होते. मला शाळेतून घरी परतणं शक्य नव्हतं. आजीला व आईला मी कुठे असेन ह्याची कल्पना नव्हती. मला सेफ जागा म्हणजे आतेचं घर होतं. पण त्यांना मी काय केलं असावं ह्याची कल्पना नव्हती. घरात मोठा पुरुष कोणी नव्हता. रात्रभर बेचैनीत काढल्यावर सकाळी डोकीवर फाटकी छत्री घेऊन व्हाळात पुराची पर्वा न

करता त्यात उडी मारून माझ्या शाळेत आली. मला क्षणभर तिने पाहिलं. तशीच भिजत परत फिरली.

अशी माझी आजी, जिने मुलाचे वैभव पाहिले होते. गाव जेवणं घातली होती. महार-चांभारांना भरभरून केळीच्या पानातून वाड्या-जेवण दिलं होतं. तिच्या शेवटच्या दिवसात तिला नको ते पहावं लागलं. आमच्या घरात एक विषण्णता आली होती. ह्या माझ्या खचलेल्या आजीने शेवटी १९५० च्या श्रावण महिन्यात देह ठेवला. गावात डॉक्टर नव्हता. घरात मी एकटा ११ वर्षाचा 'महापुरुष'. आईचा एकमेव आधार. आई मीठ गरम करून तिच्या डोक्यावर बांधत होती. माय किरिस्ताविण आम्हाला वांगड घायला येत असे. रात्री आजीने देह ठेवला हे आईने मला सांगितलं. त्या भयाण रात्री मी काहीच करू शकत नव्हतो. पहाटे उठून आतेकडे धावलो. श्रीराम अण्णा लगेच आले. त्यांनी बाबांना बेळगावला तार केली. बाबा रात्रीपर्यंत पोहोचणं अशक्य होतं. त्यांनी अग्नी द्यायचं ठरविलं व त्याप्रमाणे त्यांनी केलं. ही मदत - जी श्रीराम अण्णांनी केली ती मी कधीच विसरू शकलो नाही.

अजूनही अनेकवेळा आजी माझ्या स्वप्नात येते. आजीपासून मी फार शिकलो. ह्या मातीवर प्रेम करायला शिकलो. तिथल्या प्रत्येक झाडावर माझं प्रेम आहे. वय आडा करावा, कलमं जगणार नाहीत तर त्यांना मीठ घालावं, नवीन काजूची झाडे लावावीत व निदान ते ठिकाण वैराण तरी होऊ नये असं वाटतं. त्याचप्रमाणे माणसं-भाऊ असू दे, नातेवाईक असू दे, मित्र असू दे, मला सरळ सरळ जरी दिसलं की काही माणसं मत्सरी असतात - अशा माणसांना मी माझ्या खिशात जरी शेवटचा रुपया असला तरी दिला आहे. गरिबाचं लग्न असू दे, किंवा गांजलेल्या माणसाला नातेवाईकाला नोकरी द्यायची असू दे, माझं सगळं सामर्थ्य एकवटून मी मदत करायला शिकलो. स्वार्थासाठी काहीएक केलेलं नाही. बांधिलकी हा काय प्रकार असतो हे आजीकडून शिकलो. पण असत्य असताना सत्याचा आभास करताना पाहिलं. तिथे मात्र विषण्ण झालो. सवंग लोकप्रियतेसाठी किंवा नको असलेल्या सहानुभूतीसाठी दुसऱ्याचा बळी देणारी माणसं पाहावी लागत आहेत. काही कारण नसताना अपराध लपविले जाताना पाहावे लागत आहे. अर्थात हा स्वतंत्र विषय.

•••

मला साधारण १९४३ नंतरचा काळ आठवतो. त्यावेळी मी शाळेत जात नव्हतो. आमचं दुकान हे एक गजबजलेलं ठिकाण होतं. मनोहर – बाबांचा भाचा, आमच्या सगळ्यात मोठ्या साळगावच्या आतेचा दोन नंबरचा मुलगा हा आमचं दुकान सकाळी उघडत असे. दुकानाचं कुलूप काढणं, पेटी लावणं, सगळे खोके बाहेर आणणं, तांदळाच्या राशी गोणपाटात तयार करणं, नारळ एका बाजूला, ओट्यावर मिठाचं पोतं, रॉकेलचा डबा व त्याचा पंप, सुंभाची–दोऱ्याच्या मोळ्या व दत्ताला उदबत्ती लावून दुकान सजवणं. दुकानात एक लाकडी काळपट पेटूल, त्यात सगळी कॅश टाकली जात असे. रात्री बाबा मोठ्या पेटीजवळ बसून ही कॅश मोजीत असत व एका मोठ्या काळ्या पाकीटात ते ठेवीत असत व दुसऱ्या दिवशी ते पाकीट कोटाच्या खिशात घालून सायकलवरून सावंतवाडीला जात असत. हे बाबांचं काळं पाकीट जे आम्ही वर्षानुवर्ष पहात होतो ते एकदा १९४९/५० च्या दरम्यान साठ रुपयांसकट हरवलं असं मी ऐकलं. (बेळगावच्या बाजारात).

दुकानात गुळाच्या ढेपी फोडायचं काम पहिल्यांदा कोणीतरी गावकर करीत असे. नंतर सदा सावंत, नंतर सगूण व शेवटी शेवटी काका न्हावी. त्याचप्रमाणे तेलाचे डबे फोडणे हे एक स्कीलचं काम असायचं. ह्या डब्याचं सील फोडताना त्यांच्यावर निखारा ठेवावा लागत असे व बाजूचा थर वितळल्यावर अलगद सीलचा पत्र्याचा तुकडा अलग करावा लागत असे.

तांदळाची पोती फोडण्या आधी त्यात भोम खुपसून नमुना पहावा लागत असे. किंबहुना पोत्यात तांदुळ आहेत की दुसरं काय आहे हे पाहाण्यासाठी पण ह्या भोमाचा उपयोग होत असे. साखरेच्या पोत्यावर शिसाचं सील असायचं. हे शिसं मी व भाई गोळा करीत असू. त्याच ठिकाणी आम्हाला अनंत गावकर झोपाळा बांधून देत असे. शेंगदाणे, साखर खात खात पोत्यांवर पाय आदळत आम्ही एकावेळी दोघे दोघे बसून बाहेरच्या खोलीत झोका घेत असू. रताळी आम्ही विकत असू. कित्येक वेळा उकडून ती विकत असू. गणपतीच्या दिवसात संध्याकाळी झुंबड असायची. पिंजर, अबीर, बुका ह्याच्या पुड्या बांधून देताना मनोहरची दमछाक होत असे. त्यात बाबांचं चिडणं. कंदीलाची काच पुसली नाही तर चिडणं. विक्री जास्त झाली नाही तरी चिडणं,

मावशीच्या मुलीबरोबर जरा गप्पा मारल्या तरी चिडणं हे सगळं एकट्या मनोहरला सहन करावं लागत असे.

मनोहर सायकल फिरवायचा, मधेच कुठेतरी गडप व्हायचा. शेवटी तो एक दिवशी मुंबईला गेला व आम्हाला मुंबईला नोकरी लागल्याचं पत्र आलं. ही बहुतेक १९४५ ची गोष्ट असावी. मनोहरची मधे मधे पत्र येत असत. एक दिवशी त्याचं पत्र आलं की तो आजारी आहे व आजीला त्यानं काही गावठी औषधे पाठवायला लिहिलं होतं. नंतर त्याची पत्र बंद झाली. एक दिवशी कळलं की तो दंग्याचा बळी पडला. ही गोष्ट बहुतेक १९४७ ची असावी. हे माझं पहिलं दु:ख. मनोहर मस्ती करायचा, विनोद करायचा पण आमच्या कुटुंबात अगदी एक म्हणून वावरायचा.

आमच्या साळगावच्या आतेला – आना – म्हणजे सदाशिव नंतर कृष्णी, नंतर मनोहर त्यानंतर दिगंबर व शेवटची नीरा अशी पाच मुलं होती. त्याच्या वडिलांचं नांव बहुतेक विश्वनाथ असावे. हे फार लवकर वारले. मला वाटतं शेवटचं अपत्य म्हणजे नीरा जन्मल्यावर ते वारलेत. आते कुठेतरी कायमची निघून गेली. कुटुंबाचा सर्व भार आनावर पडला होता. आना बहुतेक १९४२/४३ च्या दरम्यान मुंबईला नोकरीला लागला. घरचं उत्पन्न असं काही नव्हतं. कृष्णी, दिगंबर, नीरा ही नेहमी आमच्याकडे यायची. एक दिवशी आनाने घर व आजुबाजूची जमीन विकली. आठवतं की ती जमीन त्याने २५० रुपयांना विकली व कुठेतरी लहानग्या खोलीत साळगावला आपल्या कुटुंबाला ठेवलं.

१९४५ च्या दरम्यान आना व कृष्णीचं लग्न सावंतवाडीला कळसूकर हायस्कूलमध्ये संपन्न झालं. ही लग्न आमच्या आई–बाबांनीच केली. अर्थात खर्च आनाने स्वत: केला असावा. आनाचं लग्न आईच्या मामाच्या मुलीबरोबर झालं. ही बहुतेक वालावल किंवा अंदुर्ल्याची असावी. आमच्या आईचे मामा आमच्या परुळ्याच्या आजीसारखेच ठेंगणे, ठुसके व थोडेसे विष्णुमामांसारखे (आईचा भाऊ) दिसत असत. खूप वेळा ते आमच्या घरी नारळ वगैरे घेऊन आलेले आहेत. काळी टोपी आणि धोतराचा घट्ट कासोटा नेसून एक साधा कोट घालून ते आमच्या घरी येत असत. त्यांना आणखी दोन मुलगे. मला वाटतं एकाचं नाव नारायण व दुसऱ्याचं सदानंद असावं. लग्नात सगळी आम्ही सावंतवाडीला जमलो होतो. नारायण चटपट्या

व बोलण्यात पटाईत होता. मला त्याने लवकरच लळा लावला होता. लग्नाच्या दिवशी दुपारी त्याने सिनेमा बघायची टूम काढली. मला त्याने बाबांकडून पैसे आणायला सांगितलं. बाबा व रघुमामा बोलत असताना मी बाबांजवळ सिनेमासाठी पैसे मागितले. रघूमामांनी झटकन खिशातून पाकीट काढून काही चिल्लर माझ्या हातावर ठेवली. नारायण खूष. सिनेमा पाहिल्याचं आठवत नाही. पण शेंगदाणे पेपरमिंट खाल्ल्याचं आठवतं, कारण सिनेमा पेक्षा चंद्रकोरीसारख्या पेपरमिंटावर मी जास्त खूष असायचो.

आनाने आपल्या बायकोचं नांव प्रभावती ठेवलं होतं. त्याचा पहिला मुलगा विश्वनाथ, त्याला घेऊन प्रभावती आमच्या घरी बहुतेक १९५० च्या मानाने आली होती. तिला त्यावेळी मी मडगावला नेऊन सोडली होती. मी त्यावेळी कृष्णीकडे ४ दिवस राहिलो होतो. मला त्यावेळी मडगाव फार आवडत होतं. रेल्वे स्टेशनच्या जवळच त्यांचं हॉटेल व घर होतं. सकाळी उठून आना आम्हाला आपल्या हॉटेलात घेऊन जाई व उंडे म्हणजे पाव उसळ देत असत. परत येताना पिशवीभर बांगडे व आणखी काही गोड देऊन कृष्णीने माझी तिकिटाला पैसे देऊन रवानगी केली होती. हा माझा पहिला मोठा प्रवास व जबाबदारीचा पण.

मी मधे कधीतरी कृष्णीची चौकशी केली तेव्हा कळलं की कृष्णी वारली. मी कुडाळला असताना गोव्यात नेहमी जात असे. मडगावात कृष्णीचं राहाण्याचं ठिकाण शोधण्याचा प्रयत्न केला. पण मडगाव शहराचा नक्शा एवढा बदलला होता की मला काहीच करता आलं नाही.

आना नेहमी आम्हाला पत्र पाठवायचा. तो मुंबईहून मिठाई घेऊन यायचा. ह्या मिठाईत माहिम हलवा असायचा. आना मुंबईहून आला म्हणजे आमच्या मधल्या खणात बसून समईच्या प्रकाशात गोष्टी सांगत बसायचा. कधी कधी जळती अगरबत्ती तोंडात घालून दाखवायचा. भिंतीवर विशिष्ट तऱ्हेने हाताच्या पंजांची व बोटांची जुळणी करून मांजर, ससा अशा सावल्या दाखवायचा. मुंबईहून येताना आणलेले पैसे संपत असत. मग जाताना कुठे आमच्या आईजवळ पैसे आहेत का विचारायचा. नाहीतर अंगठी वगैरे गहाण ठेवून विष्णु गावकरकडून पैसे घेऊन मुंबईला जायचा. त्याचा पोषाख म्हणजे खादी टोपी, लेंगा व शर्ट. कपडे स्वच्छ असायचे.

कृष्णी नंतर कधीतरी नीराचं लग्न झालं असं ऐकलं. तिला बांबड्र्याला दिली होती. नीरा ही एक अतिशय गरीब मुलगी. तिच्या डोळ्यात फूल पडलं होतं. तिचा

चेहरा आज नजरेसमोर आला तर कणव येते. वाटतं, काय दारिद्र्य ही माणसं भोगत होती!

दिगंबर हा दत्ताचा भक्त होता. तो मधे मधे येऊन सांगायचा की – त्याच्या घराच्या तुळशीवृंदावनाजवळ रोज एक नाग येतो व फणा आपटतो. दिगंबर कायमचा सडाफटींग राहिला. कृष्णीही दिसायला फार सुंदर होती. गोरी होती. उंच होती. तिचं लग्न गोव्याच्या एका हॉटेल चालवणाऱ्या मुलाबरोबर झालं. मला वाटतं कृष्णीचे सासरे, आबा, आडनाव बहुतेक वालावलकर किंवा नाईक असावं. हे म्हातारे गृहस्थ फार बोलके व लाघवी होते. ते आजीशी, बाबांशी, आईशी फार गप्पा मारायचे. आमच्याकडे दोनचार दिवस राहून जायचे. त्यांचं हॉटेल मडगावला होतं. कुटुंब तसं सधन होतं. आम्हाला सुके बांगडे, सुतरफेणी असं काहीतरी घेऊन यायचे.

आमच्या दुसऱ्या आतेची म्हणजे झारापीच्या आतेच्या मुलांत प्रेमा ही सर्वात मोठी. लहानपणी म्हणजे लग्नापर्यंत ती आमच्याकडेच वाढली. मला वाटते तिचं लग्न १९४५/४६ च्या दरम्यान झालं असावं. आमच्या घरात कपडे घेऊन व्हाळावर किंवा नदीवर जाणे व ते स्वच्छ धुवून आणणे हे तिचं मुख्य काम. शेवगाच्या पानाचे गुच्छ करून माझ्या अंगावर ती फिरवत असे. बहुतेक माझं शरीर जंतूनाशक करण्यासाठी असावं.

प्रेमा ही मासळी खरेदी करण्यात पटाईत. गावतिणीचं लक्ष दुसरीकडे वळवून एखादा मासा ती सहज आपल्या पाठीशी लपवत असे. मला जेवण भरवायचं काम तर ती अखंड करीत असे. मला आठवतं, चांगला मोठा होईपर्यंत मला आई, आजी, प्रेमा ही भरवत असे. प्रेमा हे एक लाघवी व्यक्तिमत्व होतं. तिचं लग्न आजगावच्या दिनकर आजगावकर बरोबर झालं होतं. हा बहुतेक फिरता सेल्समन असावा. तो वुलनचा कोट घालीत असे. पांढरं शुभ्र धोतर नेसून येत असे. पण थोडासा तिरसट व अती बडबड्या गृहस्थ होता. आईबरोबर तासन् तास गप्पा मारीत बसायचा. केव्हाही येई व कोठेही जाई. त्याचं आणि प्रेमाचं कधीच जुळलं नाही. लग्नानंतर प्रेमा सासरी जायला कधीच उत्सूक नसे. ती आमच्याकडे राहायची किंवा पंढरी झारापकर किंवा बाळा झारापकर ह्या काकाकडे तरी असायची. एकदा तर ती आमच्या घरी असताना अचानक दिनकर आजगावकर आमच्याकडे आले. ते प्रेमाची चौकशी करू लागले. प्रेमा मांगरात लपून बसली. कारण तिला कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याबरोबर जायचं नव्हतं. प्रेमाला

नंतर एक मुलगी झाली. नंतर ती काही दिवस आपल्या काकांकडे गोव्यात किंवा बहिणीकडे कोल्हापुरात राहात असे. १९५०/५१ नंतर मला ती कधी दिसली नाही. ती अतिशय दु:खी जीवन जगली. ती वारली हे कळलं. पण कशी कुठे कळलं नाही. काही काळ प्रेमा ही आमच्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग होती.

पहिल्यांदा पहिल्यांदा म्हणजे प्रेमाचं लग्न झाल्यावर आम्ही आजगावला जात असू. प्रेमाचा दीर विशेषत: दिगंबर हा अतिशय बोलका माणूस होता. तो आमच्याकडे यायचा. आम्हाला आग्रहाने आजगावला घेऊन जात असे. मी व आई आजगावला जाऊन राहिलो आहोत. एकदा तर आई मला आजगावला पाठवायला तयार नव्हती. पण दिगंबर आईला म्हणाला 'येऊदे त्याला माझ्याबरोबर घरात बसून काय अंडी घालणार आहे?' आजगावला गेल्यावर शिरोडा, आर्ली इकडे आम्ही भटकायला जात असू. हे एक निसर्ग रम्य ठिकाण मला फार आवडायचं. नंतर कुडाळात असताना मी आर्लीच्या वेतोबाच्या देवळात व त्या समोरच्या प्रसिद्ध लेखक श्री जयवंत दळवी यांच्या घरात अनेक वेळा गेलेलो आहे. शिरोड्याच्या खांडेकरांनी (वि.स.) स्थापन केलेल्या हायस्कूलला अनेक सभा घेतलेल्या आहेत. आजगावची दुसरी आठवण म्हणजे प्रेमाच्या घरासमोर वालावलकर किंवा आजगावकर असे कोणीतरी राहत असत. मी व आई लहानपणी त्यांच्या घरी जात असू. तिथे एक प्रकारची आंबटगोड फळं मिळायची. त्याला जग्म् म्हणायचे. हे फळ आणखी कुठेच मला दिसलं नाही.

त्या पूर्वस्मृतीला उजाळा मिळावा म्हणून मी गावाला गेल्यावर आजगाव आणि शिरोडा इथे जातो. आर्लिच्या वेतोबाच्या देवळात आणि आजगावच्या वेतोबाच्या देवळात जातो. कोणत्याही भक्तिभावाने किंवा काही मागण्यासाठी नाही तर एक प्रकारची त्या ठिकाणाची ओढ म्हणूनच.

आमच्या झारापीच्या आतेच्या यजमानांचं नाव अनंत झारापकर. ह्याच्या रक्तात जमाखर्च भरलेला. त्यांनी अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. जमाखर्चाच्या सखोल ज्ञानामुळे त्यांना नोकऱ्या सहज मिळत व त्यांना मागण्या पण असत. त्यांनी हॉसपेट, दांडेली, गोवा, बेळगाव, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. अतिशय बाळबोध वृत्तीचे, आपल्या मुलांचे लाड करणारे हे गृहस्थ होते. आमच्या आजीवर त्यांची भक्ती होती. गोव्यावरून येता जाता आमच्या घरी उतरत. काहीतरी खाऊ घेऊन येत असत. ते विठोबाचे भक्त होते. झारापीच्या विठ्ठलाच्या देवळाचे कार्य ते पाहात

असत. झारापीत अनंत चतुर्दशी मोठ्या प्रमाणावर साजरी होत असे. आतेच्या घराच्या शेजारच्या घरात अनंताची मोठी आरास करीत असत. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गोव्याहून बाळा झारापकर येत असत. गप्पा, भजन, कीर्तन यांना ऊत येत असे. त्याकाळात बाबा व बाळा झारापकरांची चांगलीच दोस्ती होती. आम्ही जसे गोसाव्याचे भाचे तसे झारापकर पण गोसाव्याचे भाचेच लागत. गोसावी, मणेरकर व झारापकर असे सगळे विठोबाच्या पालखीचे मानकरी. अजून पालखी आमच्या घरी आल्याशिवाय पुढे जात नाही. झारापीत अनंत चतुर्दशीच्या दिवसात बाळा झारापकर, बाबा वगैरे मंडळी पत्ते खेळत असत. अर्थात लॅडिस किंवा सात हाती.

एका वर्षी बाबा बेळगावला असताना बहुतेक १९४९/५० साल असावं, अनंत झारापकर आमच्या घरी मळगावला आले. त्यांना आजीला व मला झारापीला घेऊन जायचं होतं. पण मोटर मिळत नव्हती. त्यावेळी ST चालू नव्हती. शेवटी आजीला ते घेऊन जाऊ शकले नाहीत. पण मी आणि ते चालत मळगाववरून झारापीला गेलो. वाटेत छोट्या छोट्या दुकानात शेवगाठीचे लाडू वगैरे खात झारापी गाठली. ह्याच मुक्कामात देवाला प्रसाद लावणं म्हणजे काय ते मी पाहिलं. त्यावेळी बाळा झारापकर नुकतेच उदयाला येत होते. ते थोडेसे पैसेवाले म्हणून ओळखले जात होते. त्यांना मान होता. अनंताला त्यांनी काहीतरी फूल वाहीलं. ते उजव्या बाजूला पडलं. ते खूष झाले होते. देवाचा प्रसाद मिळाला म्हणाले. ह्या मुक्कामात मी झारापीत ८/१० दिवस होतो. इन्दू, सिंधू, शांती व बाळा झारापकरचा शरद वगैरे व्हाळावर जाऊन व्हाळात मासे झाडाच्या पाल्याचा रस पाण्यात टाकून मारीत असे.

झारापी, साळगाव हा प्रदेश भूतखेतासाठी व सापासाठी प्रसिद्ध आहे. रात्रंदिवस इंदू ह्या भुतांच्या गोष्टी सांगत असे. आतेच्या घरासमोर एक प्रचंड खडक आहे. पावसाळ्यात ह्या खडकावर देवकेळीच – म्हणजे चवईचं मोठं झाड उगवते. हा कुठल्या तरी देवाचा खडक आहे. कोकणात प्रत्येक गावात ''बा'' ह्या शब्दाने शेवट होणारा ग्रामदेव आहे. जसे कुतोबा, खेतोबा, वेतोबा शब्दाचे तसा हा जागेबा. इथे प्रचंड नाग, साप आहेत असं सांगितलं जात असे. झारापीच्या आतेच्या सर्व मुलींत म्हणजे प्रेमा, इंदु, सिंधु, शाली ह्यांत शिकलेलं असं कोणीच नाही. कुठेतरी मराठी दुसरी तिसरीपर्यंत शिकली असावीत. त्यांचं आवडतं ठिकाण म्हणजे आमचं घर. येताना कोणी एकटं येत नसे. इंदु, सिंधु, शाली ही एकदम येत असत. आल्यावर खूप दिवस त्यांचा मुक्काम असे.

आम्हाला पण ती परत परत यावीत असे वाटत असे. खूप दिवस आली नाहीत तर मी आमच्या खळ्यात उभा राहून रस्त्यावर लांबपर्यंत दिसतात की काय ते पाहात असे आणि रस्त्याचा चढाव चढताना कोणीतरी दिसलं म्हणजे मला अतिशय आनंद होत असे, कारण मग रात्री भुताच्या देवचाराच्या गोष्टी असायच्या व कधी झोपलो ते कळायचं नाही. अनंत झारापकरची सदैव भटकंती असायची. ते कुठे आहेत हे कित्येक वेळा आतेला पण माहीत नसे. मुलांना तर पत्ताच नसे.

आमची तेंडोलीची आते वर्षातून एकदातरी येत असे. तिला त्यावेळी लीला नावाची एक मुलगी होती. नंतर रामकृष्ण नावाचा एक मुलगा झाला होता. ही दोन्ही भावंडे मला आठवतात. श्री. तेंडोलकर म्हणजे सावळाराम भिकाजी तेंडोलकर हे अतिशय काटक गृहस्थ होते. ते दर महिन्या-दोन महिन्यांनी हमखास येत. येताना पिशवीभर नारळ आणीत असत. हे गृहस्थ नेहमी तेंडोलीवरून चालत येत असत. त्यांचा पोषाख ठरलेला असे. डोक्यावर काळी टोपी, कोट व धोतर. हे गृहस्थ अतिशय मानी होते.

आमची बामणआळीची आते आमच्याकडे जवळ असूनही जास्त येत नसे. आम्हीच विशेषत: आजीच तिच्याकडे जास्त वेळा जात असे. पण ''बा'' महिन्या-दोन महिन्यांतून एकदा तरी येत असे. आल्यावर आराम खुर्चीत बसून विडी ओढीत असे. आम्हाला गुळाचे लाडू वगैरे खायला घेऊन येत असे. श्रीराम अण्णा (आतेचे यजमान) जेव्हा मुंबईहून यायचे तेव्हा न विसरता ग्लुकोज बिस्किटाचा पुडा घेऊन येत असत. तो बिस्किटाचा पुडा काही और होता. आता तसा पुडा दृष्टीस पडत नाही. श्रीराम अण्णा हे अतिशय सज्जन व टापटिपीचे गृहस्थ होते. ते मितभाषी होते. त्यांना मांजरे फार आवडत, पण फार भित्रे गृहस्थ होते. मुंबई त्यांनी १९४५/४६ साली सोडली व सावंतवाडीत टेलरींग व रेडीमेड कपड्यांचं दुकान काढलं. त्यांनी या दोन्ही धंद्यांत कधीच इंटरेस्ट घेतला नाही. दिवस अतिशय भित्रेपणाने व गरिबीत काढले. त्यांच्याबद्दल प्रत्येकाला सहानुभूती होती. त्यांचा भाऊ बाळा बामण आळकर सदैव त्यांच्या मागे उभा होता, त्यामुळे त्यांच्या सर्व मुलींची म्हणजे पाच मुलींची लग्न पार पडली व मुलगा ठाण्याला राहू शकला.

•••

## मळगाव

मळगाव हे गाव सावंतवाडीवरून ८ कि.मी. आत वसलेले आहे.

आमच्या मळगाव गावाला इतिहास नाही, तसा भूगोल पण नाही. सावंतवाडीहून शिरोडा-सार्तोडा रोडवरून येताना माजगाव सोडल्यावर मॅटाच्या माथ्यावर मळगावची हद्द (पूर्व पश्चिम) सुरू होते. तीन साडेतीन कि.मी. म्हणजे निसरड्याच्या पुलावर ह्या गावची लांबी संपते. ह्या सबंध रस्त्यावर अगदी तुरळक घरे आहेत. ह्या गावाची दक्षिणोत्तर रुंदी आमच्या घराच्या मागे एक किलोमीटर म्हणजे खरोबाच्या दगडापासून सुरू होते ती रवळनाथाचं देऊळ संपून गोसाव्याचा वाडा म्हणजे विठोबाच्या देवळानंतर अर्ध्या किलोमीटरवर संपते. आमच्या गावाला लागून नेमळे गाव आहे. गावाच्या पूर्वेला भूतोबा, पश्चिमेला पूर्वस, दक्षिणेला खरोबा व उत्तरेला रवळनाथ व त्याच्या बाजूला डोंगराच्या खाली पुर्वाचार. गावची सगळी लोकसंख्या १९५० मध्ये अडीच ते तीन हजार असावी. त्यात आजही काही विशेष भर पडली असं नाही.

गावात नरेंद्र डोंगरातून खाली उतरणारे तीनचार व्हाळ (ओढे) आहेत. ह्यांना जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत ओलावा असतो. अर्थात नदी नसल्याने पाण्याचं सदैव दुर्भिक्ष. गाव ओसाड. फक्त पावसाळ्यात भरपूर भात शेती होते. थंडीत जिथे पाण्याची सोय असेल तिथे वाली, मिरच्या, कांदे अशी पिके येतात. पूर्वेच्या बाजूला डोंगर आहेत. या डोंगरात साग, किंदळ, नाणे, आईन, जांभा वगैरे वृक्षाची प्रचंड झाडे असायची. आता विशेष असे प्रचंड वृक्ष दिसत नाहीत.

पुर्वाचाराचे देऊळ बामणआळीला दंतुवाच्या व्हाळाजवळ आहे. हे देऊळ पण ग्रामदेवता किंवा स्थळ देवता म्हणूनच ओळखलं जातं. देवळाच्या शेजारी बकुळीची दाट राय आहे. या देवळात शंकराची पिंडी आहे व इतर अनेक देव आहेत. महारासाठी इथे एक वेगळं देऊळ आहे. या देवळाला काहीतरी प्राचीन इतिहास असावा असं वाटतं, कारण गणपती, शंकर व इतर अनेक देवी-देवतांच्या मूर्तींची पूजा इथे होते. या देवळाची डागडुजी श्री बाळा बामण आळकर म्हणजे गोपाळ भिकाजी सामंत यांनी १९४५/५० च्या दरम्यान केली.

गावात रस्त्यावरच्या आवाठात बर्वेकर, गावकर, आमचं घर तसेच खानोलकर अशी चार पाच कुटुंबे राहातात. मध्ये गावकरांचा आवाठ आहे व त्याच्या बाजूला पाटकर आवाठ व बामणआळी. एका बाजूला गोसाव्याचा आवाठ. नंतर तेली आवाठ.

सावळं आवाठ, सुतार आवाठ, महारांचा आवाठ, चांभारांचा आवाठ, न्हाव्यांचा आवाठ अशा आवाठात गावाची विभागणी आहे. सत्तर–ऐंशी वर्षांपूर्वी गावात मुख्य जमीनदार म्हणजे सूर्याजी सखाराम खानोलकर. नंतर हा वारसा त्यांच्या भावाने म्हणजे तात्या खानोलकरांनी चालविला. दुसरी कुटुंबे म्हणजे पाटकर, सामंत. ही थोडीशी सधन कुटुंबं होती. पण व्यवसाय शेतीचा असावा.

गावात पाणी अडवण्यासाठी असं एकही धरण नव्हतं. शेतीचं उत्पन्न कुणालाच वर्षभर पुरण्यासारखं नव्हतं. लोक अर्धपोटीच राहात. व्यवसायचं असं साधन काहीच नव्हतं. अशा परिस्थितीत आबा पोकळे यांनी पहिल्यांदा या गावात ''स्वातंत्र्य विडी कारखाना'' स्थापन करून गरिबांना रोजगाराचं साधन उपलब्ध करून दिलं. श्री. पोकळेचा कारखान्यानंतर केसरकर यांचा कारखाना आला. गावात रोजगारामुळे नवचैतन्य आलं. गरीबाच्या घरी विडी वळण्याचं काम चालू झालं. रोज–मजुरी मिळू लागली. कोळगी, सुतार, लोहार, चांभार, न्हावी, धोबी या लोकांना पण काम मिळायला लागलं. गावात मोटारी फिरायला लागल्या. सायकली फिरायला लागल्या. हॉटेल चालायला लागली. त्यात भजी व चहा ह्यावर अनेक वाणी कुटुंब आपला चरितार्थ चांगल्या प्रकारे चालवू लागले.

मला वाटतं आबा पोकळेने विडीचा कारखाना काढला नसता तर हे गाव नामशेष झालं असतं. कारण बहुतेक सगळे धडधाकट लोक मुंबईला मिल मध्ये काम करायला गेले असते. अशा अनेक लोकांना निर्वाहाचं साधन उपलब्ध करून देणाऱ्या आबा पोकळेंना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच! अंशत: का होईना श्री आबा पोकळेच्या ऋणातून मोकळं होण्यासाठी गावच्या लोकांनी त्यांचं स्मारक बांधावं किंवा रस्त्याला तरी नाव द्यावं.

आबा पोकळे हे एक रसिक गृहस्थ असावेत. ह्याचं कारण त्यांनी बांधलेली इमारत. ही इमारत ह्या गावचं एकमेव आकर्षण व अजून आहे. ह्या इमारतीच्या शेजारी त्यांनी एक उत्कृष्ट विहीर पण खोदली व इमारतीच्या बाजूला अनेक तऱ्हेची फुलझाडे लावलेली होती. बारा महिने ह्या विहीरीत थोडं का होईना पाणी मिळत असे. ही एकच इमारत गावात होती की ज्या ठिकाणी मला कबुतरं पाहायला मिळायची. इमारतीची कौले मेंगलोरी तर होतीच, पण आकर्षक रंग दिलेली इमारत इतर ठिकाणी दिसणं कठीण. आबा पोकळेच्या पेहेरावावरून असं वाटतं की त्यांना भारतीय स्वातंत्र्याबद्दल

ओढ असावी. त्यांनी आपल्या विडी कारखान्याला पण 'स्वातंत्र्य विडी कारखाना' असं नाव दिलं होतं.

आमच्या गावात स्वातंत्र्याचं वारं किंवा गांधीजींच्या चळवळीचा विशेष परिणाम झाला नव्हता. त्या काळात बाळु खानोलकर हा एकमेव आमच्या गावातून प्रथम मॅट्रीक पास होणारा गृहस्थ. हा गृहस्थ सदैव खादी टोपी, खादी कोट घालीत असे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्या स्वातंत्र्य सैनिकाला आपल्या उपजीविकेचं साधन म्हणून मास्तरकी पत्करावी लागली. तीही खेडसारख्या दुर्गम भागात. बाळ खानोलकर हा दादा खानोलकरांचा पहिला मुलगा. आमच्या बाबांच्या वयाचा, चांगला शिकलेला, पण शेवटी त्याला कष्टमय जीवन जगावं लागलं असं ऐकलं.

मळगावात प्रथम रस्त्यावर म्हणजे आमच्या घराच्या शेजारी एकमेव शाळा होती. त्यात फक्त मराठी चौथीपर्यंत जुजबी शिक्षण दिलं जात असे. नंतर कुठेतरी सावळ वाड्यात पण एक मराठी शाळा सुरू झाली. मी पाचवीत जाण्याच्या दरम्यान गावात एक पूर्ण प्राथमिक शाळा सुरू झाली. ही शाळा मला वाटतं श्री. विष्णु सामंत – कापडाचे व्यापारी यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. त्यांचे हेडमास्तर – शि. ल. उर्फ काका सामंत हे गृहस्थ होते.

गावातील दुसरं आकर्षण म्हणजे श्री. रामकृष्ण बुवांचा मठ. हे दत्तभक्त होते. गाणगापूरला अनेकवेळा त्यांनी दत्ताची भक्ती केली होती. मळगावला स्वत:च्या जमिनीत त्याने एक छान दत्ताचं देऊळ स्थापन केलं होतं. या देवळात त्यांची साधना चालत असे.

गावात तीन भावणी म्हणजे देवदासींची घरं होती. त्यांत रस्त्यावर नवसा भावीण, सुताराच्या आवाठात सुमला भावीण – ही रामकृष्ण बुवांच्या सेवेत असे व तिसरी एक बामणआळीला पण होती. नवसा भावणीला दोन सुंदर मुली होत्या. त्यात एकीचं नाव इंदू व दुसरीचं विमल. दोन्ही दिसायला फार सुंदर होत्या. आमच्या दुकानावर यायच्या.

अशा ह्या बिनचेहऱ्याच्या गावाबद्दल मला कधीच आकर्षण वाटलं नाही. कारण या गावाला निसर्गाचं वरदान नाही ना संस्कृती. मला मळगावला येण्याचं एकच आकर्षण म्हणजे आमचं घर व पाठीमागची जमीन. एकेकाळी घाम गाळून आम्ही नंदनवन केलं होतं. आमचं घर, खळ म्हणजे सगळ्याचा आधारवड असायचं.

●●●

या काळात बाबा प्रत्येक सुट्टीत परुळ्याला सायकलने जात असत व सायकलवरून भाईला घेऊन येत असत. कित्येकदा बेबीला घेऊन जात असत व येताना भाईला घेऊन येत असत. मला मात्र बाबांबरोबर सायकलने परुळ्याला जाण्याचा योग कधीच आला नाही.

माझी पहिली आठवण म्हणजे आईचा दाढदुखीचा आजार. आईची दाढ अतिशय सुजली होती. काहीतरी गावठी औषधं चालू होती. बाबा गोसावी मधे मधे घरी येत होते. चौरंगावर फूल तांदूळ वगैरे ठेवून दाढदुखी कमी व्हावी म्हणून गाऱ्हाणं वगैरे घालीत होते. दिवस जात होते पण आईचा आजारीपणा वाढत होता. शेवटी कुणीतरी सायकलने वेंगुर्ल्याला बाबा परुळेकर म्हणजे आईच्या काकांना जाऊन ही गोष्ट सांगितली. बाबा परुळेकर, म्हणजे आमचे आजोबा लगेचच आबा पोकळेची मोटार घेऊन हजर झाले. कुणाचंही काहीही न ऐकता आईला त्यांनी मोटारमध्ये घातली व सावंतवाडीला डॉ. रामभाऊ परुळेकरकडे घेऊन गेले. त्यांनी दाढेचे ऑपरेशन केले. आई तीन चार दिवस सावंतवाडीला आमच्या व रघुमामांच्या नवीन दुकानाच्या जागेत राहिली व सुखरूप परत आली. बाबा परुळेकरांनी डॉ. परुळेकरांना ह्या ऑपरेशनचे फक्त १५ रुपये दिले होते. पण ज्या मायेने ते या प्रसंगाला धावले त्याला तोड नाही!

माझी परुळ्याची पहिली ट्रीप मला आठवते ती म्हणजे दाजी झारापकर – ह्याला आम्ही दाजी तांबडगे म्हणत असू, त्याच्या टुरींग मोटरने मी, आई, बेबी व राजा सगळी परुळ्यात गेलो होतो. त्यावेळी मोटर कुडाळला वर्दमाच्या हॉटेलाजवळ थांबलेली पण आठवतं व तिथे आम्ही चिरोटे खाल्लेले पण आठवतं. यावेळी आमचं परुळ्याला जाण्याचं कारण बहुतेक सुशा मावशीचं लग्न असावं. सुशा मावशीचं लग्न आणि तिचं पुढचं जीवन ही एक दुर्दैवी कथा आहे. सुशा मावशी ही आईची धाकटी बहीण. रघुमामांनंतर जन्मलेली. हिचं लग्न आबा वराडकर उर्फ आबा अक्सरे ह्या विधुराशी झालं. लग्न वराडात म्हणजे परुळ्याहून १०/१२ मैलाच्या परिसरातला वराड ह्या गावी झालं. लग्नाच्या दिवशी आजोबांसकट सगळी आम्ही भल्या पहाटे निघालो. नंतर होडीतून प्रवास करून वराडला पोहोचल्याचं आठवतं. तिथे लग्न झाल्यावर आम्ही जेवलो. जेवण तर अगदीच यथा तथा होतं. वराडकर कुटुंब सुधारलेले कुटुंब नसावं.

वराडकर मुंबईला कुठेतरी गिरणीत कामाला होते. हे गृहस्थ रंगाने काळे होते, पण स्वभावाने लाख गृहस्थ होते. अनेक वेळा ते मळगावला सुशा मावशीला घेऊन आले होते. आमच्याकडे चार चार दिवस राहून गेलेत. नाकात नथ घातलेली ठेंगणी ठुसकी गरीब चेहऱ्याची सोज्वळ सुशा मावशी मला अजून आठवते. मला वाटतं तिला एक मुलगा पण झाला होता. ती मुंबईला असतानाच कोणत्यातरी साथीच्या रोगाने वारली असावी. सुशामावशीचा मृत्यू की ज्या विषयी माझं काळीज त्यावेळी पण ढवळून निघालं होतं. एकादी घरातील अडगळीतील वस्तू फेकून देण्यासारखं तिचं लग्न झालं.

त्यावेळी परुळ्याला जाणे म्हणजे एक दिव्य असायचं. मळगावहून सावंतवाडी. सर्विस गाडीने नंतर सावंतवाडीहून कुडाळपर्यंत व कुडाळहून पाटापर्यंत. पाट ते परुळे हा पाच किलोमीटरचा प्रवास चालत करावा लागत असे. त्याकाळात कोळशाच्या इंजिनच्या मोटारी होत्या. दिगसकर हा प्रसिद्ध ड्रायव्हर आम्हाला कुडाळपासून परुळ्यापर्यंत कंपार्टमेंटमध्ये बसवून घेऊन जायाचा. नंतर दादा साळगावकरांनी पण आपली सर्विस मोटर सुरू केली होती. आम्ही पाटाला पोहोचल्यावर परुळ्याहून आपा पेडणेकर किंवा कोणीतरी आम्हाला घेऊन जायला येत असे. मग काळोखात गप्पा मारत मारत आम्ही परुळ्याला येऊन पोहोचत असू. वाटेत आईच्या ओळखीची अनेक माणसे भेटत. त्यात सादळकरीण नावाची एक बाई आईला भेटत असे व चंपूला म्हणजे आमच्या आईला करवंदे, सोललेले ओले काजू असे काहीतरी द्रोणातून देत असे. चंपू येणार ही वार्ता दोन दोन दिवस आधी परुळ्यात पोहोचत असे.

आमचा लवाजमा घरासमोर पोहोचला म्हणजे स्वागताला एका बाजूला आजी व राजा मधे साढळकरीण व दुसऱ्या बाजूला हरी बाळा मास्तरची घरची माणसे. मी अनेक ठिकाणी फिरलो. माझे ताज प्रेसिडेंट, ओबेराय त्याचप्रमाणे सातारा, नागपूर या ठिकाणी सत्कार स्वागत पण झालं आहे. पण हे जे आमचे स्वागत परुळ्याला होत असे त्याला तोड नाही.

मला लहानपणापासून परुळ्याबद्दल जे आकर्षण आहे ते जेवणा–खाण्याचं नाही. ढोणीवर आंघोळ करणे, डोंगरात जाणे, वेतोबाच्या, आदिनारायणाच्या गौरिशंकराच्या किंवा वराठीच्या देवळात जाणं किंवा बांद्यावर जाऊन समराङ्गात भाग घेणं या गोष्टीत

मला फार उत्सुकता असायची. त्याचप्रमाणे हरीच्या माडीवर जाऊन झोपाळ्यावर बसणं, बागेचं शिंपण पाहात बसणे, नाराळाचा पाडा पाहात बसणे, विहीरीत डुंबणं, धावत अल्युमिनीयमची कथली घेऊन भटाच्या आवाठात जाऊन दूध आणणं, अर्थात भाईबरोबर किंवा वसंतमामाबरोबर पोलो फणस खाणं, कैरीची चटणी किंवा हिरवी पिठी आणि पेज जेवण ह्या गोष्टीत मला जास्त आनंद मिळत असे. रघूमामांना करमट आवडत असे. मग कच्चे आंबे, बोंडू यांची मनसोक्त करमट खाणं. परुळ्यात मी वाढलो नाही. माझं जाणं प्रासंगिकच असायचं. पण काय कोण जाणे परुळ्याबद्दल मला एक गूढ आकर्षण आहे.

परुळ्यात असताना दिवस एका वेगळ्या वातावरणात सुरू होत असे. सकाळी साखरझोपेत असताना आपा आजोबांच्या गंभीर आवाजात भूपाळ्या सुरू होत असत. ''उठि उठि बा दत्तात्रेया भानु करू पाहे उदया'' ह्या शब्दांनी आपांच्या भूपाळ्या सुरू होत असत. वातावरण एक वेगळ्याच तऱ्हेनं भारावून जात असे. आपांचा आवाज हळू हळू चढत जात असे. त्यात पक्ष्यांचा मधे मधे टूऽऽक टुऽऽक असा आवाज येत असे. मग सावकाश आम्ही उठत असू व चहा झाल्यावर काजीत तरी जात असू किंवा शिंपण्याची तयारी करीत असू. दहा वाजता पेज व बारा वाजता आजोबांच्या पंगतीत बसून जेवण. मासे असताना फक्त वाणशीत (बाहेरची जागा) आजोबा सोडून आमची जेवणं होत असत. देवाच्या खोली समोरून मासे घरात आणले जात नसत.

दुपारी चहा झाल्यावर सादळकरणीच्या घरात भुतांच्या देवचाराच्या गोष्टी करणं किंवा करवंद काढण्यासाठी डोंगरात जाणं, संध्याकाळी आदिनारायणाच्या देवळात किंवा वेतोबाच्या देवळात जाणं. वेतोबाच्या देवळात देवाला कौल किंवा प्रसाद लावायची कामं होत असत. गाऱ्हाणं ऐकताना आम्ही भयभीत व भारावून जात असू.

परुळ्याला प्रथम एक फोनोग्राम होता. त्याला पितळीचा प्रचंड कर्णा पण होता. रघुमामा, वसंतमामा प्लेट लावून फोनोग्राम चावी देऊन चालू करीत असत.

मग 'नको रे कृष्णा रंग फेकू चुंदडी भीजते'

किंवा

'हवास मज तू हवास'

किंवा

‘वारा फोफावला दर्या उफाळला’

अशी अनेक गाणी तबकडीवर वाजविली जात. त्यावेळी ही सगळी गाणी माझी पाठ होती. आईला या गाण्याची आवड होती. ती मधे मधे अनेक गाणी गुणगुणायची. त्यात ‘परवशता पाश दैवे’ हे अगदी आवडतं गाणं ती गुणगुणायची. काळोख पडला म्हणजे संध्या आणि स्तोत्र. वसंतमामांची संध्या आटोपली म्हणजे स्तोत्रे सुरू होत असत. त्यात ‘भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती’ हे स्तोत्र असायचं. नंतर ‘ कोरोत को रुद्रे मोद बभ्रू कृष्णशनय स्पिंगल मंद सौरी’ असे काही न समजणारे शब्द होते. मी भागवत वाचून पाहिलं. अनेक मराठी व संस्कृत श्लोक पण वाचले. पण वरील प्रकारची शब्द रचना असलेलं स्तोत्र मला सापडलं नाही. हे बहुतेक रुद्राचं म्हणजे शंकराचं स्तोत्र असतं, पण आपा ते वसंतमामांकडून पुन्हा पुन्हा पाठ करून घेत असत. ही स्तोत्रं चालू असताना भुकेने पोटात आग उठत असे. कित्येकवेळा डोळ्यावर झोप पण येत असे पण स्तोत्रं संपत नसत. कारण स्तोत्र संपल्यावरच जेवणे होत असत.

सकाळी आंघोळ करून आपा–आजोबा साधारणपणे साडेदहा वाजता पुजेला बसत असत. ही पूजा जवळ जवळ दीड दोन तास चालत असे. दर्जेदार आवाजात – शिवलिलामृताचं पठण होत असे व नंतर दत्त दिगंबरा. कधी कधी गुरुचरित्राचं पारायण. मधे जेवण करायच्या थोडं आधी वहिनी–आजीची तुळशीवृंदावनाची पूजा होत असे. तुळशीला प्रदक्षिणा घातल्यावर पितळीत काजुगराचा प्रसाद असे. ह्याच्यावर ताव मारणे हे आमचं काम. बाराही महीने काजूगर व साखर यांचा प्रसाद किंवा नैवेद्य ती दाखवीत असे.

परुळ्याच्या ओट्यावर नारळ व सुपारी नेहमी असायची. आजोबा नारळ सुपारीची विक्री करीत असत. नारळ गडी सुळक्यावर सोलीत असत. एका मिनिटात तीन चार नारळ ते सुळक्यावर सोलताना पाहून मजा वाटायची.

आपांनी मध्यंतरी पेंड विकायचा धंदा केला. मला वाटतं वेंगुर्ल्याच्या काकांकडून ही पेंड येत असावी व आपा ही पेंड परुळ्यातल्या लोकांना विकत असत.

आपांचा पोशाख म्हणजे डोक्याला पांढरा शुभ्र रुमाल बांधणं वा पांढरं धोतर व

अंगात लांब बाराबंदी कोट. तोंडात नेहमी दत्ताचं नांव. आपांची उंची भव्य होती. त्यांना चांगलं व्यक्तिमत्व होतं. गणीतात ते हुशार होते. जुन्या खटल्यांची त्यांना माहिती होती व त्यांचा दरारा काही और होता.

एके दिवशी मी परुळ्याला असताना आपा पेडणेकर एका उंच झाडावरून पडला व त्याचा गुढगा तुटून रक्त वाहात होतं. आपांना बातमी कळल्याबरोबर आपा वेळणीत साखर घेऊन पेडणेकरच्या घरी व्हाळ ओलांडून धावले व त्याला साखर खायला देऊन त्याची चौकशी करून आले. आपा पेडणेकर व त्याची बायको भागला ही घरातली सगळी कामं करीत असत.

आपांचा आहार अतिशय सात्विक व नेहमी शाकाहारी असायचा. जेवणात पहिल्या भाताबरोबर भरपूर साजूक तूप असायचं. तूप भात जेवल्यावरच आमटी भात जेवला जात असे. नैवेद्याचे ताट म्हणजे त्याचं जेवणाचं ताट. आपा कधीतरी कवड्याचं मटण खात असत. शेवटपर्यंत एक उत्कृष्ट जीवन निदान स्वत:पुरते तरी ते जगले. ते ९५ वर्षे जगले. नेहमी ते स्वच्छ धोतर नेसत. पंचा वगैरे आयुष्यात ते नेसले नाहीत. उतारवयात म्हणजे वयाची पंच्याहत्तरी ओलांडल्यावर पण ते गाणगापूर, पंढरपूर, औदुंबर या ठिकाणी जात. त्यांची दत्तावर प्रचंड श्रद्धा होती. ते भक्तीमार्गी वगैरे नव्हते किंवा गूढ विद्या वगैरेवर त्यांचा विश्वास नसावा. किंबहूना त्यांना त्याची आवश्यकता पण भासली नसावी. तीर्थयात्रेला जाताना आजी व नातू श्री त्यांच्याबरोबर असायचा.

आपा एक समृद्ध जीवन जगले. त्यांचं वाचन मला वाटतं शिवलीलामृत किंवा गुरुचरित्राच्या पलीकडचं नसावं. गीता, ज्ञानेश्वरी यात त्यांनी कधीकाळी इंटरेस्ट घेतला असं वाटत नाही. त्यांनी दैववादावर विश्वास ठेवून आपलं जीवन व्यतीत केलं असावं. ते एक प्रखर बुद्धिमान व्यक्तिमत्व होतं. वाणी अतिशय शुद्ध होती. श्रीमंतीत जन्मलेले होते. बेळगावात मला वाटतं त्यांनी आपली पेढी स्थापन केली होती. कदाचित १९२८/२९ च्या अमेरिकेच्या डिप्रेशन मधे त्यांना खोट लागली असेल आणि मग ते बेळगाव सोडून दैववादी बनले असावेत.

त्या काळात स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. पण आपांनी कधी त्यात भाग घेतलेला दिसत नाही.

आपांना पहिल्या पत्नीपासून दोन मुलं झाली. त्यात नानामामा म्हणजे पुरुषोत्तम

गोविंद परुळकर व दुसरी आया मावशी. नानामामा कायमचे मालवणला राहायला गेले. आया मावशीचं लग्न परुळ्यातल्या एका समृद्ध व्यक्तीशी झालं. आया मावशीला मला वाटतं दोन मुली व एक अनंत नावाचा मुलगा. या मुलाची कल्याणला दुधाची डेअरी आहे.

आया मावशी हे एक लाघवी व्यक्तिमत्व. लहानपणी परुळ्याला असताना मे महिन्यात कोणत्यातरी निमित्ताने एकदातरी आम्ही सगळी तिच्याकडे जेवायला जात असू. तिचं घर व वाडी चांगली होती. केशवपन केलेल्या या मावशीचा आवाज दर्जेदार होता. मला ती मुंबईला म्हणजे ठाण्याला पण भेटली होती. आमच्याबद्दल तिला माया होती.

नानामामा परुळ्याला विशेष येत नसत. पण त्यांची मुलं मधे मधे येत असत. नानामामांचा ओढा वेंगुर्ल्याच्या काकाकडे असायचा. ते शेवटपर्यंत अतिशय गरीब जीवन जगले. मुलं पण त्यांना फार झाली. ही मुलं मळगावला म्हणजे आमच्या घरी येत. त्यांचं आजोळ सावंतवाडीच्या डिग्याजवळ होतं. नानामामा मळगावला खूप वेळा येत असत. त्यांची आठवण म्हणजे पितळीच्या मोठ्या तबकात हळद व पाणी टाकून मला दाखविलेले सूर्य ग्रहण.

•••

आईला सख्खे असे चार भाऊ. त्यात आबामामा (सदाशिव) नंतर विष्णुमामा (विष्णुपंत), रघुमामा (रघुनाथ) व सर्वात शेवटचे वसंतमामा (तुलसीदास). आबा व वसंतमामा 'परुळेकर' हे आडनाव लावत असत तर विष्णु व रघुमामा 'सामंत' लावत असत. आमच्या मामांत आवडतं व्यक्तिमत्व म्हणजे आमचे विष्णुमामा. आई बेळगावच्या गोष्टी सांगताना, ती आणि विष्णुमामा प्रभात फेरी कशी अटेंड करायचे, काँग्रेस विहीरीवर कसे जात व 'लेंगे स्वराज्य लेंगे' गाणं म्हणत प्रभात फेरीला जाण्याचं त्याचं व्रत, ह्या गोष्टी मला सांगायची. विष्णुमामा मुंबईला नोकरीला होते. मला वाटतं १९४५ सालापर्यंत ते मुंबईला असावेत. ह्याच दरम्यान आईच्या सांगण्यावरून मी त्यांना माझ्या अक्षरात पहिलं पत्र लिहिलेलं आठवतं. त्यांचा मुंबईचा पत्ता मला त्यावेळी पाठ होता.

श्री विष्णु गोविंद सामंत

C/o. टाटा मेमोरियल हॉस्पिटल,

परळ, मुंबई.

मुंबईहून किंवा बेळगावहून येऊं देत, विष्णूमामा मळगावला येत असत. त्यांची ही बांधिलकी वाखाणण्यासारखी आहे.

मला १९४८/४९ ची गोष्ट आठवते. त्यावेळी मला वाटतं मामी बाळंतपणासाठी वगैरे मालवणला गेली असावी. विष्णुमामा आणि मी बरेच दिवस परुळ्याला होतो. रोज संध्याकाळी आजी गायीचं दूध काढीत असे. विष्णुमामा वासराला घेऊन उभे असत. तांब्यात धारोष्ण दूध जमा झालं म्हणजे एक कपभर ते धारोष्ण दूध पीत असत. विष्णुमामांना श्रीखंड चांगलं करता येत असे. एकदा परुळ्याला त्यांनी मला प्रात्यक्षिक करून दाखविलं. मी ते श्रीखंड भरपूर चाखलेलं आहे.

विष्णुमामांबद्दलची परुळ्याची दुसरी आठवण म्हणजे मला पोहायला शिकविण्याचा प्रयोग. विष्णुमामा परुळ्याच्या विहीरीत पोहत असत. एकदा नारळाच्या सुक्या बोंडाची माळ त्यांनी बनविली व मला कंबरेत बांधायला सांगितलं व मला विहरीत उतरविलं. मी त्यावेळी तरंगायला शिकलो नाही. पण मला एक तऱ्हेचा आत्मविश्वास आला होता. ह्याच प्रयोगावर मी मळगावला तुडुंब भरलेल्या विहीरीत उडी मारली. मला कोण जाणे उडी मारताना वाटलं होतं की मी वरती येणार. आणि मी पोहायला शिकलो.

परुळा मुक्काम संपवून विष्णुमामाना याचवेळी बेळगावला जायचं होतं. सकाळी वहीनी-आजीने काहीतरी फराळ करून दिला होता. मला वाटतं लाडू आणि चपाती असं काहीतरी असावं. झालं. आम्ही सकाळी चालत पाटाला निघालो. पाटातून त्यावेळी एकच मोटर कुडाळास जात-येत असे. काही कारणाने ती मोटर त्यादिवशी आली नसावी, किंवा आम्हाला चुकली असावी. विष्णुमामांना पाटातून परत यायचं नव्हतं. मग मला त्यांनी विचारलं, जाऊया का कुडाळला चालत? मला काय मी हो म्हटलं. निघालो एका आड वाटेने दहा वाजण्याच्या सुमारास कुडाळला पोहोचलो. कुडाळवरून सावंतवाडीला आम्हाला मोटर मिळाली. सावंतवाडीत आल्यावर आम्ही गणपुलेच्या खाणावळीत जाऊन यथेच्छ जेवलो. पुरीभाजी असं काहीतरी खाल्लं. तिथून मला त्यांनी वहिनी-आजीने दिलेला फराळ घेऊन मळगावला जायला सांगितलं व ते स्वत: बेळगावला जाण्यासाठी - पार्वती मोटर सर्विस स्टँडवर गेले. हा माझा पहिला चालत केलेला मोठा प्रवास.

विष्णुमामा त्या काळात वर्षातून एकदा तरी आपल्या बहिणीला म्हणजे आमच्या आईला भेटून जात असत. ते कधी भेटवस्तू वगैरे आणीत नसत. पण आईला न चुकता पैसे देऊन जात असत. असे साठलेले पैसे आईने मला दाखविले आहेत. कित्येकवेळा विष्णुमामा व मामी एकत्र आमच्या घरी येत. मामी घरी आली म्हणजे मला किंवा कुणालातरी पँटचं किंवा शर्टाचं कापड देत असे. मालवणहून आली तर विलायती जाम, निर फणस असं काहीतरी आणीत असे.

मामी किंवा मामा विशेषत: विष्णुमामा आले तर मी सावंतवाडीला मोटर स्टँडवर त्यांना सोडायला जात असे. त्यावेळी राणी पार्वती देवी मोटर सर्व्हिस ही एकमेव मोटर सर्व्हिस बेळगावला जात असे. अशा एका ट्रीपमधे मी मामीला स्टँडवर सोडण्यासाठी गेलो होतो. मोटर सुटता सुटता मामीने माझ्या हातात पसाभर काजूगर दिले. ह्या काजूगरांनी चड्डीचे दोन्ही खिसे भरले होते, पण सावंतवाडीहून चालत मळगावला येईपर्यंत मला वाटतं त्यातले दहा बारा काजुगर पण शिल्लक राहिले नाहीत. वाटभर मी काजूगर खात चालत होतो.

त्याकाळात आबामामा येत असत. पण अगदी क्वचितच. एक दोनदा भाई व आबा मामा एकत्र आल्याचं आठवतं. कदाचित बेळगावला जाण्यासाठी मोटर मिळाली नाही म्हणून. आबामामाबद्दल मला एक भीतीदायक आदर होता. माईची

(आबामामांची बायको) व माझी, मी मळगावला असताना विशेष ओळख नव्हती.

आबामामा मला वाटते परुळेकर म्हणजे माझ्या मामांत मॅट्रीक झालेले पहिले गृहस्थ असावेत. नानामामा बहुतेक मॅट्रीक नसावेत. आबांचं मोडी अक्षर अतिशय सुंदर होतं. किंबहुना ते देवनागरीत लिहीत नसावेत. त्यांचं इंग्रजी अक्षर पण स्वच्छ व पल्लेदार होत. टोपी-काळी, कोट, पांढरं धोतर असा साधा पोषाख ते करीत. त्यांना फक्त विडी ओढायचं व्यसन होतं. ते दर मंगळवारी म्हणजे दुकानाच्या सुटीच्या दिवशी न चुकता सिनेमाला जात. पहिल्यांदा पहिल्यांदा ते फक्त कपिलेश्वराच्या आणि दत्ताच्या देवळात सकाळी दुकानावर जाताना न चुकता जात असत. नंतर घरातील पुजेचं प्रमाण फारच वाढलं. रोज दोन तास सकाळी शिवलीलामृत वाचणं, कधीतरी गुरुचरित्राचं पारायण अशात ते गुंतलेले असायचे. त्यांचं इतर वाचन फारसं नव्हतं. वादविवादात ते क्वचितच भाग घेत. दैवावर विश्वास ठेवून ते प्रत्येक दिवस जगत असत. कसल्याही तऱ्हेचा आजार त्यांना नव्हता, कसलाही छंद पण नव्हता.

विष्णुमामा हे दुसरे गृहस्थ ह्या घरातून मॅट्रीक पास झालेले. मला वाटतं मॅट्रीक झाल्यावर ते मुंबईला जाऊन नोकरीस लागले. नंतर त्यांनी मुंबईतच एका सुसंस्कृत घराण्यातील सुविद्य मुलीशी लग्न केलं. हे पाटकर घराणं मालवणात प्रसिद्ध होतं. सगळे लोक शिकलेले होते. आमची मामी पण लग्नाच्या आधी शिक्षिका होती.

विष्णुमामांना पण कोणतंही व्यसन नाही. स्वच्छ खादीची टोपी, धोतर आणि खादीचा किंवा साधा कोट हा त्यांचा पेहेराव. आमच्या मामांत कुणालाही जसं वाईट व्यसन नाही तसा एखादा चांगला छंद पण नाही. त्यामुळे खिलाडूवृत्तीचा तसा अभाव. पण विष्णुमामात थोडीशी खिलाडुवृत्ती होती. त्यांचं वाचन पण थोडंसं होतं. ते एकेकाळी प्रभातफेरीत वगैरे भाग घेत असत. स्वातंत्र्य चळवळीबद्दल त्यांना आत्मीयता होती. ''ग्लीम्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी'' हे पं. जवाहरलाल नेहरूंचं पुस्तक त्यांच्या संग्रही होतं. रोज न चुकता ते वर्तमानपत्र वाचीत असत. त्याचप्रमाणे वर्षातून एकदातरी ते आपल्या फॅमिलीला घेऊन पिकनिक काढीत असत. मी बेळगावात असताना त्यांच्याबरोबर गोकाकचा धबधबा पाहिला आहे. त्यानंतर दोनतीन वेळा रामटेक ह्या बेळगावपासून जवळच असलेल्या ठिकाणी पण गेलो आहे. ते विनोदी नाहीत पण गंभीर पण नाहीत. मामी व त्यांना कौटुंबिक बांधिलकीची चांगली जाण आहे. दोघांनीही उपहासाला टिकेला आणि टिंगलीला तोंड दिलं पण त्याला महत्त्व दिलं नाही. शक्य ते

सगळे रिती-रिवाज पाळीत आलेले आहेत. पडत्या काळात त्यांनी मनाचा तोल ढळू दिला नाही. त्याचप्रमाणे कोणतीही रिस्क पण घेतली नाही.

लहानपणी सगळ्या नातेवाईकात मामा हेच आमचे आदर्श होते. आबामामा सोडले तर नानामामापासून वसंत मामापर्यंत सगळे आमच्याशी मिळून मिसळून वागत होते. एक आठवण तर मला अशी आहे की रघुमामा, विष्णुमामा व वसंतमामा एकाच वेळी आमच्या घरी आले होते. मी त्याकाळात बहुतेक सहा-सात वर्षांचा असेन. राजा बहुतेक दोन वर्षाचा असावा. मी थोडासा लाडावलेला होतो असं मला वाटतं. रघुमामा राजाला आपल्या पोटावर घेऊन त्याचं भविष्य सांगत होते. - राजा पुढे कसा होणार वगैरे त्याचवेळी मी काहीतरी मस्ती केली असावी. रघुमामा एक छोटीशी शिर्टी घेऊन मला मारायला आले. मी सगळीकडे धावत होतो. शेवटी आमच्या गणपतीच्या खोलीत मी शिरलो व आतून कडी लावून घेतली. रघुमामांनी बाहेरून काठी किंवा पातळ पट्टी घालून ती कडी काढून मला मारल्यावर मी भोकाड पसरलं. याबद्दल मला पुढे कधीही वाईट वाटलं नाही. किंवा कुणाबद्दल मी रागद्वेष धरून राहिलो नाही. सांगण्याचं तात्पर्य, आमचे मामाशी घनिष्ट संबंध होते.

ह्याच काळातली दुसरी आठवण म्हणजे माझी सरमाळी हरवणे. माझ्या कंबरेत लहानपणी चांदीचा करगोटा (सरमाळी) असायची. एकदा परुळ्याला असताना गडी नारळ सोलीत होते. बाहेरच्या खोलीत ती सरमाळी घेऊन हातातून गोल गोल फिरवीत असताना माझ्या हातातून निसटून कुठेतरी नारळाच्या राशीत पडली. खूप शोध घेतला पण शेवटी कायमची हरवली.

•••

# भाई

आमचा भाई ह्याला भाई हे नाव कोणी ठेवलं हे मला माहीत नाही. त्याचा जन्म बेळगावला झाला. त्याचं बाबांनी ठेवलेलं नाव यशवंत, परुळ्याच्या आजोबांनी ठेवलेलं नाव बाळकृष्ण. त्याला सगळे जण बाळ्या म्हणून हाक मारायचे. मला वाटतं तो ५ मार्च १९६३ च्या मानाने शिरोडा-रेडी येथे नोकरीत असताना त्याचं नाव भाई ठेवलेलं होतं.

भाईचं शिक्षण मळगावला शाळेत-चौथीपर्यंत झालं. अर्थात तो कधीच कोणतीही परीक्षा पास झाला नाही. तो चढत गेला. चौथी नंतर आईने त्याला पुढच्या शिक्षणासाठी परुळ्याला इंग्रजी पाचवी ते सातवीपर्यंत पाठविले. १९४३/४४ साली भाई परुळ्याला शिकायला गेला होता. आमच्या गावच्या शाळेत फक्त मराठी चौथीपर्यंतच शिक्षण मिळत होतं. हा काळ अंधुकसा आठवतो. ह्या काळात भाईची परुळ्याहून पत्र आलेल्याची पण आठवतात. तो परुळ्यात खूष नव्हता. विशेषत: त्याला आमच्या घरात जसं जेवण मिळत होतं तसं जेवण परुळ्यात मिळत नव्हतं. परुळ्यात फक्त दोन म्हतारी माणसं होती. ती म्हणजे आपा-आजोबा व वहिनी-आजी. दुसरं दोघेजण शाकाहारी जेवणारी, त्यामुळे भाईची पंचाईत व्हायची. भाई इथे अभ्यासाव्यतिरिक्त गाईला पाला घालणे, डोंगरात जाणे अशी कामं करायचा. भाईला कधीतरी बाहेर खाण्यासाठी पैसे लागतील म्हणून मी आईच्या सांगण्यावरून दुकानाच्या पेटीतले दोन रुपये काढून भाईला पाकीटात घालून पोष्टाने पाठविल्याचं आठवतं. त्यावेळी भाईबद्दल एक विशिष्ट आदर होता. आमचा भाई जणू काही उच्च शिक्षणासाठी परदेशी गेला आहे असं वाटायचं, कारण गावातून शिक्षणासाठी बाहेर पडलेली त्या काळात तरी ती एकमेव व्यक्ती असावी. नंतर तो बेळगावला गेला तेव्हा तर आम्हाला वाटायला लागलं की शिक्षणाच्या बाबतीत आमचं घर म्हणजे एक प्रतिष्ठित घराणं आहे. आम्हाला भाईबद्दल अतिशय अभिमान वाटायचा.

१९४६/४७ सालात भाई परुळ्याचे शिक्षण संपवून बेळगावला सेंट्रल स्कूलमध्ये पुढच्या शिक्षणासाठी गेला. मग काय आमचं स्टँडर्ड खूप उच्च कोटीला पोहोचल्यासारखं वाटायला लागलं. आम्ही कोणीतरी मोठे आहोत असं वाटायला लागलं. मग भाई दरवर्षी मे महिन्याच्या सुटीत येत असे. त्याचे कॅन्व्हासचे पांढरे बूट इस्त्रीचे कपडे पाहून आम्ही चकीत होत असू. त्याला जरा पण त्रास होऊ नये, त्याने

हलकीसलकी कामे करू नये असं आम्हाला वाटायचे. साजग्या आणि मोगऱ्या गाबतिणीला आई मुद्दाम त्याच्यासाठी मोरी व इतर चांगली मासळी आणायला सांगत असे. त्याची प्रकृती सुधारावी म्हणून बोकडाच्या दुधाचा रतीब पण लावीत असे. भाई रोज चार वाजता आपले कपडे इस्त्री करून व बुटांना पांढरा रंग लावून चौकीवर आबा सुताराबरोबर जाण्याची तयारी करीत असे. मग कधीतरी आम्ही त्याच्या मागून फिरायला जात असू. पण आबाच्या आणि त्याच्या गोष्टी गहन विषयावर चालत असायच्या. त्यामुळे आम्ही त्यात भाग घेत नसू. भाई इंग्रजी शाळेत शिकत असल्याने आईला व बाबांना आमच्या शिक्षणाची फिकीर नव्हती. कारण कोणीतरी कुटुंबात एवढा मोठा होत आहे याबद्दल दोघांनाही सात्विक आनंद होता.

मला समजायला लागल्यापासून भाई आणि मी मळगावला असे सलगपणे राहिलो नाही. भाई परुळ्याहून किंवा बेळगावहून सुट्टीत यायचा त्याचवेळी हा योग यायचा. मराठी चौथीपर्यंत भाई मळगावात असतानाचे भाईचे दोस्त म्हणजे सहदेव नाईक, रामू मासळणकर, शेर्लेकर, मंगेश नार्वेकर, गंगलो नार्वेकर, अंतो सुतार, सहदेव नाईक हा कैऱ्या आणून द्यायचा. रामू मासळणकर हा गवतापासून छान पडल्या बनवायचा. शेर्लेकर हा चिपळ्या तयार करून देत असे. नारायण गावकर पण सहा सेलची टॉर्च घेऊन आमच्या घरी येत असे. हा कवडे मारण्यात प्रसिद्ध.

भाईची पहिली आठवण म्हणजे एकदा मी मोसंबी अर्ध खाऊन राहिलेलं त्याच्याकडे ठेवायला दिलं. नंतर दुसऱ्या तिसऱ्या दिवशी त्याला मी आठवण केली. तो लगेच म्हणाला 'अरे ते झुरळांनी फस्त केलं.'

•••

## बालपण व शाळा

१९४४ च्या दरम्यान मी मळगावच्या मराठी शाळेत प्रवेश घेतला. मला आठवतं की एक दिवशी सकाळी आजीने पडणेकर मास्तरांना सकाळी शाळेत जाताना रस्त्यावर थांबविलं व बेबीला व मला शाळेत घालण्याचा विचार तिने बोलून दाखविला. लगेचच ती आम्हाला शाळेत घेऊन गेली व शाळेत आमची नावं नोंदविली. बाबांनी सावंतवाडीहून पाटी पेन्सिली आणून मला पहिल्यांदा 'श्रीगणेशाय नम:' हे शिकवले. मला ''श्री'' हे अक्षर पाटीवर लिहीता येत नव्हतं म्हणून बाबांनी मला मांडीवर घेऊन हातात पाटी दिली व माझा पेन्सिल पकडलेला हात आपल्या हातात घेऊन श्री कशी गिरवावी हे शिकवलं. मला हा प्रसंग अजून चांगला आठवतो. त्यानंतर भराभर बाराखड्या आई शिकवत गेली. मराठी दुसरीत मला व बेबीला औटकीपर्यंत सगळे पाढे येत होते. अनेक कविता पाठ येत होत्या. त्यात ''शेतकरी होणार आम्ही शेतकरी होणार'' ही कविता संध्याकाळी खळ्यात (घराच्या समोरचा भाग) बसून जोर जोराने आम्ही गात असू.

आमचा दुसरा धंदा म्हणजे माडाच्या पिंड्यापासून तलवारी बनविणे व डब्याच्या मोठमोठ्या झाकणाच्या ढाली समजून दशावतारी नाटकात जशी लढाई खेळतात त्या लढाया मांगराच्या पडवीतल्या गवतात किंवा चारिच्या पेंढ्यात करणे. गणपतीच्या दिवसात कळ्या गोळा करणं, दिवाळीत पहाटे उठून सातविनाची साल आणणं.

बाराबलूते हा काय प्रकार आहे हे आज कुणाला समजणार नाही. पण आम्ही हा प्रकार पाहिला आहे व उपभोगला आहे.

त्यावेळी दरवेळी चांभार आमच्या घरी येऊन बाबांच्या, भाईच्या पायांची मापं घेऊन चपला बनवायचा व आणून देत असे. महार खुळखुळ्याचा दांडा घेऊन रात्री फिरत असे. त्यांच्यासाठी आमच्या कुंडाला एक फुटका काचेचा पेला ठेवलेला असे. त्याच फुटक्या पेल्यातून तो चहा पीत असे. वामन सुतार हा आमची सुतारकीची काम करीत असे. कधीकधी सावळो व आबा सुताराचे वडील आमच्या टेबलाला, खुर्चीला पॉलीश करीत असे. दरवाजा वगैरे बसविण्याचं काम करीत असत. आमच्या गावातला हा एकमेव सोनार आमच्या शेजारी म्हणजे शाळेच्या समोर राहात असे. त्याला इंदू व सुसला अशा दोन मुली होत्या. तो वारल्यावर त्याची सगळी माणसं विड्या वळवून अत्यंत दारिद्र्यात जीवन जगत असत. नामदेव न्हावी हा आमचा ठरलेला न्हावी दर

आठवड्याला येत असे. आम्हाला दर महिन्याला त्याच्याकडून केस कापून घ्यावे लागत. तो आपल्या घाणेरड्या पंच्यात मांडीवर आम्हाला डोके ठेवायला सांगे व आमचे केस कापीत असे. आजीची हजामत तोच करीत असे. बाबला मडवळ आमचे कपडे धुवून (फाडून) आणीत असे. श्री धवड दरवर्षी एप्रिल–मे मध्ये येत असे व आपली धवडकी तात्या खानोलकरच्या घराच्या समोर सुरू करीत असे. कोयते, चाकू तो आम्हाला बनवून देत असे. मामा शिंपी आणि मोती शिंपी आमचे कपडे शिवून देत असे. नाना भट, सुर्लेकर भटजी, वामन भटजी हे पुजेला येत असत. नागपंचमीला नाग बनविणे आणि गोकुळाष्टमीला कृष्ण बनविण्याचं काम नेवगी करीत असे. गणपती बनविण्याचं काम गंगलो न्हावी व त्याचे वडील करीत असत. आपा कुलकर्णी गावचा सारा वसूल करीत असत. नेवगीण कुरमुरे बनवीत असे. त्या कुणाही माणसाला त्याच्या कामाबद्दल मोबदला – दुकानातील सामान किंवा भात देणे. हा व्यवहार पैशात क्वचितच व्हायचा.

मळगावात स्वातंत्र्य चळवळीचं कोणतंच वारं नव्हतं. माझ्या लहानपणी बाबा वर्तमान पत्र वाचून वेंगुर्लेकर बरोबर कित्येक वेळा चर्चा करीत असत. मग हिटलरची सरशी. नंतर हिटलरला इंग्लंड धुणी धुवायला लावणार अशी चर्चा ऐकलेली असे. बाबा मोठमोठ्याने वर्तमान पत्र वाचीत असत. मग बाबा नसताना तेच वर्तमानपत्र घेऊन मला वाचता आलं नाही तरी डोळ्यासमोर वर्तमानपत्र घेऊन मी मोठमोठ्यानं वाचल्याचं सोंग करीत असे.

ह्या काळात गावात मुख्य आकर्षण म्हणजे बाबुराव लातयाची सर्कस. विडी कारखान्यातले बहुतेक लोक याच्या सर्कशीत भाग घेत असत. मग रात्री लाठ्या फिरवणं, काठीला चिंध्या बांधून त्यावर घासलेट ओतून त्या पेटविणं व जोरात फिरवणं. पेटलेल्या आगीच्या गोलातून उड्या मारणं असे प्रकार असत.

दुसरं आकर्षण म्हणजे आमच्या घरासमोर वडाच्या झाडाच्या बाजूला नाटकं होत असतं. नाटकाच्या तालमी आधी महिनोन्महिने होत असत. त्यात प्रमुख भाग घेणारे म्हणजे सावळो देवळी व दवश्या भावणीचा मुलगा. दरवर्षी न चुकता एक नाटकाचा प्रयोग होत असे तो म्हणजे ‘‘महारथी कर्ण’’. त्या कर्णाचं काम – सावळो देवळी करीत असे व द्रौपदीचं काम नवशा भावणीचा मुलगा करीत असे. दुसरं नाटक म्हणजे ‘‘उमाजी नाईक’’ या नाटकात उमाजी नाईकची भूमिका शांताराम नाटेकर करीत असे.

दत्तू नाईक पण नाटकात भूमिका करीत असे. दुसरं प्रसिद्ध नाटक म्हणजे ''बाजी प्रभू देशपांडे'' यात बाजीप्रभूची भूमिका वेंगुर्लेकर करीत असत व शिवाजीची भूमिका नारायण नार्वेकर करीत असे. वेंगुर्लेकरांना नाटकात चांगली जाण होती.

या दिवसात विडी कारखान्यामुळे गावात थोडंसं चैतन्य होतं. काही घरं सोडली तर प्रत्येक घरात विडी वळण्याचा धंदा चालत असे. सकाळी उठल्यावर दृश्य काय दिसत असेल तर कुड्याच्या पानाची बंडलं घेऊन लोक कारखान्यातून तंबाकू वगैरे घेऊन येत असत. आमच्या शेजारी सोनारीण, बाबी परब, चंद्रा कावळण व कार्मुला किरिस्तविण या सर्वांच्या घरात अखंडपणे विड्या वळण्याचं काम होत असे. दुपारी जेवण झाल्यावर मी बाबी परबाच्या घरी जाऊन बसत असे. तो भराभर विड्या वळत असे. मग विड्याची तोंडं बंद करण्याचे काम त्याची आई, आजी, बहिणी व माझा मित्र कांतू परब करीत असे. मी पण खोके बंद करण्यास त्यांना मदत करीत असे. मला विडी वळण्यात कुतुहल होतं. पण वळणं कधीच जमलं नाही.

१९४६ पर्यंत आमचा व्यापार बहुतेक चांगला चालत असावा. आमच्या घराला तसं चांगल्या संस्कृतीचं त्यावेळी तरी वरदान होतं. आई सकाळी उठून चूल पेटवीत असे व चहा बनवीत असे. बाबा त्यावेळी तोंड धुवून स्वयंपाक घरात त्यांच्या ठरलेल्या जागेवर बसत असत. मग जर्मन सिल्व्हरच्या कडीच्या पेल्यातून ते चहा पीत असत व दुकानात बसत असत, किंवा सावंतवाडीला जाण्यासाठी सायकल व इतर तयारी करीत असत. कित्येकवेळा आई पहाटे उठून आंबोळ्या करीत असे. ह्या आंबोळ्या ती एक टोपलीभर तरी करीत असावी. सकाळी कित्येकवेळा चहाबरोबर आदल्या दिवशीची शिल्लक राहिलेली भाकरी व सुंगटाचं किंवा मोरीचं असेल तर आम्ही सगळी खात असू. नंतर पेज वाढणं हा आजीचा किंवा प्रेमाचा कार्यक्रम असे. आई आंघोळ करून नंतर मोठ्या रवीने त्याला दोरी बांधून सरासर दही घुसळून ताक व लोणी काढीत असे.

दुपारी इस्वण, कर्लि, पापलेटची आमटी ही असायचीच. संध्याकाळच्या जेवणात भाजणी आमटी म्हणजे मोरि किंवा पांढरी सुंगटं.

बाबा सावंतवाडीहून दुपारी घरी आल्यावर देवाची पूजा करीत असत व मग पाहुणे नसले तर आम्ही स्वयंपाक घरात बसून जेवत असू. माझी, भाईची जेवायला बसायची जागा ठरलेली होती. त्याचप्रमाणे मनोहर, आनाची पण. संध्याकाळी परवचा म्हणणं, कधीतरी दत्ताच्या देवळात जाणे, कंदिलाच्या काचा पुसणं अशी कामं झाल्यावर

देवाजवळ समई पेटविली जात असे. मग बाबा मूड असल्यास 'भीमरूपी महारुद्रा' हे मारुती स्तोत्र कधीतरी म्हणत असत. दुकान बंद केल्यावर रात्रीचं जेवण. मग बाबा कधीतरी दासबोध वाचीत असत. बाबांना हा दासबोध बक्षीस म्हणून मिळाला होता. दासबोध हा ग्रंथ पूजा करण्याचा नाही आहे. तो आचरणात आणण्याचा ग्रंथ आहे. हे बाबांच्या कधीच लक्षात आलं नसावं. किंबहूना कित्येक लोकांच्या बाबतीत हीच कथा आहे.

एका लेखकाने पण लिहिलं आहे त्यात भर घालून मी असं म्हणेन - व्यासांच्या महाभारतानंतर, वाल्मिकीच्या रामायणानंतर आणि ज्ञानेश्वरांच्या भावदीपिकेनंतर, दासबोध हा एकमेव ग्रंथ की कुणीही कोणत्याही विषयावर आणखी साहित्य निर्मिती करण्याची गरज नव्हती. ह्यात तत्वज्ञान आहे. शहाणपणाने जगण्याचा मूल मंत्र आहे. आम्हाला अमेरिकन आणि इंग्लीश साहित्य वाचून मॉडर्न मॅनेजमेंटचे धडे घेण्याची काही आवाश्यकता नाही की जर आम्ही दासबोध वाचला/आम्हाला डेल कार्नेजीची जरुरी नाही. हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. कारण मॅनेजमेंट हा माझा विषय होता. मी त्याचा चांगला अभ्यास केला आहे. अक्षरश: डझनावारी मी ह्या विषयावर पुस्तकं वाचलेली आहेत.

या काळात, डोंगरात जाणं, झाडांची देखभाल करणं, मासे गरवणं या छंदाबरोबर बाबांना आणखी पण छंद होते. त्यात ब्रिज खेळणं. दुपारी मामा शिंद्यांच्या घरात बाबा, मामा शिंपी, वेंगुर्लेकर व खानोलकरांचा भाई किंवा मोहन किंवा दिगंबर तासन् तास ब्रीज खेळत बसत. मी तिथे तासन्तास बसत असे. विड्या आणून देण्याचं काम मी करीत असे.

दुसरा बाबांचा छंद म्हणजे महिन्यातून एकदा सावंतवाडीत सिनेमाला जाणे. आमच्या सायकलवरून बाबा व मामा शिंपी डबल सीटबसून सिनेमाला जात असत. सिनेमाला जाण्यापूर्वी बाबा सायकलचा दिवा स्वच्छ करीत असत. हा एक विशिष्ट प्रकारचा दिवा होता. कधीकधी आम्ही सगळी मिळून सिनेमाला जात असू. मला वाटतं वाडीला पहिला सिनेमा मी पाहिला तो बहुतेक ''दहा वाजले'' असा काहीतरी होता.

१९४६ पर्यंतचा काळ आमच्या कुटुंबाचा उत्कर्षाचा काळ होता. या काळात गावातील प्रत्येक प्रतिष्ठित व्यक्ती आमच्या घरी येत असे. मुंबईतून गावात येणारे श्रीमंत आमच्या घरी येत असत. मुंबईतून गावात येणारे श्रीमंत लोक विशेषत: आमचे

जातवाले आमच्या घरातच उतरत असत. त्यात बाळा बामण आळकर, भाऊ डुकरे, आना वेत्येकर, समस्त पाडगावकर कुटुंब, गोसावी कुटुंब, गोव्याहून येणारे बाळा झारापकर (गणपतीला भाईला फटाके देणारे) श्रीकृष्ण सामळा, लक्ष्मण सामंत, गोव्याचे प्रसिद्ध व्यापारी वालावलकरांची नवी करकरीत ''प्ले माऊथ'' गाडी आमच्या घरासमोर उभी राहात असे. श्री. वालावलकर रात्री गप्पा मारायला येत असे. बापू सादळकर - निलगिरी, बाम, चूर्ण घेऊन आमच्या घरी मुक्काम करीत असे. बापू चिरेकर, आमच्या घरी कित्येक दिवस राहून आमच्या फर्निचरला पॉलीश करीत असे. वालवलीचे देसाई, आजगावची आशी असे किती लोक सांगावे आमच्या घरात विश्रांती आणि पाहुणचार घेऊन गेलेले आहेत.

म्हाळ असला म्हणजे आमच्या घरात कितीतरी ब्राह्मण जेवत असत. त्यात बाळा मास्तर, बाबु पाटकर, मामा शिंपी व गोसावी हे जातवाले असायचे. कित्येक कुळवाड्यांना व महारांना केळीच्या पानातून वाडी देत असू. आम्ही गावात कुणाकडे कधी काही खात नसू. एकदा नाटेकरकडे मी आणि भाईने भजी खाल्ली त्यावेळी तोंडाला वास आला तर घरी आईला कळेल म्हणून आम्ही तुळशीची पाने खाल्ल्याचे आठवतं. एकदा तर मला समोरची बाया की सुसायला किरिस्वावीण उचलून आपल्या घरी घेऊन गेली व मला चहात बुडवून पाव दिला. मला तो आवडला. मी घरी बेबीला येऊन सांगितलं. बेबी बोलली शी-किरस्तावकडे तू पाव खाल्लास मला त्या क्षणी ओकारी आली व भडकून सगळा पाव मी ओकलो होतो.

•••

## पडझडीचा काळ

काळ फार पुढे चालला होता. आमचे दुकान डबघाईला येत होतं. गावडे, नार्वेकर, नाटेकर यांची दुकाने उदयास येऊन चांगली चालत होती. आम्हाला लोकं सांगत की तुमच्यावर कोणीतरी करणी करून घातली आहे. शेजारच्या गावड्याने चालगती आणला आहे. ह्या सगळ्या भाकडकथा ऐकून एक तऱ्हेचे भीतीदायक वातावरण घरी चालू होतं. रघूमामांनी व बाबांनी काढलेलं सावंतवाडीचं दुकान पण बंद पडलं होतं. सर्व कांदे माडाच्या झाडाखाली फेकावे लागले. शेवटी बाबांनी पतपेढीचं कर्ज काढलं. कसेतरी दिवस काढले. आईकडे असलेले सोनं विकलं व दुकान चालू ठेवलं. नंतर बाळा बामणकरकडून रु. २०० कर्ज घेऊन परत दुकानात माल आणला. पण दुकान काही बाळसं धरत नव्हतं. १९४८ साल उजाडलं. एक दिवशी मामा आले व बाबांना बेळगावला घेऊन गेले. बाबांना मला वाटतं डेक्कन सॉ मिल, ठळकवाडी बेळगावला ७० रुपयांची नोकरी मिळाली.

घरात मी, आई, आजी, बेबी, राजा व आपा अशी सहा माणसं. मी त्याचवर्षी पाचवीत गेलो होतो. आमची पाचवीपासूनची शाळा गावात आमच्या घरापासून दोन अडीच मैल दूर होती. मी शाळेत जात होतो. पण घरच्या जबाबदारीची पूर्ण जाणीव होती. सकाळी सात वाजता उठून आई काय भाकरीचा तुकडा, लाडू देईल ते तोंडात टाकून धावत सुटणे. शाळेतून १०-१०.३० वाजता घरी येणे. नंतर डोंगरात जाणे, लाकडं आणणं, त्यानंतर बाळा मास्तरणीकडून एका आण्याचं ताक आणणं. शेवग्याची फुले वेचणं, त्याची भाजी आई करीत असे. उकडा भात जेवून परत दोन वाजता शाळेत धूम ठोकणं. बाबा दर महिन्याला तीस रुपये घरी मनिऑर्डरने पाठवीत असत. त्यात महिना घालविणं हे कठीण होतं. आईला हरतऱ्हेने मदत करणे. त्यामुळे शाळेत जाणं कठीण व्हायला लागलं. सकाळी उठून डोंगरात जाणं, लाकडं विकत घेणं शक्य नव्हतं. डोंगरातून आल्यावर दर आठवड्याला सावंतवाडीला जाऊन रेशन आणणं परत आठवड्यातून एक दोनदा पिठाच्या गिरणीवर सकाळी उठून सावंतवाडीला जाणे. त्यावेळी सावंतवाडीला एकमेव पिठाची गिरण होती. ती इलेक्ट्रीसिटी दहा वाजता आली म्हणजे चालू व्हायची. सकाळी आठ वाजण्याच्या आत रांगेत उभं राहिलं तर बारा वाजेपर्यंत दळण मिळत असे.

सावंतवाडीहून रेशन आणणे ही एक डोके दुखी असायची. कधी कधी तांदुळ आला, साखर आली, मिलो - म्हणजे तांबडी ज्वारी आली किंवा भात आल्याची बातमी पसरल्यावर लगेच पिशव्या घेऊन धावावं लागे. कधीतरी मदतीला बेबी येत असे. एकदा तर कमालच झाली. रेशनवर भरपूर भात मिळालं. त्याने एक सिमेंटचं पोतं भरलं. दुपारी बारा वाजता मी हे पोतं डोक्यावर घेऊन येत असताना माजगावात सुरबा गावकर सायकलवरून येत होता. त्याने मला ओळखलं. मी ओझ्यानं दमलो होतो. त्याने आपल्या लगेज कॅरियरवर हे पोतं ठेवलं. मला पुढे बसवलं आणि घरी आणून सोडलं. कधी कधी प्रभा मेस्त्री सायकलवरून घेऊन जात असे. ह्या लोकांची ही सामाजिक बांधिलकी आठवली म्हणजे अजून त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात; ऊर भरून येतो.

सावंतवाडीहून मळगावला येताना वाटेत थांबण्याचं ठिकाण म्हणजे माजगावचे दत्ताचे देऊळ. तिथे आम्ही थंडगार पिंपळाच्या छायेत बसू. शेजारी दोन विधवा बायका आम्हाला स्वच्छ तांब्यातून प्यायला पाणी देत असत. देवळात भटजी पळीने तीर्थ देत असे.

अशा परिस्थितीत शाळेत रोज जाणं हे कठीण होत गेलं. मी पाचवीत असातानाचा एक प्रसंग आठवतो. एकदा काका मास्तरांनी ''नदी'' या विषयावर निबंध लिहायला सांगितला. निबंध म्हणजे काय ते मला माहीत नव्हतं. पण मी एक पान भरून निबंध लिहिला. काका मास्तरांनी माझ्या निबंधाच्या खाली ''चांगला'' असा शेरा मारला होता. भाई बेळगाववरून आल्यावर मी हा निबंध त्याला दाखविला. तो म्हणाला - दुसऱ्या वेळी तुला ''उत्तम'' असा शेरा मिळायला हवा तोपर्यंत मराठी भाषा ही काय असते ह्याचा गंध मला नव्हता. भाईने ''चांगले'' व ''उत्तम'' ह्याचा हा पहिला वस्तूपाठ मला दिला. पुढे ह्याचा मला फार उपयोग झाला. त्याचं कारण प्रत्येक गोष्ट हातात घेतल्यावर किंवा कुणाला भेटवस्तू द्यायची असेल; वस्तू घ्यायची असेल तर उत्तमात उत्तम वस्तू घ्यावी व द्यावी असं वाटायला लागलं. त्याचप्रमाणे अपयश म्हणून पत्करायचं नाही.

पाचवीपासून माझी भास्कर सुतार, मंगेश गोवेकर, कान्तु परब, मोहन सुभेदार ह्यांच्याशी दोस्ती झाली. आम्ही शाळेत जाताना एकत्र जात असू. आमच्यात सधन

दोस्त म्हणजे मोहन सुभेदार. नवी सायकल घेऊन शाळेत यायचा. आमच्या दोस्तीत वितुष्ट पण येत असे. त्याचं कारण कदाचित मत्सर पण असेल. एकदा काकामास्तर आमच्या शेजारच्या पणदीतून नेहमीप्रमाणे सायकलने जात होते. ते आईला बोलले की ''बाबी'' (मला गावात बाबी म्हणायचे कारण नाव बाबुराव) जरा अभ्यास करील तर सेंटरला व्ह.फा.ला पहिला येईल. पण त्यांना माझ्या परिस्थितीची जाणीव नव्हती. मी घरात एकटाच मोठा पुरुष होतो. मला आईच्या पाठीमागे खंबीरपणे उभं राहायला लागत असे. मग घरात आजार असो किंवा लाकडे फोडण्याचं काम असो.

ह्याच काळात थोडे पैसे कमविण्याची व घरी मदत करण्याची पण स्फूर्ती आली. भाई बेळगाववरून जत्रेच्या वेळी फुगे पाठवायचा. मग ते काका नेवगी विकून द्यायचा. फायदा भरपूर व्हायचा. मुळा, कोबी, फ्लॉवरचं बी लावण्याची मी व मोहन सुभेदारने ठरविलं. भाईने बेळगाववरून बी पाठवून दिलं. अर्थात हा प्रयोग फसला.

त्याचवेळी वासु नार्वेकरने नवीनच भुसारी दुकान प्रभाकर मेस्त्रीच्या गिरणीच्या परिसरात घातलं होतं. त्याने दिवाळीच्यावेळी पतंग विकण्याची टुम काढली. मी त्याच्या दुकानात, मी बनवलेले पतंग विकायला ठेवीत असे. गावड्याचे दुकान चांगलं चालत होतं. त्याच्या मुलात मधू, सुधाकर व विठ्ठल माझे चांगले दोस्त होते. त्यांना स्क्रीप्टी पेन्सिल, चांगले खोडरबर सावंतवाडीवरून मी आणून विकत असे.

आईला संसार चालवणं दिवसेंदिवस कठीण होत होतं. आईची साठवलेली भाऊबिजेची पुंजी संपली होती. मग आपा आजोबा कधीतरी मळगावला येत असत. दोनतीन दिवस राहून भात विकत घेण्यासाठी २५-३० रुपये आईला देऊन जात. त्यावेळी एक बरं होतं साधारण दिवाळीला ४०/५० रुपयांचं भात घेतलं तर भाताचा प्रश्न सुटत असे. मग आई राबत्यांना दुपारी उकडा भात व आमटी देऊन मासळी विकत घेण्याचा प्रश्न सोडवीत असे. मधे कधीतरी विष्णुमामा, आबामामा येत. काही पैसे देऊन जात. त्यामुळे दिवस जात होते.

भाईचे बेळगावला काही चांगले चालले नव्हते. बाबा न चुकता मनिऑर्डर पाठवीत असत. मी शाळा फक्त सोडली नव्हती. कर्मधर्म संयोगाने परिक्षेच्या वेळी शाळेत हजर राहात असे. सहावी पास होऊन सातवीचा पण फॉर्म भरला. त्याचवेळी म्हणजे १९५१ च्या शेवटी भाई बेळगाव सोडून मळगावला आला. आल्याबरोबर भाईने

गणपतीची खोली साफ करून आपलं बस्तान बसविलं. गणपतीच्या खोलीत प्रथम त्याने दिवाळी अंकातील मुळगावकरने काढलेली चित्रे – उर्वशी, रंभा, मेनका यांचे फोटो फ्रेम करून खोलीला एक वेगळं स्वरूप दिलं. सावंतवाडीच्या श्रीराम वाचन मंदिरात नाव घातलं. भाईचं मराठी वाचन चांगलं होतं. लिहिणं सगळ्याच दृष्टीने छान. त्यामुळे त्याच्याकडे पण न. चि. केळकरचं ''कावळा आणि ढापी'', सानेगुरुजींचं ''भारतीय संस्कृतीचा इतिहास'', ''अगस्ती'' त्याचप्रमाणे शांतीलाल भंडारी अशा लेखकांचं साहित्य होतं. श्रीराम वाचन मंदिरातून ''पांढरे ढग'', ''दोन मने'' अशा वि. स. खांडेकरच्या कादंबऱ्या तो आणीत असे. त्याचप्रमाणे गडकऱ्यांची नाटकं. एकदा मोहन खानोलकरने त्याच्या हातातलं गडकऱ्यांचं नाटकाचं पुस्तक पाहिलं. तो म्हणाला असली कसली नाटकं वाचतोस? भाई थोडा ओशाळला. कारण मोहनचं नाणं शिक्षणामुळे थोडसं खणखणीत होतं. साहित्याच्या बाबतीत भाईला मोहन खानोलकरकडून तरी धडे शिकण्याची गरज नव्हती. पण भाई गप्प बसला. मोहन त्याच्या पासंगाला पुरला नसता. पण नाणं?

या काळात बापु चिरकर नावाचा गृहस्थ आमच्या घरी नेहमी जेवायला असायचा. अनेकवेळा त्याच्याबरोबर आम्ही सावंतवाडीला जात असू व कॉफी आणि पापडी खात असू. त्याच काळात आई थोडीशी आजारी पडली होती. तिला बांद्याच्या बाबु डॉक्टरला दाखविली. परत भाई सायकल घेऊन बांद्याला बाबु डॉक्टरकडे गेला. आल्यावर मला म्हणाला ''कुणाला सांगू नको. आईला पंडूरोग झाला आहे'' मी हबकलोच. त्यावेळी पंडू म्हणजे – अनेमिया – थोडासा रक्तक्षय व त्यात तसं सिरीयस काही नसतं. हे माहीत नव्हतं. डॉ. बाबुने तिला वॉटर बरिज कंपाऊंड देण्यास सांगितलं. पैसे तर नव्हते. मग आम्ही शक्कल काढली. दुसऱ्या दिवशी नारायण नार्वेकरकडून दोन सायकली भाड्याने घेतल्या व तुळशीवरून तडक वेंगुर्ला गाठलं. वेंगुर्ल्याचे आजोबा बाबा परुळेकर माडीवर विश्रांती घेत होते. ते खाली आले. मी त्यांना आईच्या आजारपणाबद्दल सांगितलं व घरात पैशांची टंचाई. ते खोलीत गेले. बाहेर आले व माझ्या हातात १५ रुपये ठेवीत म्हणाले, ''हे चंपीला दे'' पैसा हातात पडताच आमचा आनंद गगनात मावेना. हा आयुष्यातला आमचा पहिला जुगार; जर काका आजोबा भेटले नसते की त्यांनी पैसे दिले नसते तर सायकलचं भाडं द्यायला पण आमच्याकडे

पैसे नव्हते. आम्ही वेंगलुर्ल्याहून निघालो तो यशस्वी मोहीम करून आकेरी मार्गे सावंतवाडीला आलो. वाटर बरिज कंपाउंड घेतलं व महत्त्वाचं म्हणजे बारा आण्याची मोरि विकत घेतली व विजयी सम्राटाच्या थाटात घरी आलो. अजूनही काका आजोबांची माया आणि बांधिलकी पाहिली – दुसऱ्याबद्दलची कणव पाहिली म्हणजे त्या माणसापुढे अक्षरश: नतमस्तक व्हावंसं वाटतं. मला वेंगुर्ल्याबद्दल कसलीच ओढ नाही. मी तिथे कधीच राहिलो नाही. देव धर्माबद्दल मला तसा ओढा नाही. तरी पण मी तिकडे गेल्यावर वेंगुर्ल्याच्या घरात जाऊन आल्याशिवाय राहात नाही. त्याचं कारण फक्त आजोबांची स्मृती. त्याला मनोभावे वंदन करणं बरं!

संसार चालविण्यासाठी आईला पैसे कमी पडत असत म्हणून आम्ही मांगर द. म. दीड रुपया भाड्याने एका फॉरेस्ट ऑफिसरला दिला. नंतर त्यात एक फॉरेस्ट रेंजर पण थोडे दिवस राहिला. आईने मग तो एका वतारिणीला मला वाटतं भागला वतारिणीला भाड्याने दिला. कारण तिला पण शेजारी कोणी तरी हवं होतं. आमची दुकानाची खोली खालीच होती. दाजी तांबड्याच्या मुलाला रॉकेल विकण्याचा परवाना मिळाला होता. त्याला आमच्या दुकानात जागा हवी होती. आम्ही त्याला पण महिना तीन रुपये भाड्याने दुकानाची खोली दिली. पण ह्या गृहस्थाने कधीच भाडं वेळेवर दिलं नाही. अनेक खेटे घालून पण भाडं वसूल होत नव्हतं. हा एक हलकटपणाचा नमुना आम्ही त्यावेळी पाहिला.

आमच्या घरात अवजारं तशी फार होती. त्यात अनेक कुऱ्हाडी, कोयते, कोयत्या, पाळ, कुदळ्या, खोरी (फावडी), पाहार, भाताची घिरटं, जाती, उखळ, मुसळ. पेट्रोमॅक्स वगैरे. पण हळू हळू भंगार म्हणून आम्ही हे विकलं. केवळ चरितार्थाला मदत.

दिवस जात होते. भाई बेळगाव सोडून इथे कोकणात नोकरीच्या शोधात होता. मी जवळ जवळ शाळेला रामराम ठोकला होता. कारण अभ्यास करायला शाळेत जायला वेळ नव्हता. गावात तशी शिक्षणाची स्फूर्ती घ्यावी असं कोणीच नव्हतं. मला पण शिक्षणाचं महत्त्व कोणी सांगितलं नव्हतं. आई अगतिक. फक्त मी व्ह.फा.चा फॉर्म भरला होता.

अशा ह्या नैराश्याच्या काळात एक दिवशी मी, भाई व बापू नेवरेकर सकाळी उठून मेटातून सावंतवाडीला जात होतो. मेटात आमचे काका मास्तर मला पाहून क्षणभर थांबले. त्यांनी माझी अगदी वाईट शब्दात अभ्यास करीत नाही म्हणून चंपी काढली. त्यांनी मला विचारलं ''शरम नाही वाटत शाळा सोडून भटकायला?'' तोपर्यंत मी अभ्यासाचा व व्ह.फा.ला पास होण्यासाठी बसायचा विचार पण केला नव्हता. पण इथे माझा अपमान झाला होता. एक तऱ्हेची उर्मी आली होती. ''ह्या मास्तराला आपलं पाणी दाखवावं'' कर्मधर्मसंयोगाने भाई ह्याला साक्षी होता. त्याला पण वाटलं की मी परीक्षा सिरीयस द्यावी. त्याच दिवशी मी आईकडून एक रुपया घेतला. सगळ्या विषयांचं एक गाईड, एक रुपयात विकत घेतलं. भाईने मला खोलीत कोंडून घेऊन अभ्यास करायला सांगितलं. तो म्हणाला, ''आता प्रत्येक विषयाचं पीठ पाड आणि पास हो.''

त्याचवेळी भाईला बाळा झारापकरला पत्र लिहिण्याची बुद्धी झाली. त्याने आपल्याला नोकरी हवी म्हणून एक सविस्तर परिस्थितीचं पत्र बाळा झारापकरला लिहिलं व माझ्या हातात दिलं. आम्हाला कल्पना नसली तरी स्मगलींच्या बाबतीत तो सुकाळ होता. बाळा झारापकर रोज आमच्या घरावरून सर्व्हिस मोटरने जात असे. एक दिवशी मी ते पत्र मोटरमधून जात असताना त्यांच्या हातात दिलं. संध्याकाळच्यावेळी मी सहज गावड्याच्या घरावरून चालताना त्याचे पाच कपटे रस्त्यावर विखुरलेले सापडले. दुसऱ्या दिवशी मी आमच्या खळ्यात उभा असताना सर्व्हीस मोटारमधून बाळा झारापकरने मला हात केला. मी जवळ गेलो. त्यांनी माझ्या हातात दहा रुपयांच्या पाच नोटा भाईला देण्यासाठी दिल्या. भाई खूष. त्याला म्हापशात (गोव्यात) जायचं जणू लायसन्स मिळालं होतं. दुसऱ्या दिवशी तो म्हापशाला बाळा झारापकरकडे गेला. चार दिवसांनी चार चार आण्याची अनेक नाणी खुळखुळत आणि एक निळा-इंग्लीश कापडाचा शर्ट घेऊन आपल्याला मणेरीला नोकरी मिळाल्याची गोड बातमी घेऊन आला, हा सर्वात आनंदाचा दिवस होता.

मी व्ह.फा.चा अभ्यास करीत होतो. १९५२ च्या जानेवारीत परीक्षा होती. मला काही मोठ्या अपेक्षा नव्हत्या. पण सगळ्या विषयांना बसून पराकाष्टेचे प्रयत्न करायचं ठरविलं होतं. सकाळी नऊ वाजता आई भाकरी गुळ असं काहीतरी बांधून देत असे. मी

रोज चालत जात असे. सावंतवाडीला राणी पार्वती देवी हायस्कूलमध्ये परीक्षा होती. सकाळी पेपर लिहिणे, दुपारी निळूच्या हॉटेलच्या बाजूला बसून गूळ आणि भाकरी खाणे व दुपारी दुसरा पेपर लिहिणे, संध्याकाळी परत चालत घरी येणे. सर्व पेपर मी लिहिले होते. त्याबद्दल माझेच शाळेतले दोस्त जोरदार चर्चा करायचे. मला त्यात रस नव्हता. कारण मी काका मास्तरांच्या शिकवणीला वगैरे कधी गेलोच नव्हतो. पास नापासाचा विचार पण करीत नव्हतो. बाबा बेळगावला नोकरी करीत होते. भाई आता मणेरीला नोकरी करीत होता. आणखी आपल्याला काय पाहिजे?

त्याचवर्षी म्हणजे १९५२ च्या मार्चमध्ये आईला परुळ्याला जाण्याची हुक्की आली. मी आणि आई परुळ्याला गेलो. मला वाटतं बरोबर आपा (धाकटा भाऊ) पण असावा. त्याच मुक्कामात बाबुराव उर्फ महादेव विठ्ठल परुळेकर मालवणच्या टोपीवाला हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. ते रामभाऊ परुळेकरांचे सख्खे भाऊ व आपा आजोबांचे चुलत भाऊ होते, परुळ्याला आपा आजोबांना भेटायला आले होते. त्यांनी माझी सहज चौकशी केली. मी त्यांना सांगितलं मी व्ह.फा.ला बसलो. त्यांनी लगेच माझा परीक्षेचा नंबर लिहून घेतला. त्यानंतर तीन-चार दिवसांनी आम्ही घरी आलो. एक दिवशी नेहमीप्रमाणे मी काहीतरी सामान आणण्यासाठी सावंतवाडीला गेलो होतो. बाजारात काका मास्तर व इतर सातवीला बसलेले विद्यार्थी दिसले. कुणीतरी मला बातमी दिली की त्याच दिवशी दुपारी सातवीचा म्हणजे व्ह.फा.चा निकाल आहे. मला टेंशन वगैरे काहीच नव्हतं. पण कुतुहल म्हणून मी निकाल पाहायला थांबलो. जवळ जवळ दुपारी एक दीडच्या दरम्यान काका मास्तर गर्दीतून आत घुसले व निकाल पाहायला लागले आणि काय आश्चर्य त्यांनी त्या प्रचंड गर्दीतून आवाज केला.

‘‘बाबुराव लक्ष्मण सामंत तीनशे दहा गुण मिळवून पास’’. बाकी कोणीच पास नव्हते. फक्त कांतू हा दुसऱ्यांदा बसून ३०७ गुण मिळवून पास झाला होता. आयुष्यात अनेक आनंदाचे प्रसंग आले. पण हा जो हर्षवायू व्हायचा प्रसंग ह्याला तोड नाही.

•••



ह्याचं क्रेडीट मी कुणाला देऊ? काकामास्तरांना? की ज्यांनी मला डिवचलं होतं. भाईला? ज्याने मला अभ्यासाचं पीठ पाड व अपमान धुवून काढ म्हणून सांगितलं की बाबुराव परुळेकर ज्यांच्या हातात माझा निकाल होता. कारण निकालाच्या दुसऱ्याच दिवशी त्यांचं पोस्टकार्ड आलं होतं. माझ्या अभिनंदनाचं. माझं व्ह. फा. ला पास होणं ह्याला फार अर्थ होता हे आज मला जाणवतं. तो एक माझ्या आयुष्याचा टर्निंग पॉइंट होता. यक्षिणीची कांडी फिरण्यासारखा.

त्याकाळात व्ह.फा. झालेले आमच्या गावात फक्त दोघे तिघेच होते. त्यात आबा रायकर व गावकर आणि राजूळ. आमच्या शाळेतून पहिल्यांदा पास होणारा मीच.

आमच्या गावात ग्रॅज्युएट होऊन सुस्थितीतला माझ्या ओळखीचा माणूस म्हणजे मोहन खानोलकर. हा त्यावेळी सचिवालयात नोकरीला होता. त्याची आणि माझी थोडीशी दोस्ती होती. त्याच्याबरोबर चौकीवर मी फिरायला जात असे. बाकी गावात वातावरण अगदी गचाळ. सकाळी पंचा, काष्टी नेसलेले लोक रस्त्यावर जमत असत. शिळोप्याच्या गप्पा मारीत. कुठे पैसे असले तर मासे खरेदी करीत व दुपारी घरी निघून जात. रस्त्यावरची दोनचार घरं सोडली तर सगळीकडे दारिद्र्य. त्यामुळे पायात चप्पल नसणे, फाटकी चड्डी घालणे ह्यात काही दुःख वाटत नसे. आमच्या शेजारच्या लोकांना एक वेळ पेज मिळणं पण कठीण असायचं. हे दैन्य पाहून आमचं दुःख सुसह्य होत असे. किंबहुना ते जाणवत पण नसे.

लहानपणीचा कायमचा आठवणीत राहणारा माणूस म्हणजे आबा उसकर. हा दरवर्षी समोरच्या आंब्याच्या झाडाखाली म्हणजे सध्याचं पनु नार्वेकरच्या दुकानाच्या जागेत आपला उसाचा चरक घालून रस विकत असे. त्याच्याशी माझी व भाईची फार

दोस्ती होती. वर्षातून न चुकता तो डिसेंबर जानेवारीत येत असे व उसाचा मोसम संपला म्हणजे बाडबिस्तरा गुंडाळून आपल्या गावाला जात असे.

बाबांनी कधी दुकानाचा जमाखर्च लिहिल्याचं दिसत नाही. पण तांबड्या कापडाच्या वेष्टनात गुंडाळलेल्या किंवा वेष्टन असणाऱ्या कीर्द खतावणीच्या सुप्त लांबलचक वह्यांचं आम्ही दसऱ्याला न विसरता पूजन करीत असू. ह्या वह्यांचा पुढे शाळेत असताना मला उपयोग झाला.

एकदा आमच्या मांगरात (घराची मागची बाजू) एकाएकी साप दिसू लागला म्हणून आम्ही घाबरलो. आमची सगळ्यांचीच तारांबळ उडाली होती. रात्री घरात झोपणं मुष्कील म्हणून आम्ही सगळी बाहेरच्या ओट्यावर त्या रात्री झोपलो होतो. त्याच रात्री एक भुरटा चोर भाईच्या बाकाखाली येऊन बसलेला आम्ही मध्यरात्री पाहिला. भाई घाबरून उठला. मला त्यानं जागा केलं. कोपऱ्यातली काठी घेऊन येईपर्यंत त्याने पोबारा केला होता. मी आणि भाईने त्या चोराला ओळखला होता. पण नंतर कित्येक दिवसांनी आम्हाला तो दिसला तरी आम्ही त्याला ते दाखवून दिलं नाही.

आमच्या रस्त्यावरचं त्यावेळचं एक वैशिष्ट्य म्हणजे बाबलो गावकर हा माणूस दिवसा क्वचितच दृष्टीला पडायचा. पण रात्री आठ वाजले म्हणजे नवटाक पावशेर मारून कुणालातरी शिव्यांची लाखोली वाहायचा. ह्यात वर्षानुवर्ष खंड पडला नव्हता. त्याच्या शिव्या ऐकून आमच्या राजाच्या ज्ञानात दिवसेंदिवस भर पडत असे. मग तो आम्हाला प्रात्यक्षिक करून दाखवित असे. बाबा बेळगावला गेल्यावर आम्हाला एकाकी भयाण रात्री जाणवायच्या पण त्याच्या ह्या शिवजागृतीमुळे थोडीशी भयाणता कमी वाटायची. नाहीतर रात्र संपून सकाळ केव्हा होते असं व्हायचं. कारण भुताखेतांच्या गोष्टी ऐकून मला लहानपणी रात्रीची भीती वाटायची.

कातर वेळ झाली म्हणजे एकतऱ्हेच्या भीतीने अंग शहारायचं. विशेषत: आजी वारल्यावर हे मला जास्तच जाणवत असे. आई, बेबी हीच घरात मोठी माणसं त्यामुळे मला घाबरून चालण्यासारखं नव्हतं. त्यात फक्त ऐन वेळी आजारीपणात मदतीला धावणारे म्हणजे मामा शिंपी. अशा परिस्थितीत मांगरात कोणीतरी राहायला आला तर तेवढीच जाग व्हायची. किंवा बापू चिरेकर आला किंवा शिलातला गोपाळ भट आला

व जेवण खाऊन राहिला तरी बरं वाटायचं. त्या काळात नातेवाईकांचाच नव्हे तर गोसावी फॅमिलीचा पण पत्ता नसायचा. अर्थात त्यांना देण्यासारखं आमच्या घरात काहीच नसायचं.

सुदैवाने त्या काळात विशेष कोणी आजारी पडला नाही. त्याला अपवाद म्हणजे राजाचा. हा झाडावर चढण्यात पटाईत. एकदा कुठल्यातरी जांबळीवर चढला असताना कातरवेळी हा पडला. माझं धाबं दणाणलं. पण विशेष काही घडलं नाही.

मणेरीला भाईचं बस्तान बऱ्यापैकी बसलं होतं. अर्थात त्याला पगार वगैरे विशेष काही नव्हता. पण तो खूष असल्याने आम्हाला बरं वाटायचं. मणेरीच्या निसर्ग सौंदर्याची, नदीची वगैरे वर्णनं ऐकून मी एक दिवस मणेरी गाठली. ते दिवस मणेरीच्या भंडाऱ्याचे होते. ती जत्रा पाहिली. भाई चवळ्याचं दबदब्या अंडी घालून छान करायचा. चार दिवस पाहुणचार घेऊन मी तिथून परतलो. भाईने बुशकोट शिवण्यासाठी पैसे पण दिले. त्याच्याजवळ एक शेफर्ड-निळ फौंटन पेन होतं ते पण मी घेतलं.

मी जरी व्ह.फा. झालो होतो तरी सावंतवाडीला जाऊन आपण शिकावं असं मला वाटत नव्हतं. भाईच्या एकंदरीत बोलण्यावरून विशेषत: चप्पल विकत घेण्याची जी घटना घडली होती त्यावरून बेळगावबद्दल तशी ओढ नव्हती. किंबहुना मला वाटत होतं की बेळगावला मला मामाकडे तर घेणारच नाहीत. कारण आबांची व माईची तशी माझी ओळख पण नव्हती. बाबांची खोली अगदीच लहान होती. त्यात दोघांनी राहाणं अशक्य होतं. त्यात बाबांची इच्छा होती की मी पुढे न शिकता एकदा वयाची अठरा वर्षे झाली म्हणजे मास्तर म्हणून नोकरीला लागावं व लवकरच संसाराला लागावं.

मी पण तसा काही महत्त्वाकांक्षी नव्हतो. फक्त एकच वाटायचं की नोकरी करून आईला सुखी करावं. पण स्वप्नात देखील नव्हतं ते घडणार होतं !

•••

## शिक्षणाचा प्रवास

आमच्याकडे मामी बारदेसकरीण – की पाटकर ही नेहमी आईकडून खोबऱ्याची काप करून घेत असे. विशेषत: ही काप ती तिच्या बेळगावच्या पुतण्या – श्री शिवराम पाटकरला भेट देण्यासाठी करून घेत असे. अशाच एका दुपारी ती काप करून द्यायला आईकडे आली होती. त्याच दिवशी शिवराम पाटकर व त्यांचं कुटुंब पण त्यांच्याबरोबर होतं. शिवराम पाटकर हे त्यावेळचे चांगले श्रीमंत गृहस्थ. बेळगावात त्यांचा व्यापार होता. दोन परदेशी कार त्यांच्याजवळ होत्या. एक मुलगा व एक मुलगी त्यांना होती. ही दोघे वयाने मोठी होती.

शिवराम पाटकर आपल्या प्लेमाऊथ कारने त्याच दिवशी बेळगावला जाणार होते. अर्थात ते बाबांच्या चांगल्या ओळखीचे होते. पण आमच्या परिस्थितीमुळे पूर्वीची मैत्री तेव्हा राहिली नव्हती. आईने मामीला विचारलं की शिवराम पाटकरांना विचार की त्यांच्या कारमधून बाबी बेळगावला आला तर चालेल काय? मामी लगेच निरोप घेऊन आली. बाबीला ते बेळगावला आपल्या कारमधून सोडतील.

माझ्या जवळ एक हिरव्या रंगाची छोटीशी पत्र्याची बॅग होती. त्यात मी बुशकोट पँट व शाळेचा दाखला भरला व तयार राहिलो. बरोबर दुपारी दीड–दोनच्या सुमारास आमच्या घरासमोर ती सुंदर प्लेमाऊथ कार उभी राहिली. हॉर्न वाजला. मी आईचा निरोप घेतला व कारमध्ये बसलो. जणु आयुष्यात पुढे काय घडणार ह्याची नांदीच होती! लहानपणी मला रस्त्यावरून जाणाऱ्या निरनिराळ्या कार पाहून त्यांचा अचूक मेक सांगायचा छंद होता. मी व भाई खळ्यात बसलो व एखादी कार जायला लागली म्हणजे कुठली हिलमन् कुठली ऑस्टिन, कोणती शेवरोलेट, कोणती फोर्ड हे मी अचूक सांगत असे पण प्लेमाऊथसारख्या आलिशान कारमधून मी बेळगावपर्यंत प्रवास करीन हे स्वप्नात सुद्धा नव्हते!

तो १९५२ चा जूनचा पहिला आठवडा असावा. कारमद्ये पाटकर कुटुंब चिबुडे खात विनोद करीत चालले होते. माझ्या मनात वाटभर एक भीती होती, आता बेळगावला चाललो आहे, माझं स्वागत कसं होणार? हे एक, दुसरं घरी कसं जावं? हे पण माहीत नव्हतं. त्यापूर्वी मी एकदा मुंजीला बेळगावला आलो असेन तेव्हा विठा सुतारीण खडेबाजारात राहात होती. इथून तानाजी गल्लीत कसं जावं हे मला माहीत होतं. म्हणून मी पाटकरना सांगितलं मला बोगरवेस जवळ सोडा. मी तिथे उतरलो. विठ्याच्या घरी आलो व विठ्याच्या मुलाला तानाजी गल्ली दाखवायला सांगितलं.

दुपारी ४.३०/५ वाजण्याच्या सुमारास मी तानाजी गल्लीत पोहोचलो. वसंतमामा बाहेरच्या खोलीत अभ्यास करीत होते. त्यांनी दार उघडलं व मी आल्याचं सांगितलं. मग माईने मला चहा दिला व चांगली चौकशी पण केली. झालं जीव भांड्यात पडला. संध्याकाळी आबा आले. कपडे काढून बाहेर आले. त्यांनी तर एक धक्काच दिला. त्यांना वसंतमामांनी मी व्ह.फा. पास झाल्याचं सांगितल्यावर माझं अगदी दिलखुलास अभिनंदन तर केलच पण बाबी व श्रीला सांगितलं की उद्यापासून ह्याच्याकडून शिका – अभ्यास कसा करायचा तो. त्यांना कल्पना नव्हती की मी कोणत्या प्रकारचा विद्यार्थी आहे ते. अभ्यासात बाबी (आबामामांची मुलगी), श्री (आबामामांचा मुलगा) पुढे मी किस झाड की पत्ती होतो. वसंतमामा माईला बोलले की बाबा दुसऱ्या मोठ्या खोलीच्या शोधात आहेत. माईला पण कणव आली. ती म्हणाली, ‘‘त्यांना खोली मिळेपर्यंत इथंच राहा.’’ दुसऱ्या दिवशी आबांनी वसंतमामांजवळ काही पैसे दिले व माझं नाव हायस्कूलात घालायला सांगितलं. वसंतमामा मला लगेच जवळच्या सेंट्रल हायस्कूलमध्ये घेऊन गेले व माझं नाव शाळेत दाखल केलं. असा खरा आबांनी आणि वसंतमामांनी माझ्या पुढच्या शिक्षणाचा पाया घातला. बस त्यानंतर आबांनी किंवा कोणत्याही मामाने माझी शिक्षणाची किंवा कसलीच चौकशी केली नाही. किंबहुना आबा किंवा विष्णुमामा माझ्याबरोबर क्वचितच बोलले असावेत. त्यावेळी बाबा दर रविवारी मामाच्या घरी जेवायला येत असत.

बेळगावच्या मामाच्या घरचं वातावरण तसं शांत होतं. आबा व विष्णुमामा सकाळी दुकानावर जात. दुपारी जेवायला येत. परत रात्री आठ वाजण्याच्या सुमारास जेवायला येत. कसलीही चर्चा वगैरे काही नसे. जेवताना पण प्रत्येकजण चूपचाप!

माई जेवण वाढत होती, मला चहा देत होती. पण मला सगळं गुदमरल्यासारखं वाटायचं. एक तर मी त्यांच्या घरातला आमंत्रण न दिलेला पाहुणा. फुकटच खात होतो ह्याचं शल्य. प्रत्येक घासाला टोचत असे. दुसरं मी बेळगावला येऊन त्यांच्या मनाच्या विरुद्ध माझं ओझं मी त्यांच्यावर लादलेलं आहे ह्याची प्रत्येक क्षणी जाणीव होत होती. मी त्यांचा भाचा असेन. पण एका भाच्याला त्यांनी आधीच कित्येक वर्षे पोसला होता. त्यातून निष्पन्न काहीच झालं नव्हतं. अशा वातावरणात कसला अभ्यास करणार? त्यात बाबांची परिस्थिती पण काही चांगली नव्हती. महिन्याला दीड रुपया फी ते देत होते. पुस्तक घेणं देखील कठीण होतं. ठायी ठायी क्षणो क्षणी एक तऱ्हेची मिंधेपणाची

जाणीव होत होती. मग मी ठरविलं कसंबसं आठवीचं वर्ष काढायचं व नंतर गावाला जायचं. आठवीत पास होण्याचा प्रश्नच नव्हता. मधे मधे अभ्यासाला बसत असे. पण घरच सगळं आठवायचं. आई, बेबी राजा आपा–कशी असतील. मी नाही म्हणजे आईचं कसं होत असेल, रात्रंदिवस हाच विचार. अशा ह्या अत्यंत वाईट मानसिक परिस्थितीत दिवस काढीत होतो. एक दिवशी भाईला माझ्या घरच्या काळजीबद्दल मला आईबद्दल आणि घरच्या माणसांबद्दल कशी काळजी वाटते ह्याचं पत्र लिहिलं. भाईने लगेज पत्र पाठविलं 'कर्तव्यासाठी सगळे मोह आवरायचे असतात.' आठवीचे पेपर लिहून मळगावला आलो. नंतर बाबांचे पत्र आले. त्यात मी जेमतेम पास झालो होतो व नववीत गेलो असं त्यांनी कळविलं. इकडे भाईने मणेरीची नोकरी सोडून मळगावच्या रेशन दुकानावर नोकरी पत्करली होती. भाई घरी असल्याने आईची काळजी नव्हती. मी बेळगावला आलो. बाबांचा कारखाना काही बरेबर चालत नव्हता. वसंतमामांनी इंटरची परीक्षा देऊन बेळगाव आधीच सोडलं होतं. मामाच्या घरात आजारीपणा त्यात मधे मधे कुसुम आजारी पडायची. कधीतरी मला वाटतं किशोर किंवा विष्णुमामांच्या मुलांपैकी पण कोणी आजारी पडलं होतं. माईचं बाळंतपण जवळ आलं होतं. घरात माझी तशी आवश्यकता होती. यावेळी मी थोडा कोडगा पण झालो होतो. काय होईल? जास्तीत जास्त मामा जा म्हणून सांगतील. भविष्यात काय होईल ते होईल आपण आता अभ्यास करायचा एवढं ठरविलं. पुरेशी पुस्तकं नव्हती. पण दोस्ती चांगली होती. त्यात नववीत असताना अचानक एक दिवशी यक्षिणीची कांडी फिरावी तसं घडलं. आमचे एक शिक्षक संस्कृत शिकवीत असताना मला अचानक त्यांनी प्रश्न विचारला तो उपसर्गाबद्दल. मी तो श्लोक आधीच पाठ केला होता. उठून उभा राहिलो व धडधडीत श्लोक म्हणून दाखविला. तो असा...

'उपसर्गेण धातृत्वो बलाद् अन्यत्र नीयते प्रहरा विहारवत् ।'

शिक्षक खूष! माझी त्यांनी अगदी मुक्त कंठाने प्रशंसा केली. त्याचं कारण हा श्लोक पाठ तर होताच, तो ज्या अस्खलीत वाणीत मी म्हटला त्याचे पडसाद सबंध वर्गावर उमटले. क्षणात मी हिरो झालो होतो.

आमच्या तानाजी गल्लीतून माझ्या वर्गात दोन मुलं माझ्याबरोबर शाळेत आठवीत जात होती. त्यात एक नायर व दुसरा गुरव. हे दोन्ही माझे लवकरच दोस्त बनले. त्यावेळी नायरच्या वडिलांची कंपनीने दिलेली फोर्ड कार होती. घरात रेडिओ होता.

त्याच्या कारमधून मी बाजारात वगैरे जात असे पण त्यांच्या घरात मला त्यांनी देऊ केलं तरी खात नसे. नायरची आई फार प्रेमळ होती.

नववी पास झाल्यापासून मला मानसिक कितीही विवंचना असल्या, एकाग्रता होत नसली तरी परीक्षेच्या वेळी मी फार सावध असायचो. त्यामुळे प्रत्येक वर्षी चांगले मार्क्स मिळवून पास होत होतो. शाळेच्या खेळात विशेषत: बास्केट बॉल, खोखो व रविवारी क्रिकेट, पण नंतर नंतर मला त्यात किंवा शाळेच्या सहलीत पण भाग घेणं अशक्य होतं. कारण माझ्या खिशात पैसा नव्हता. पायात चप्पल नव्हती. बेळगावच्या वास्तव्यात फक्त शेवटच्या दोन महिन्यात मी चप्पल घेऊ शकलो. बाकी सगळी पाच वर्ष मी त्या डांबरी रस्त्यावरून चपलांशिवाय दिवस काढले.

त्या शाळेत सगळी मराठा जातीची मुलं होती. त्यात एक सारस्वत बोरकर नावाचा. दुसरा नायर जातीचा. मला माझ्या ब्राह्मणत्वाची किंबहूना मी एका चांगल्या जातीत जन्मलो याची जाणीव झाली. यापुढे या पोरांची आपल्या पुढे डाळ शिजू द्यायची नाही ह्याची पक्की खुणगाठ बांधली. बस या पुढे मागे पाहणं नाही. मग भाईचा मंत्र - पीठ पाडणे. मग आण तुझी जॉमेट्री, आण तुझा आलजिब्रा, आण तुझी-फिजिक्स आणि केमिस्ट्री. त्या विषयात निदान पुस्तकात असलेलं मी काहीच शिल्लक ठेवलं नव्हतं. तिमाही परीक्षा असो वा सहामाही मला प्रत्येक विषयात भरघोस गुण मिळत होते. एका शिक्षकाने तर मला सांगितलं ''तुझे गुण नव्वदच्या वरती जायला लागले'' म्हणून मी आवरतं घेतलं.

नववीच्या परीक्षेत मला साठ टक्क्याच्या वर गुण मिळाले होते. मी मेच्या सुट्टीत मळगावला आलो. तिथे सहज बोलता बोलता मधू पाटकरशी माझी थोडी मैत्री जमली. त्याने मला शाळेतील प्रोग्रेसबद्दल विचारलं व म्हणाला तू स्कॉलरशिपसाठी, विद्यावृद्धी समाजाकडे अर्ज का करीत नाहीस? मला त्या वेळपर्यंत विद्यावृद्धी समाजाबद्दल काहीच ठाऊक नव्हतं. तो एक दिवशी स्कॉलरशिपचा फॉर्म घेऊन घरी आला. मी फॉर्म भरला. पण प्रशस्तिपत्राची आवश्यकता होती. मग मालवणच्या बाबुराव परुळेकरांची आठवण झाली. त्यांना मी पत्र लिहिलं. त्यांनी ताबडतोब एक छान प्रशस्तिपत्र मला पाठवून दिलं. मला दहावीपासून विद्यावृद्धी समाजाची दरमहा स्कॉलरशिप सुरू होती.

मी परत तिसऱ्या वर्षी बेळगावला गेलो. स्कॉलरशिपमुळे पुस्तक विकत घेऊ शकलो. अभ्यास करीत होतो. पण बाबांचा कारखाना जवळ जवळ बंदच पडत आला

होता. बाबा कसे बसे दिवस काढीत होते. गावाला पण भाईची परिस्थिती चांगली नव्हती. तो पण नोकरी सोडून मुंबईला जाण्याच्या विचारात होता. वसंतमामांना पण चांगली नोकरी नव्हती. काळ फार मंदीचा होता. मामाचं पण तसं धड काही नव्हतं. त्यात कुसूमचं आजारी पडणं, यात आबामामा-माई पण बेजार झाली होती. आबांच्या हातात तसा पैसा पण घोळत नव्हता. बाबा मळगावला कायमचे निघून गेले. भाई व वसंतमामा मुंबईला नोकरीच्या शोधात निघून गेले. अशा परिस्थितीत अभ्यासात माझं लक्षच लागत नव्हतं. पुस्तक हातात घेतलं म्हणजे एक भयाण भविष्य नजरेसमोर येत असे, मारून मुटकून मन जाग्यावर आणून अभ्यास करावा लागत असे.

घरात आबांचं पुजेचं अवडंबर व शिवलिलामृताचं वाचन फारच चाललं होतं. त्यावरून दिसत होतं की आबांना मन:शांती नव्हती. त्यात कुसुमच्या लग्नाचे प्रयत्न चालू होते. शेवटी एकदा कुसुमचं लग्न ठरलं. मुलगा बेळगावच्या रेल्वे कॅन्टीनचा मॅनेजर होता. लग्न यथासांग पार पडलं. कुसूमने राहायला शेजारच्या गल्लीत जागा पण घेतली.

मळगावहून बिकट परिस्थितीची पत्रं येत होती. त्यात भाई व वसंतमामा एक दिवशी मुंबईहून हात हलवीत परत आले. मोठ्या मुष्कीलीने भाईला भाजी मार्केटमध्ये नोकरी मिळाली. पगार एकोणचाळीस रुपये बारा आणे. पण बरं वाटलं. निदान काहीतरी कमवित आहे. वसंतमामा परुळ्याला निघून गेले व त्यांना मराठी शाळेत मास्तरकीची नोकरी मिळाली.

मी दहावी पास होऊन मळगावला गेलो. मळगावची परिस्थिती फारच कठीण होती. परत अकरावीचा अभ्यास करण्यासाठी बेळगावला आलो.

ह्याच वेळी कुसूमची तब्येत बिघडली. तिच्या फुफ्फुसात पू झाला. विष्णुमामा सगळ्या डॉक्टरना गाठीत होते. शेवटी डॉ. गिंडे-मिरजकरच्या हॉस्पिटलमध्ये तिला ॲडमिट करावी लागली. मी, बाबी, श्री एकसारखे तिची सेवा करीत होतो. तिच्या नवऱ्यावर तर अगदी संकटच आलं होतं. ते माझं एस्.एस्.सी.चं वर्ष होतं. रात्री हॉस्पिटलमध्ये झोपावं लागत असे. पहाटे उठून परत घरी जा. आंघोळ करून जेवून शाळेत जा. रात्रंदिवस हॉस्पिटलमध्ये माझी जा ये चालत असे. दिवसाला निदान दहा पंधरा फेऱ्या तरी घर आणि हॉस्पिटल मध्ये होत असाव्यात. पायात चप्पल नव्हतं. जर काही प्रकृतीत बिघाड झाला म्हणजे विष्णुमामांना जाऊन सांगणे, माईला सांगणे. तिला कोऱ्यामिनचा डोस देणे, कॉफी करून देणे अशात बेजार होत होतो. मीच नाही तर श्री, बाबी पण. आणि शेवटी ती भयानक रात्र आली. कुसूम कायमची गेली. भाईला

बोलावलं. सगळं शेवटपर्यंतच कार्य आटोपलं, कारण मी व विष्णुमामाचं सगळी कामं करीत होतो. माझ्या आयुष्यातला हा कसोटीचा काळ होता. कुठेही आशेचा किरण दिसत नव्हता. बाबांची, भाईची परिस्थिती पाहून कधी एकदा एस्.एस्.सी.चं वर्ष संपतं व कुठेतरी नोकरी करतो असं वाटत होतं. भाईची परिस्थिती पाहवत नव्हती. त्याला आंघोळ करायला पण चांगली सोय नव्हती. मग त्याचे कपडे आणून धुवा, त्याला इस्त्री करून देणं ही कामं मलाच करावी लागत. एका सुप्रसिद्ध नटाची, श्री. कृष्णकांत दळवी यांची बायको आमच्याच गल्लीत राहात असे. ती मास्तरीण होती. माझी आणि तिची नायर कुटुंबामुळे ओळख होती. एक दिवशी तिला दीर्घ मुदतीची रजा घेऊन आपल्या नवऱ्याबरोबर मुंबईला जावयाचं होतं. मी तिच्याकडून तिच्या खोलीच्या चाव्या घेतल्या. दर महिन्याचं भाडं बहुतेक ३-४ रुपये असावं. देण्याचं कबूल केलं व भाईंची राहाण्याची अगदी चोख व्यवस्था केली. ह्याच दिवसात भाईला मधे मधे लग्न करण्याची पण लहर येत असे. कदाचित दारिद्र्यातून बाहेर पडायचं तो त्याच्या दृष्टीने एक मार्ग असावा.

एस.एस.सी.च्या फॉर्म परीक्षेला मी बसलो. स्कॉलरशिपमुळे थोडे पैसे हातात असायचे. हे पैसे मी रघुमामांच्या एका खुंटीला कायमच्या लावलेल्या कोटात ठेवीत असे. प्रिलीममधे मी पहिला किंवा दुसरा आलो होतो. गुण चांगले मिळाले होते. हेडमास्तर सरांना माझ्याबद्दल फार आशा होत्या. मी ७०% गुण मिळवून शाळेचं नाव उज्ज्वल करावं अशी त्यांची इच्छा होती. पण मला काय यातना - मानसिक त्रास होता याची त्यांना मुळीच कल्पना नसावी.

माझं एस.एस.सी.च्या परीक्षेचं केंद्र ठळकवाडीला राणी पार्वतीदेवी कॉलेजमध्ये होतं. हे ठिकाण घरापासून जवळ जवळ ४ कि.मी. दूर होतं. मी एस.एस.सी.ला बसणार म्हणून घरात तसा काहीच उत्साह नव्हता. पण माई रोज सकाळी साडेनऊ वाजता मला जेवण वाढीत होती. भराभर जेवण करून रोज ४ कि.मी. चालत जाऊन एस.एस.सी.चे पेपर लिहिण्याचं दिव्य फारच थोड्यांनी केलं असेल. मी एक महिना किल्ल्यात जाऊन, नायरच्या घरी जाऊन त्याचप्रमाणे भाई राहात असलेल्या खोलीवर जाऊन चांगला अभ्यास केला होता. प्रश्नपत्रिका कितीही जड आली तरी सोडविण्याची तयारी होती. सकाळी घरातून निघताना उत्साह असे. पण ४-५ कि.मी. चालल्यावर शारिरीक क्षीण येणार याची कल्पना नसे. प्रश्नपत्रिका पाहिल्यावर वाटे की छानपैकी

पेपर लिहावा. पण लिहायला सुरुवात केल्यावर एक तासाच्या आतच हाताला व डोक्याला क्षीर यायचा. हात चालत नसे. मग प्रत्येक पेपर प्रत्येक क्षणी मनाचा उत्साह गोळा करून लिहिणं कितीही क्षीण आला तरी मनाची तयारी करून निदान ५०% प्रश्नपत्रिका चांगली सोडवायची व मग जमेल तसं हाताला मधे मधे विश्रांती देत लिहिण्याचा प्रयत्न करीत होतो. सामान्यत: सुशिक्षित घरात जे वातावरण अशा परिस्थितीत असायला हवं होतं, ते घरात नव्हतं. किंबहुना मी एस.एस.सी.ला म्हणजे आयुष्यातल्या एका महत्त्वाच्या परिक्षेला बसत आहे ह्याची कुणाला जाणीव पण नसावी. त्यात नाही म्हणायला भाई एकदा केंद्रावर येऊन माझी चौकशी करून गेला होता. त्याने दुपारच्या वेळी मला चहा व इडली पण दिली होती व मला सुयश चिंतून गेला.

या परीक्षेच्या काळात जिचा सदैव ऋणी राहीन अशी माईच होती. तिने एकही दिवस मला जेवायला वाढण्यात व परीक्षेहून आल्यावर चहा देण्यात दिरंगाई केली नाही. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातली ही एक महत्त्वाची परीक्षा असते. साध्या हातापायाच्या जखमेने देखील परीक्षा देणं कठीण होतं. पण सुदैवाने चार दिवस सतत चालत जाऊन सगळे पेपर मी लिहिले.

परीक्षा संपल्यावर मला वाटतं की ताबडतोब रघूमामीला घेऊन मळगावला न उतरता सरळ परुळ्याला गेलो. ती बेळगावला बाळंत होऊन परुळ्याला जात होती. कुणाचा जन्म झाला होता आठवत नाही. कदाचित मदन–अगर दिलीप असावा. त्यावेळी जवळजवळ तीन आठवडे मी परुळ्याला राहिलो. आशा होती रघूमामा रेशन दुकानावर नोकरीला ठेवतील. पण ते काही जमलं नाही. मी नंतर मळगावला आलो.

ह्याच काळात अशोकचा (सर्वात शेवटचा भाऊ) जन्म झाला. अशोकचा जन्माचा काळ आठवला म्हणजे एक अतिशय भीतीदायक काळ डोळ्यासमोर येतो. घरात बाळंतपण काढण्यापेक्षा आईला सावंतवाडीच्या सुतिका गृहात ठेवण्याचं ठरवलं. योग्यवेळी मी आईला सुतिका गृहात घेऊन गेलो. वेळ दुपारची होती. आईला सुतिकागृहाच्या बाहेरच्या व्हरांड्यावर बसवली. सुतिकागृहाची मुख्य कमल परुळेकर होती. ती डॉक्टर भाऊ परुळेकरांची बहीण. पण ती ॲडमिट करायला तयार नव्हती. ती म्हणाली, एक तर पंधरा रुपये भरा किंवा ट्रस्टीची फॉर्मवर सही आणा. मग आईला तशीच तिथे ठेवून श्रीराम अण्णाकडे धावलो. त्यांना परिस्थिती सांगितली. ते मला डॉ. भाऊ परुळेकरांच्या घरी दुपारी दोनच्या दरम्यान घेऊन गेले. भाऊ परुळेकर घरात

विश्रांती घेत होते. अण्णा त्यांना बाहेर येऊन फॉर्मवर सही करायला विनंती करीत होते. पण आतूनच त्यांनी सांगितलं, आपला हात दुखावला आहे. कमल परुळेकरांना माझा निरोप सांग व आईला ॲडमिट करून घे. परत सुतिकागृहात आलो. कमल ऐकण्याच्या तयारीत नव्हती. श्रीराम अण्णांकडे बाबा बसून होते. ते तर अगदी अगतिक. शेवटी शेवटचा प्रयत्न म्हणून सुतिकागृहात कमळ परुळेकरला भेटायला गेलो. आई प्रसूत झाली होती. सगळं काही व्यवस्थित होतं. पण सुतिकागृहाचे रुपये पंधरा भरणं भाग होतं. आईला मग भेटलो. आईने सांगितले की परुळ्याला लगेच निघ व रघूमामांकडून पैसे घेऊन ये.

दुसऱ्या दिवशी आईच्या ट्रंकेतून दोन रूपये घेऊन दुपारी परुळ्याला निघालो. रात्री परुळ्याला पोहोचलो. वहिनी-आजीला सर्व परिस्थिती सांगितली. तिला अतिशय वाईट वाटलं. तिच्या डोळ्यांतून अक्षरश: अश्रू गळत होते. दुसऱ्या दिवशी पहाटे वहिनी उठली व चहा करता करता माझ्या पुढ्यात पानाचा डबा तिने ठेवला. ह्या डब्यात खाण्याची पानं विकून ती पैसे साठवत असे. मी पैसे मोजले. मला वाटतं जेमतेम १२ रूपये असावेत. तिने विचारल्यावर मी सांगितलं की १५ रूपये आहेत. तिने बरोबर सहा-सात नारळ दिले. मी सकाळी उठून मळगावला निघालो. इथे वेंगुर्ल्याचे बाबा परुळेकर आठवले. ती चंपूची साधी दाढ दुखून आजारी आहे हे ऐकल्यावर क्षणाचाही विलंब न करता धावणारे. जगात माणुसकी नसलेल्यांचे, बांधिलकीला वाटाण्याच्या अक्षता लावणारे, हृदयात आपल्या माणसाबद्दल कसलाही ओलावा नसणारी, कणव तर नाहीच वरती उपहास अशी माणसं भेटली. पण वेंगुर्ल्याच्या आजोबांना जी आईबद्दल कणव होती ती काही औरच. त्या सम तेच.

परुळ्यावरून आल्यावर ताबडतोब आईला भेटलो. तिला पैशाबद्दल सांगितलं. तिच्याजवळ थोडे पैसे होते. कसेबसे सुतिकागृहाचे १५ रुपये जमले. आईला अशोकसह सुखरूप घरी आणली. अशोकच्या जन्माच्या वेळी ह्या ज्या मानसिक आणि शारीरिक वेदना सहन केल्या त्याला तोड नाही. न लिहिण्यासारखं भोगलं.

लवकरच माझा एस.एस.सी.चा निकाल लागला. अपेक्षा होती की मला सकाळी बेळगावहून तार येईल. तार येईपर्यंत ब्रह्मांड आठवलं. संध्याकाळी मी पास झाल्याची तार आली.

•••

व्ह.फा.चे पेपर लिहीत असताना मनात एक तत्व बिंबल होतं. यशाला पर्याय नाही. त्याच तत्वाच्या आधारे मी एस.एस.सी.चे पेपर लिहिले होते आणि सुदैवाने माझ्या शाळेत मी दुसरा आलो होतो. मला चार विषयात क्रेडीट व एका विषयात डिस्टिंक्शन मिळालं होतं. मी पहिल्या वर्गात प्रथमच ह्या घरातून एस.एस.सी. झालो होतो.

निकाल ऐकल्यावर बेळगावला जाणं भाग होतं. आता बेळगावला कुठेतरी नोकरी पाहीन. भाईचा, वसंतमामांचा अनुभव पाहिला तर भविष्यकाळ दारूण दिसत होता. फार मंदीचा काळ होता. दुकानं चालत नव्हती. पैसा खेळत नव्हता. मुंबईत गिरणीमध्ये नोकरी करणारे फक्त दिसत होते. ज्या ठिकाणी १९४८ साली बाबांना ७० रुपयांची नोकरी मिळाली होती त्याच ठिकाणी १९५५ मध्ये भाईसारख्या हुशार माणसाला महिना रुपये ४० कमावणं कठीण होऊन बसले होते. तो मणेरी, गोवा, मडगाव करून आला होता. बेळगावला पोहोचलो तेव्हा वातावरण जरा बरं होतं. दुसरं म्हणजे मी शाळेत दुसरा आल्याने कॉलेजच्या नियमानुसार मला एक टर्मची फी मिळणार होती. दुसऱ्या टर्मसाठी अच्युत विष्णु खानोलकरांची स्कॉलरशीप मिळण्याची शक्यता होती. त्याचप्रमाणे विद्यावृद्धी समाजाची महिना १० रुपये मदत मिळणारच होती. आता प्रश्न होता तो बेळगावला परत पाचव्या वर्षी रहावं काय? माई, आबा, विष्णुमामा, मामी यांचा उघड उघड सपोर्ट नसला तरी मनातून त्यांचा विरोध नसावा. त्यामुळे जेवणाचा प्रश्न नव्हता. आता राहिला कॉलेजमध्ये ॲडमिशनसाठी ४० रुपये जमवायचा.

कॉलेजचा फॉर्म घेऊन आलो. ॲडमिशनसाठी ताबडतोब ३३ रुपये भरायचे होते. मग भाई आणि मी रात्री प्रकाश टॉकीजजवळ बसून निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी पेट्रोल पंपाचे मालक श्री. राघोबा आजगावरांना भेटणे. भाईने एक ओळखपत्र तयार केलं. तो धारवाड रोडला एका कोपऱ्यात उभा राहिला. मी पत्र घेऊन पेट्रोलपंपावर सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आजगावकरांना भेटलो. आजगावकरांनी ताबडतोब पेढीतून १० रुपये काढून मला दिले. तिथे दुसरे एक जातवाले गृहस्थ बसले होते. मला वाटतं अजीत फार्मसीचे मालक असावेत. त्यांना माझी व्यथा कळली. ते म्हणाले, थोडं थांबा. आपण अण्णा आजगावकरांकडे रविवारपेठेत जाऊ. मला त्याने आपल्या

कारमध्ये बसवलं. वाटेत विनोद पण केला. भीक मागण्यासाठी पण आपण कारने चाललो आहोत. मी पण त्यांच्या विनोद बुद्धीवर खूष! श्री. अण्णा आजगावकरांना त्यांनी माझा प्रॉब्लेम सांगितला. अण्णांनी विचारलं आता तुला पैसे किती हवेत? मी म्हंटलं ३३ रुपये. त्यांचा भाचा मला वाटतं कॅशियर असावा (त्यांच्याच दुकानात) त्यांनी त्याला सांगितलं ३३ रुपये दे. मला त्यांनी रक्कम दिली. मी रविवारपेठमधून धूम ठोकली तो सरळ आर.पी.डी. कॉलेज. ॲडमिशन घेतली. घरी येऊन माईला सांगितलं. मामीला सांगितलं. त्यांना मनापासून आनंद झाल्याचं दिसलं. भाई पण खुष होता, कारण आमची मोहीम यशस्वी झाली होती.

इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती आमच्या जातवाल्यांबद्दल. अण्णा आजगावकर आणि त्यांचे भाऊ काय, अजीत फार्मसीचे मालक काय, किंवा आर.पी.डी. कॉलेजचे त्यावेळचे प्रेसिडेंट श्री. प्रभू काय, सगळी मनाची मोठी माणसं. आपल्या जात बांधवांना मदतीचा हात सदैव पुढे करणारी. ती गोष्ट त्या दिवसापासून मनावर पक्की बिंबवून गेली. आयुष्यात जेव्हा जेव्हा दुसऱ्यासाठी करण्याची संधी आली, मग तो जातवाला असू दे, भाऊ असू दे, नातेवाईक, जे शक्य असेल ते किंबहुना खिशातला शेवटचा रुपया पण मी या लोकांसाठी खर्च करायला मागेपुढे पाहिला नाही. मग त्याच्यासाठी खानावळीची कूपन्स काढून देणं काय, कोणाची मुंबईत सोय होत नसेल तर त्यांना प्रेमाने आपल्याकडे ठेवणे, तेही कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांना शक्य तर नोकरी लावण्यात मदत करणे, ज्या जागेवर होतो त्या जागेवरून जे शक्य असेल ते मी लोकांसाठी एक सामाजिक बांधिलकी ठेवून करीत आलो आहे. बेळगावचे आजगावकर ब्रदर्स आणि अजीत फार्मसीचे मालक यांचं ऋण विसरणं मला शक्य नाही.

खेड्यातून शहरात प्रथमच गेल्याने शुद्ध मराठी बोलण्याचा मला सराव नव्हता. इथे कोकणी माणूस शुद्ध मराठी बोलायला लागला की कोकण्या म्हणून लोकं टिंगल करतात असं ऐकलं होतं. पण हायस्कूलमध्ये गेल्यापासून मी बोलण्याच्या बाबतीत काटेकोर होतो. मराठी पुस्तके घरी मोठमोठ्याने वाचून वाणी अगदी शुद्ध ठेवली होती. एकदीड महिन्यात मीच बेळगावीत मराठीची टिंगल करायला लागलो. त्यामुळे मला कोकण्या म्हणून बोलण्याची कोणाची हिंमत झाली नाही. बेळगावच्या हायस्कूलमध्ये

मी आठवीत थोडासा उशिराने प्रवेश घेतला. मला वाटतं शाळा सुरू होऊन एक आठवडा झाला असेल.

आता कॉलेजमध्ये जाण्याचा प्रश्न आला. लेंगा शर्ट शिवणं कठीण. पायात चप्पल कधी लहानपणी चार-पाच वर्षांचा असताना वापरली तेवढीच. बेळगावच्या डांबरी रस्त्यावरून चपलांशिवाय चार वर्षे फिरत होतो त्याचं दु:ख पण कधी झालं नाही. किंबहुना पायात चप्पल नसणं हा दु:ख करण्याचा विषय आहे असे वाटत नसे. पण कॉलेजमध्ये चप्पल घालून जाणं आवश्यक होतं. मग काय, पहिल्यांदा आबांचं किंवा विष्णुमामांचं संडासमध्ये घालून जाण्याच्या चपलांवर प्रयोग केला. मग थोड्या दिवसांनी विष्णूमामांचं अंगठा तुटलेलं चप्पल दिसलं. ते घालून जायला सुरुवात केली. अर्थात तुटक चप्पल घालून रोज ४-५ कि.मी. चालणं हे एक दिव्य. पण कॉलेजच्या बाकावर असताना कसलतरी होईना चप्पल असणं आवश्यक होतं. म्हणून चप्पल हातात घेऊन चालणं व कॉलेजमध्ये पोहोचल्यावर चप्पल पायात चढवणं. मग कपड्याचा प्रश्न विष्णुमामींनी सोडवला. एके दिवशी तिने विष्णूमामांच्या लहानपणी शिवलेल्या खादीच्या सगळ्या पँटी व सदरे-बुशकोट माझ्यासमोर ठेवले व सांगितलं ह्याच्यातल्या हव्या तेवढ्या तुला घे. ती खरोखर अलीबाबाची गुहाच होती. किती वर्ष माझी वाट पहात होती कोण जाणे. विष्णुमामांचे खादीचे सगळे कपडे अगदी चांगले होते. मला वर्ष-दोन वर्षं त्यावर काढायला काहीच हरकत नव्हती. मग समोरच्या टेलरकडून थोडे ऑल्टर करून कपडे घालायला सुरुवात केली.

याच दरम्यान सावंतवाडीच्या राणीसाहेबांना भेटण्याचा योग आला. निवडणुकीचे दिवस होते. आम्ही त्यांना हिंडळग्याला जाऊन भेटलो. एके दिवशी माईकडून २५ रुपये उसने घेऊन मळगाव व परुळ्याला मी व भाई जाऊन आलो. ह्यात परुळ्याच्या जाण्यात उद्देश असा काहीच नव्हता. पण दुपारी निघताना काय कोण जाणे वहिनी-आजीने हातावर दही व साखर ठेवली. आत्तापर्यंत पूर्वी तिला अशी भावनाविवश होताना पाहिलं नव्हतं. या निवडणुकीच्या धामधुमीत येण्याचं कारण १९५२ च्या निवडणुकीत भाईने जगन्नाथराव भोसलेंना निवडून आणण्यास आमच्या गावातून मदत केली होती.

कॉलेजमध्ये जात होतो पण पुस्तक घ्यायला व रोजखर्चाला पैसे कमीच पडत होते. या काळात कुसूमचा नवरा बेळगावच्या रेल्वे कँटीनची नोकरी सोडून बेल्लारी की

कुठेतरी निघून गेला होता. मी त्याची मुद्दाम चौकशी करण्यासाठी गेलो होतो. एके दिवशी त्यांचा एक मित्र मला कॉलेजमध्ये शोधत आला व त्यानी मला पाठवून दिलेले रुपये २५ माझ्या हातावर ठेवले. अगदी अचानक वेळेवर हे पैसे माझ्या हातात आले होते. त्यामुळे दोन-तीन पुस्तकं घेण्यास मदत झाली.

मला इंग्रजीची अल्फाबेट येत होती. ती भाईच्या सान्निध्यात तयार झाली होती. त्याचप्रमाणे मला कोणत्याही मराठी शब्दाचे इंग्रजीत स्पेलींग लिहायला येत होते. त्यावेळी मराठी भाषा फक्त लिहायला येत होती. इतर भाषांबद्दल काहीच माहिती नव्हती. आपल्याला मराठीतल्या प्रत्येक शब्दाचं इंग्रजीत स्पेलींग आलं म्हणजे इंग्रजी भाषा आली असं वाटत होतं. माझं इंग्रजीबद्दलचं ज्ञान एवढं अगाध होतं की मला वाटायचं मराठीतल्या ये या शब्दाला Ye असं लिहिलं किंवा जा या शब्दाला Ja असं लिहिलं म्हणजे इंग्रजी शब्द झाला. ह्या अगाध ज्ञानावर मला पहिल्याच दिवशी इंग्रजीच्या वर्गशिक्षकांनी येथे या मराठी शब्दाला इंग्रजी शब्द विचारला. मी उठून उभा राहिलो व Yethe म्हणून सांगितलं. त्यांनी आपल्या डोक्याला हात लावला. वर्गातली सर्व मुलं पण हसायला लागली. मला त्यावेळी त्यांची कीव आली. कारण माझ्या मते मी अगदी बरोबर उत्तर दिलं होतं.

•••

# बेळगाव

बेळगाव शहराचा काही भाग तर अतिशय गलिच्छ. रस्त्यावर घाण. डुकरांचा सुकाळ. आम्ही रहात असलेले ठिकाण पण तेवढं स्वच्छ नव्हतं. पण घरातलं वातावरण अतिशय स्वच्छ. मी राहात होतो त्यावेळी दोन्ही मामांची १२ मुलं, मोठी माणसं व लक्ष्मण नावाचा एक घरगडी आणि मारुती नावाचा एक शेतकऱ्याचा मुलगा मिळून जवळ जवळ १८-१९ माणसं त्या घरात राहात होती. पण कोणत्याही तऱ्हेचे तणाव घरात नव्हते. अभ्यासात व्यत्यय येईल असं घरात काहीच घडत नसे. वसंतमामा तिथून गेल्यावर बाहेरच्या खोलीत टेबलावर बसून मीच अभ्यास करीत असे. श्री, बाबी, मी, कमल अभ्यास करीत असत. पण आमची भांडणं कधीच झाली नाहीत. श्री तर मला आपल्या मोठ्या भावासारखा समजत असे. आमची दोस्ती अगदी पक्की असे. माई मधल्या खोलीतून ताक घुसळत असताना मी अभ्यास करतो की काय ते बघत असे. मधेच विष्णुमामी कानात काहीतरी येऊन सांगत असे. जेव्हा मासळी आणायची असेल किंवा तिने अंड्याचा खरवस केला असेल तर तिची एक सांगण्याची ती ढब होती.

थंडीच्या दिवसात बेळगावला थंडी कडाक्याची असायची. अनेकवेळा सकाळी उठून डोक्यावर थंड पाण्याच्या कळश्या ओतून संस्कृत शिकवणीसाठी फार दूरच्या ठिकाणी चालत जावं लागत असे. पण त्यात एक तऱ्हेचं थ्रील होतं. बेळगावात अभ्यासासाठी वातावरण तसं पोषक होतं. फक्त घरच्या परिस्थितीमुळे माझे मानसिक संतुलन बिघडत असे एवढच.

बेळगावच्या वास्तव्यात चांगलं पुस्तक हातात सापडलं ते म्हणजे पंडित नेहरूंचं "Glimpses of World History." ते विष्णुमामांचं पुस्तक मला इंग्रजी चांगलं येत नसलं तरी मधून मधून मी वाचीत असे. एके दिवशी कपाट साफ करताना राम गणेश गडकऱ्यांचं जयंती वाङ्मय हा कविता संग्रह सापडला व त्याचबरोबर तर्खडकरांच्या भाषांतर पाठमाला, ही जुन्या काळातली आबांची पुस्तके, ती सगळी वाचून काढली.

वर्षातून एकदातरी विष्णुमामा सगळ्या मुलांना घेऊन बाहेर कुठेतरी जात असत. त्यात गोकाक, रामटेक वगैरे ठिकाणं असायची. एकदा आबा आपल्या सगळ्या मुलांना घेऊन सावगावला गेले होते. तिथे आबांची सहा एकर जमीन होती. मी आणि श्री मग दर एक-दोन महिन्यांनी सावगावला जाऊन बटाटे, ओली मिरची, भोपळा असं काहीतरी त्या शेतातून घेऊन येत असू. उन्हाळ्यात दर दिवशी संध्याकाळी आम्ही- म्हणजे मी आणि श्री लांब लांब शेतावर फिरायला जात असू. कित्येकवेळा वाटाण्याच्या शेतात बसून मनसोक्त वाटाणा खाऊन येत असू.

बेळगावातलं सगळ्यात जिकीरीचं काम म्हणजे श्री नसताना बाजारात जाऊन भाजी आणणं. भाजी आणणं म्हणजे दुकानावर जाऊन आबांकडून किंवा विष्णुमामांकडून प्रथम पैसे घेणं. ह्या कामासारखं कठीण काम कोणतच नव्हतं.

तो काळ गोवा स्वातंत्र्य संग्रामाचा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा होता. अनेक पुढाऱ्यांची भाषणं ऐकण्याचा योग आला. त्यात नाथ पै, ना. ग. गोरे, बा. र. सुंठणकर, माधवराव बागल व श्री वाडकर वगैरे होते. बॅ. नाथ पै तर दर वर्षी नेहरू जयंतीला आमच्या घराच्या समोरच्या पटांगणात भाषण करीत असत.

भाईला मराठी साहित्याची आवड असल्याने तो नेहमी लायब्ररीत न चुकता जात असे. त्यामुळे मला पण लायब्ररीत जाऊन पुस्तकं वाचणं आवडायला लागलं. दिवाळीच्या सुटीत तासन्तास मी लायब्ररीत वाचन करीत असे. मला आठवतं व्यंकटेश माडगुळकरांची ‘‘बनगरवाडी’’ कादंबरी जी दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली ती मी बेळगावच्या लायब्ररीत बसून वाचली. एकदा दिवाळीच्या प्रसाद मासिकात श्री.म.माटे यांचा ‘‘कर्मकरकट’’ म्हणून कर्मयोगावर उत्कृष्ट लेख आला होता. लेख जवळ जवळ २५–३० पानांचा होता. भाईला लायब्रीत बसून तो वाचणं अशक्य होतं. मग मला त्याने तो लेख लिहून आणायला सांगितला. मला आठवतं सतत अनेक तास लायब्ररीत बसून मी तो लेख उतरवून काढला व भाईला वाचायला दिला. असा बेळगावच्या वास्तव्यात मी सुसंस्कृत नागरिक घडत गेलो.

बेळगावच्या वास्तव्यात मी अनेक चांगल्या गोष्टी शिकलो. त्या घरात सहनशीलता होती. आमच्या दोन्ही मामांत कधीच भांडण झालं नाही. दोन्ही मामांत कधीच वादविवाद असा झाला नाही. तिथे माया नसेल पण द्वेष मुळीच नव्हता. मत्सराचा लवलेश नव्हता. वायफळ बडबड नव्हती. त्यामुळे पुढे आयुष्यात कधी दारूच्या गुत्त्यात जावं, जुगार खेळावा, दुसऱ्याला फसवून किंवा वाईट मार्गाने पैसा कमवावा, लॉटरीचं तिकीट काढून नशीब आजमावं असं कधीच वाटलं नाही. एक उच्च सुसंस्कृत नागरिक म्हणून वागावं असं सदैव वाटत राहिलं. हा आमच्या मामाच्या वागणुकीचा माझ्या मनावर नकळत झालेला संस्कार. थोडक्यात कितीही आमीषं आली तरी ‘परधर्म भयावह:’ ह्या तत्त्वानी मी वागत आलो. सवंग लोकप्रियतेसाठी कर्ज काढून मजा करावी असं कधीच वाटलं नाही.

बेळगावात श्री जवळ किंवा माझ्याजवळ खिशात पैसे नसत. दोन तीन पैसे असले तरी भरपूर शेंगदाणे विकत मिळत असत. घरात दोन वेळ चहा व दोन वेळा जेवण मिळत असे. पण हॉटेलात जाऊन मधेच काहीतरी खाणं आम्हाला जमत नसे. कधीतरी रद्दी

विकून (जुन्या वह्या) पैसे मिळत तेव्हा मसाला डोसा खात असू किंवा भाईबरोबर परांजपेच्या हॉटेलात किंवा सन्मित्र हॉटेलात पुरीभाजी. मग दुपारी भूक लागली तर आम्ही मावशी, म्हणजे रघुमामाची सासू हिच्याकडे अनेकवेळा जात असू. शहापुरात एक दूरची नातेवाईक राहात होती. तिचे नाव ताई खानोलकर. ती एक गरीब बाई, पदरात चार मुलं, नवरा मला वाटतं कुठेतरी नाहीसा झाला होता. तिच्याकडे गेल्यावर ती न चुकता छानपैकी घडीच्या चपात्या व वांगीबटाट्याची भाजी आम्हाला खायला देत असे. होळीच्या दिवशी घरात मटण असे. विष्णुमामा सकाळी उठून मटण आणीत असत. मग जेवण केव्हा होते याची प्रतीक्षा करीत एकादं पुस्तक डोळ्यासमोर घेऊन आम्ही खोलीत बसत असू.

लहानपणी आईकडून बेळगावच्या काँग्रेस विहिरीबद्दल ऐकलं होतं. त्या विहिरीत कधीतरी उडी मारायची व पोहायचं माझं एक स्वप्न होतं. ही विहीर ठळकवाडीला आहे. एके दिवशी संध्याकाळी मी श्रीला घेऊन त्या विहिरीवर गेलो व काहीएक विचार न करता त्यात उडी मारली. पण नंतर कळलं मी हे केलं ते साहस वाईट होतं.

बेळगावात दरवर्षी एक राष्ट्रीय कीर्तनकार येत असत. त्यांची कीर्तनं मारुतीच्या देवळात असत. ते आपलं कीर्तन ''कल्याणकरी देव राया'' ह्या ओळीने करीत असत. पण त्यापूर्वी आमच्या दिगंबरमामांचं वेंगुर्ल्याला एकदा गुरुद्वादशीला किंवा दत्तजयंतीला मी कीर्तन ऐकलं होतं. लोकांना दैवी साक्षात्काराचे दाखले देऊन खिळवून कसे ठेवायचे हे दिगंबर मामांना बरोबर जमायचं. त्यांचं कीर्तन छान असायचं. गाणगापूर आणि दत्तमहीमा हाच विषय असायचा. साक्षात्काराच्या भाकड कथा अगदी खऱ्या वाटायच्या. त्याचं निरुपण असायचं, एका उत्कृष्ट अभंगावर तो म्हणजे...

हरिभजनाविन काळ घालवू नकोरे ।
अंतरिचा ज्ञान दिवा मालवू नको रे ।

दूरगामी परिणाम करणारा हा अरूण आहे. ही दिगंबरमामांची उत्कृष्ट आठवण.

कशीबशी एफवाय सायन्सची परीक्षा मार्च १९५७ मध्ये दिली. त्याच वेळेस बेळगावच्या एका लोकल वर्तमानपत्रात सेल्समनच्या नोकरीची जाहिरात आली. ती पोरवाल आणि कंपनीची होती. मला भरपूर वेळ होता. भाईला विचारलं त्याने संमती दिली. मी पोरवाल आणि कंपनीकडे एप्रिल १९५७ मध्ये नोकरीला लागलो. मी आणि पोरवाल सुटीच्या दिवशी गोव्यापर्यंत जाऊन ऑर्डर्स घेत असू. सगळा बेळगाव जिल्हा पण आम्ही त्याच्या कारने फिरत होतो. हिंदुस्थान लीवरच्या एजन्सीचा सगळा धंदा विशेषत: साबण रेक्सोना, पिअर त्याचप्रमाणे एस.आर. टूथ पेस्ट हे मीच पाहात होतो.

याचवेळी राजा (लहान भाऊ) बेळगावला आला होता. त्याला जाताना काहीतरी द्यायला हवं होतं. पण माझ्याकडे व भाईकडे वस्तू विकत घ्यायला पैसे नव्हते. मला फक्त ३० रुपये पगार होता व नोकरी जेमतेम एक महिना झाली होती. पण घरच्या सगळ्यांची अपेक्षा होती की मी काहीतरी पाठवावं. मग पोरवालच्या दुकानावर जेवढ्या म्हणून उपयोगी वस्तू असतील त्यात छत्र्या, पावडर, अशोकसाठी दुधाची पावडर, पेन, खेळणी अशा अनेक वस्तू उधारीवर घेऊन राजाबरोबर मळगावला पाठवून दिल्या.

भाईच्या नोकरीत दम नव्हता. मी पण केवळ दिवस काढण्यासाठी पोरवालकडे नोकरीला होतो. आम्हां दोघांना भविष्य अगदी दारूण दिसत होतं. अशा परिस्थितीत आम्ही दोघांनी बेळगाव सोडून कोल्हापूरला नोकरीची खटपट करावी असा विचार केला. कोल्हापूरला आतेबहीण इंदू होती त्याचप्रमाणे शाहू मीलचे मॅनेजर श्री. आजगावकर आमच्या विष्णुमामाचे साडू. म्हणून नोकरीच्या दृष्टीने कोल्हापूरला जाणं योग्य वाटलं. पण एक दोन महिने तरी दिवस काढण्याएवढे पैसे हवे होते. इच्छा असली म्हणजे मार्ग सापडतो ह्या तत्त्वाला अनुसरून माझ्या खिशात त्यावेळी हिंदुस्थान लीवरच्या वस्तूचे पैसे खेळत होते. पण ते कुठे २०-२५ रुपये असायचे कमीत कमी १०० रुपये तरी आम्हां दोघांकडे हवे होते. शेवटी कोल्हापूरला जाण्याचा दिवस आम्ही ठरवला. मी भाईला सांगितलं की मी कसेतरी ५० रुपयांची तजवीज करतो. माझ्याकडे तीन-चार वसुलीची बिलं होती. शेवटच्या दिवशी जेवढी वसूली होईल ती घेऊन निघायचं ठरवलं. एस.टी.ची तिकिटं श्रीने काढून आणली. माझ्याजवळ निघताना ७०-८० रुपये होते. भाईकडे पण थोडे पैसे असावेत.

दुपारी जेवल्यावर दोनच्या सुमारास माईचा निरोप घेतला. माईच्या डोळ्यात अक्षरश: अश्रू होते. ती तरीपण हसत हसत म्हणाली की बाबा तू आता परत बेळगावला येणार नाहीस. मी व श्री रेल्वेचे रूळ ओलांडेपर्यंत माई निरोप देण्यासाठी कट्ट्यावर उभी होती हे आजही आठवतं. बसमध्ये बसताना श्रीजवळ एक-दोन वसुलीची बिलं दिली व त्याला शक्य असेल तर वसूल करून पैसे घ्यायला सांगितले. त्याच दिवशी बेळगाव माझं कायमचं सुटलं. संध्याकाळी मी व भाई कोल्हापूरला आलो. कृतघ्नतेचं एक मोठं ओझं घेऊन मी बेळगाव सोडलेलं होतं.

•••

सन १९५२ च्या जूनमध्ये मी बेळगावला शिक्षणासाठी गेलो होतो. १९५७ साली जूनपर्यंत सतत पाच वर्षं मामांकडे राहून माझं कर्तव्य म्हणजे परीक्षा पास होऊन एक यशस्वी माणूस म्हणून मी बेळगाव सोडलं.

माझी पहिली हायस्कूलची फी आबांनी भरली. माझं हायस्कूलमध्ये नाव वसंतमामांनी दाखल केलं. त्यावेळी जगातल्या सगळ्या शुभ देवता खरोखर त्यांच्या कानात कुजबुजल्या असतील असं वाटतं. कारण मी बेळगावात जे शक्य होतं ते सगळं शिकलो. त्यात हिंदीच्या ३ परीक्षा, संस्कृतच्या ३ परीक्षा, ड्रॉईंग आणि माझी हायस्कूलची करीयर तर डोळे दीपवणारी होती. महत्त्वाचं म्हणजे त्या घरात एक संस्कृती शिकलो. माझं चांगलं चिंतीणाऱ्या सगळ्यांना अभिमान वाटावा असं कार्य करूनच मी बेळगावचं घर सोडलं यात शंका नाही. ती कृतज्ञता मी कोणाच्या तोंडावर व्यक्त केली नाही. पण मागे वळून पाहताना हे उपकार आठवतात.

माझं बेळगावचं सतत ५ वर्षांचं वास्तव्य केवळ माई मामीवर अवलंबून होतं. तिच्यात जरी रोष असता अगर जरा जरी तिने आबांकडे किंवा विष्णूमामांकडे नाराजी व्यक्त केली असती तर माझी धडगत नव्हती. म्हणजे मी बेळगावला राहिलो नसतो, शिकलो असतो किंवा नाही ही पण शंकाच.

मी बेळगावला शिकायला गेलो तेव्हा माई सात मुलांची आई होती. ती सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत अखंड काम करीत असे. तेही अगदी हसतमुखाने. तिच्या जागी कुणीही व्यक्ती शांत डोकं ठेवून जगूच शकली नसती. त्यात माझी एक भर. सर्व बाबतीत माई मला आपल्या मुलासारखे वागवीत असे. मग जेवण असो, चहा खाणं असो किंवा दुपारचं खाणं असो, अनेकवेळा मी व श्री दुपारच्या सुट्टीत घरी येत असू. खरं पाहिलं तर दुपारच्या सुट्टीत श्रीबरोबर मला काही खायला देण्याची आवश्यकता नव्हती व त्याबद्दल मला जरा पण वाईट वाटलं नसतं. तेव्हढा मी सज्ञान होतो. पण मला आज आठवतं शिल्लक असलेली भाकरी असू द्या, रताळं असू द्या, ती श्रीबरोबर मला पण देत असे. ही खरी संस्कृती.

आचार्य विनोबा भावेंनी म्हंटलं आहे....

भूक लागली तर जेवणे ही प्रकृती
भूक नसताना जेवणे ही विकृती

आणि आपणाला भूक असताना आपल्या भाकरीतीली अर्धी भाकरी समोरच्या भुकेल्या माणसाला देणे ही संस्कृती.

•••

## माई एक परिपूर्ण व्यक्तिमत्व

माई एक उत्कृष्ट सुगरण होती. तिने केलेली वांग-बटाट्याची भाजी असो, डाळीची आमटी असो, भाकरी व चटणी असो, प्रत्येक प्रकार पोट भरून खावासा वाटे. भाजी चिरणं, पदार्थ करणं यात ती अतिशय काटेकोर (meticulous) असायची. एक दिवस असा आठवत नाही की माईच्या स्वयंपाकात काही उणीव आहे. आम्हाला मीठ पण घालावं लागत नसे आणि त्यात कमालीची स्वच्छता. सणाच्या दिवसात पुरणपोळ्या, साखरभात (पाक), बासुंदी हे पदार्थ खावेत तर माईने बनवलेलेच. मासळीची आमटी संध्याकाळच्या जेवणात बहुतेक विष्णुमामी बनवीत असे. पण माई पण तेवढीच दर्जेदार आमटी बनवीत असे.

अनेक घरांत, हॉटेलांत मी मटण चाखलं आहे. पण माईने बनवलेल्या मटणाची चव त्याला नाही. साधी टोमॅटोची कोशिंबीर पण ती उत्कृष्ट बनवते. माई कधी कधी नवे प्रयोग पण करीत असे. एक दिवशी रविवार सकाळमध्ये आलेल्या रताळ्याचे अनारसे बनवण्याचा प्रकार तिला छानच जमला होता. स्वयंपाक हे ओझं आहे, काहीतरी करून पानात वाढा अशी वृत्ती माईत कधीच आढळली नाही.

खेड्यात जन्मली असेल. श्रीमंत घराण्यात वाढली नसेल. पण कमालीचे संस्कार असलेली स्त्री. अखंड काम. द्वेषाचा लवलेश नाही. राग असेल पण सूड घेण्याची वृत्ती नाही. शिक्षण नसेल पण नवऱ्यावर अखंड भक्ती. देवधर्माचं कधी स्तोम माजवलं नसेल, पण नास्तिक नाही. नवऱ्याला सदैव साथ. विरंगुळा नाही म्हणून तक्रार नाही. मजा करता येत नाही म्हणून तक्रार नाही. चेहरा कधी दु:खी नाही. स्वार्थाचा लवलेश नाही. माईबद्दल लिहिणं म्हणजे शब्द अपुरे पडतील. माझ्यावर तिने जी नकळत माया केली त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे.

•••

## कोल्हापूर

पाच वर्षांच्या बेळगावच्या वास्तव्याच्या चांगल्या आठवणी घेऊन मी १९५७ च्या जूनमध्ये कोल्हापूरला सौ. इंदूकडे आलो. इंदूचं फार छान चाललं होतं. तिच्याकडे राहण्यात तसं काही मनावर ओझे आहे असं वाटत नव्हतं. आठ दहा दिवस भाई नोकरी शोधत होता. शाहू मील व इतर व्यापारी ह्या सर्वांना भेटला. पण कोल्हापुरात नोकरी मिळण्याचं चिन्ह दिसेना. आम्ही दोघांनी मग मुंबईला बाळा बामण आळकरकडे जाण्याचं ठरवलं. त्यांचा मोठा मुलगा आमचा जसा काय भाऊच असं वाटायचं. त्यामुळे आम्ही मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. पण भाई जरा डळमळायला लागला. मग तो म्हणाला, आपल्याकडे थोडे जास्त पैसे असल्याशिवाय मुंबईला जाणं योग्य नाही. त्यावेळी वसंतमामा बुरंबावड्याला मास्तरकीची नोकरी करीत होते. त्यांच्याकडे थोडे पैसे मिळतात का हे पाहण्यासाठी शेवटी बुरंबावड्याला जाण्याचं ठरवलं. एक दिवशी संध्याकाळी आम्ही तराळा एस.टी. स्टँडवर उतरलो व बुरंबावड्याचं वसंतमामाचं ठिकाण शोधून काढलं. पण ते एकादशीने शिवरात्रीकडे जाण्यासारखं होतं ह्याची मला पूर्ण खात्री होती. भाईला कोणत्याही परिस्थितीत मुंबईला यायचं नव्हतं. पण तो ते मला स्पष्ट सांगत नव्हता.

आम्ही बुरंबावड्याला दोन दिवस राहिलो. त्याचवेळी राजापूरची गंगा अवतरली होती. वसंतमामाचे घरमालक हे फार रसिक गृहस्थ होते. ते आम्हाला एके दिवशी राजापूरची गंगा दाखवायला घेऊन गेले. एक दिवशी त्यांनी कोंबडी पण करून आम्हाला जेवण दिले. या जेवणात त्यांनी कसलीतरी गावठी दारू पण आमच्या पुढे ठेवली. पण आम्हाला त्या दोन्ही वस्तूत काहीच स्वारस्य नव्हतं. त्यांचा पाहुणचार म्हणून आम्ही थोडंसं चाखलं येवढंच.

ही भाईची मोहीम यशस्वी होत नाही म्हणून त्याने आता परुळ्याला जाऊन काही पैसे मिळतात काय हे चाचपण्यासाठी परुळ्याला जाण्याचा बेत आखला. एके दिवशी सकाळी उठून आम्ही कणकवली एस.टी. स्टँडवर आलो. मी भाईला बोललो की मी कोल्हापूरला जातो, तू परुळ्याला जाऊन लवकरात लवकर कोल्हापूरला ये. त्याने मला तीन चार दिवसांत कोल्हापूरला येण्याचं आश्वासन दिलं. कारण पुढे आम्हाला मुंबईला जायचं होतं. झालं. कणकवलीवरून मी पूर्वेकडे म्हणजे कोल्हापूरला व भाई

पश्चिमेकडे म्हणजे परुळ्याला जायला निघाला. इथे आमचे मार्ग भिन्न झाले. आतापर्यंत आम्ही ज्या ज्या मोहिमा काढल्या होत्या त्या दोघांनी मिळून एकत्रित काढल्या होत्या. त्यात आम्ही यशस्वी पण झालो होतो. यावेळी मी एकटा झालो होतो. मी कोल्हापूरला आलो. कोल्हापूरला तब्बल वीस बावीस दिवस मी होतो. रोज भाई येईल म्हणून वाट बघत होतो. शेवटी कंटाळलो. बरं मुंबईला कसं पोहोचायचं ते पण माहीत नव्हतं. भाई बरोबर असणार म्हणून या गोष्टीचा कधी विचार पण केला नव्हता. त्या कोल्हापूरच्या मुक्कामात इंदूच्या दीराचं लग्न झालं. आम्ही नरसोबाच्या वाडीला पण जाऊन आलो. एक दिवशी वाटलं की भाई आता कोल्हापूरला परत येत नाही. आपण आता त्या मुंबईच्या महासागरात एकट्याने उडी मारावी.

•••

कोणतीतरी शक्ती मला मुंबईकडे ओढत होती. तसं पाहिलं तर मुंबईला कुठे रहायचं, कुणाकडे जायचं हे मला मुळीच माहीत नव्हतं. मला फक्त बाळा बामणकर म्हणजे आमच्या बामण आळीच्या आत्याचे ते दीर आहेत व दरवर्षी ते आमच्याकडे यायचे एवढच माहीत होतं. मी यशवंत आणि नारायण यांना ओळखत होतो कारण ते 'बा' बरोबर म्हणजे बाळा बामणकराच्या आईबरोबर मळगावला खुरेगाळीला नारळाची आंब्याची बाग होती तिथे ते यायचे व आमच्याकडे जेवायचे. त्याचप्रमाणे सोनुर्लीला दरवर्षी एक मोठी जत्रा भरत असे. त्या जत्रेला लोटांगण–ओल्या शरीराने घालण्यासाठी 'बा' यायची. 'बा'चं माझ्यावर फार प्रेम (आपुलकी) होती. ती नेहमी विड्या ओढत असे. सोनुर्लीला आम्ही एक वर्षी बैलगाडीने जत्रेला, मी, आमची आजी, 'बा', बाळा झारापकरची आई 'आक्का' वगैरे गेलो होतो. त्याचप्रमाणे आजगावजवळ आरवली गावात सोमवतीला म्हणजे एका ठराविक अमावास्येला दीर्घ उधाण येतं म्हणून समुद्रात आंघोळ करायला मी त्यांच्याबरोबर गेलो आहे. मला बाळा बामणकरांच्या दुकानाचं नाव व पत्ता माहीत होता. त्यांच्या दुकानाचं नाव 'बॉम्बे ॲल्युमिनियम स्टोर्स', कंसारा चाळ, येथे आहे तेवढाच पत्ता मला माहीत होता.

मुंबईला जाण्याचा माझा दिवस ठरला. तो जूनचा शेवटचा आठवडा होता. आदल्या दिवशी गप्पा मारता मारता इंदूच्या दीराने मला मुंबईला कुठे जाणार म्हणून विचारलं. मी म्हणालो, बाळा बामण आळकरचे काळबादेवीला कंसारा चाळमधे दुकान आहे तिथे जाणार. मग बोलता बोलता तो म्हणाला की ही मुंबईची मंडळी ठाकूरद्वारला भाई जीवनजी लेनमध्ये राहतात. एवढच माझ्या लक्षात ठेवलं. दुसऱ्या दिवशी निघताना इंदूने मला दहा रुपये वाटखर्चाला असावेत म्हणून दिले. माझ्या बॅंगेच्या तळात मी तीस रुपये ठेवून दिले होते व खिशात आणखी वीस बावीस रुपये होते. संध्याकाळी सहा वाजता इंदूचा दीर अप्पा तेंडोलकर मला स्टेशनवर सोडायला आला. तिकीट पण त्याने काढून आणलं व मला गाडीत बसवलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी बोरीबंदरला पोहोचलो. गाडीतून उतरल्यावर सरळ स्टेशनच्या बाहेर आलो. कोणालातरी विचारलं ठाकूरद्वारला जाण्याची बस कोणती. त्याने समोर बोट करून बस स्टॉप दाखवला. त्यावेळी बसला नंबर नसायचे. त्याला अल्फाबेटीकल अक्षरं असायची. Viz. : A-rout, E-rout, K-rout etc. मी बसमध्ये

बसलो. एक आणा दहा पैसे देऊन कंडक्टरकडून तिकीट घेतलं व ठाकूरद्वार येताच त्याने मला उतरायला सांगितलं. मी उतरलो. तिथे उतरल्यावर मी त्या चौकात थांबून इकडे तिकडे बघत होतो, एवढ्यात एक मुलगा माझ्या वयाचा मला दिसला. त्याला मी भाई जीवनजी लेन कुठे आहे विचारले – तर तो केशव रहाळकर नावाचा मुलगा मला सरळ बाळ बामणकरच्या खोलीतच घेऊन गेला.

या ठिकाणी एक सांगावंसं वाटतं, कोणतीतरी अदृश्य शक्ती मला मुंबईत आणीत होती. मी अगदी सुखासुखी मुंबईत पोहोचलो होतो.

इथे माझं बाईने म्हणजे बाळा बामण आळकरांच्या बायकोने चांगलं स्वागत केलं. जसा काही आपल्या घरचा, आपल्या भावाचा वगैरे मुलगा आपल्याकडे आला आहे असं समजून मला तिने आपलेपणा दाखवला. सगळं वातावरण पाहिल्यावर मला परकेपणाचा जरापण स्पर्श झाला नाही. मी अगदी आपल्या माणसात, गावातल्या माझ्या परिचयाच्या नातेवाईकात आहे असं वाटायला लागलं. बाईंने मला दुपारी जेवायला वाढलं. माझी सगळी विचारपूस केली. सगळी घरातली माणसं माझ्या सभोवती जमा झाली. मी त्यांचा कोणीतरी नातेवाईक आहे हे इतरांना ती अभिमानाने सांगू लागली.

दुपारी बाळा बामणकर घरी जेवायला आले. मला त्यांनी आपल्या खोलीत बोलावलं व का आलो ते विचारलं. मी त्यांना सांगितलं की पुढचं कॉलेजचं शिक्षण घेणं मला शक्य नाही. मी नोकरीसाठी आलो आहे. त्यांनी ताबडतोब सांगितलं तुझ्या लायकीची नोकरी इथे मिळणं शक्य नाही. या घरात आत्तापर्यंत दोन तीन मुलं येऊन परत गावाला गेले. त्यांना इकडे नोकरी मिळाली नाही. तू ताबडतोब बेळगावला जा. शिक्षणाला जो खर्च येईल त्याची व्यवस्था मी करीन. पण त्यांना आमच्या घरची परिस्थिती माहित नव्हती. कोणत्याही परिस्थितीत मला नोकरी करून घरी पैसे पाठवणं आवश्यक होतं. संध्याकाळी बबल्या म्हणजे बाळा बामणकरांचा मोठा मुलगा आला. तो दुकानावरच काम करीत असे. लग्न झालं होतं. एक मुलगा व बायकोला घेऊन त्याच घरात तो संसार करीत होता. त्याने माझी चौकशी केली. माई म्हणजे त्याची बायको तिने पण आपला गावाहून भाऊच यावा असा उत्साह दाखवला. मुंबईत कुठेतरी कारखान्यात कामगाराची नोकरी मिळणं शक्य होतं. त्याच घरात आणखी पाच सहा लोकं नोकरीच्या निमित्ताने तिथे राहात होते. त्यात परुळ्याचा एक विजय सामंत,

आजगावच्या प्रेमाचा दीर, सावंतवाडीचा बाबी तेंडोलकर व त्याचा भाऊ. पण परिस्थिती कोणाचीच बरी नव्हती. दहा-बारा दिवस मी घरात जेवत होतो. बाळाकडे आणखी जास्त दिवस जेवण-खाण करणं कठीण होतं. मी मग बागलकरची कोळ्याच्या वाड्यातील खाणावळीत जेवायला लागलो व ग.भा. आशिकडे जी माणसं होती त्यात एक तेंडोलकर, एक मुरली आजगावकर वगैरे त्यांच्या बरोबर राहू लागलो. ग.भा. आशि म्हणजे तुकाराम लक्ष्मण देसाई यांची बायको - ही बाळा बामणकरची मामी. त्यांनीच बाळा बामणकरांना मुंबईत आणलं व आपल्या ॲल्युमिनियमच्या दुकानाच्या बाजूला १५ x १५ फूटाची जागा दिली. त्यात बाळा बामणकरांनी 'बॉबे ॲल्युमिनियम स्टोर्स' काढलं व त्या काळात जरी मंदी असली तरी ॲल्युमिनियमच्या भांड्यांना चिक्कार मागणी असायची. खरं म्हणजे मुंबईत ॲल्युमिनियमचा धंदा वालावलीच्या टोपीवाला देसाई ह्यांनी सुरू केला व त्यांनी वालावलीच्या खूपशा तरुणांना मुंबईत नेऊन धंद्याला लावलं. त्यात आमच्या शेजारच्या गावातले म्हणजे वेतयाचे - वेतयेकर पण होते. त्यांना त्यावेळी ९०० रुपये पगार होता. ही गोष्ट १९४०/४२ ची असावी.

माई म्हणजे बबल्याच्या बायकोची बहीण त्याच गल्लीत राहात होती. तिचे यजमान बापू आजगावकर मुंबई म्युनिसिपालटीत हेड क्लर्क होते. त्याचप्रमाणे सकाळी दूध सेंटरवरही ते काम करीत असत. माईने त्यांच्या कानावर माझी व्यथा घातली. तीन चार दिवसांत मला त्यांनी घरी बोलावलं व दुसऱ्या दिवशी पहाटे मला दूध केंद्रावर यायला सांगितलं. तिथे माझी एक वीरकर नावाच्या गृहस्थाची ओळख करून दिली. वीरकरनी दुपारी एक वाजता फोर्टमध्ये मला आपल्या ऑफिसात बोलावून घेतलं. फोर्टमधल्या कावसजी जहांगीर स्ट्रीट वर दिवा प्रिंटर्स या ऑफिसमध्ये ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात मला नोकरी मिळाली. मुंबईला येऊन मला पुरा एक महिना पण झाला नव्हता. मला नोकरी चांगल्या ठिकाणी लागली होती. त्या भागात मोठमोठ्या वित्त संस्थांची टोलेजंग ऑफिसेस होती. एका बाजूला रिझर्व बँक, दुसऱ्या बाजूला चार्टर्ड बँक, टाटा हाऊस, युनिव्हर्सिटी, सचिवालय मोठमोठी इंश्युरन्स कंपनीची कार्यालयं असा हा भारतातला एकमेव चांगला भाग. त्यामुळे मी भाग्यवान समजत होतो. मला काम पण छान मिळालं होतं. त्यात माझी स्वतंत्र केबीन, टेलीफोन व दीमतीस एक प्यून. मालक वाघ नावाचे, एक पॉश आणि कडक गृहस्थ होते. त्यांचा पेहराव सूट टाय असा असायचा. हे गृहस्थ कारवारी होते. थोडंसं मराठी त्यांना येत

होतं. बँकींगचं सगळं काम आणि मोठमोठ्या कंपन्यांशी संपर्क साधण्यात, नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क, गल्फ ऑईल, बरोझ वेलकम, चार्टर्ड बँक ही नामांकित ऑफिसेस होती. त्यांची प्रेस माझगावात होती. त्यांची स्वत:ची शोफर सह कार होती. धंदा छोटासा होता. मला पगार फक्त रुपये ६० होता. पण मला मुंबईत राहायला मिळत होतं व एका नावाजलेल्या परिसरात मी रोज जात होतो त्याचं सगळं श्रेय माई म्हणजे बबल्याच्या बायकोला व श्री बापू आजगावकरांना की ज्यांनी मला मुंबईत नोकरी मिळवून दिली आणि पुढे मी घडलो.

माझ्या आयुष्यात एकूण तीन माई आल्या. पहिली माझी बेळगावची मामी, दुसरी ही मुंबईची वहिनी आणि तिसरी माझी पत्नी. हिला पण माईच म्हणतात.

मळगावला त्यावेळी बाबा, आई, भाई, बेबी, राजा, आपा, अशोक हे राहात होते. भाईला नोकरी नव्हती. अशा परिस्थितीत माझ्या पहिल्या २० दिवसांच्या पगारातून म्हणजे ४० रुपयांतून १५ रुपये लगेच मी मनीऑर्डरने पाठवले. खाणावळीला एकवेळ जेवायला महिन्याला १४ रुपये लागत असत. त्यामुळे त्या नोकरीत पण मी दरमहा न चुकवता घरी वीस रुपये तरी पाठवीत असे. ही नोकरी लागल्यावर मी कुणाही नातेवाईकाकडे वगैर नोकरीसाठी गेलो नाही. अर्थात मुंबईत माझी तशी ओळख पण नव्हती. ऑफिसात वेळ भरपूर असायचा त्यामुळे कुठे ना कुठे अर्ज पाठवण्याचे काम चालूच असायचं.

एक दिवस फ्लोराफाऊंटनवरून सहज दुपारच्या वेळी गेट वे ऑफ इंडियाकडे चालताना ''न्यू इंडिया इंश्युरन्स''च्या ऑफीसमधून अर्जाचा फॉर्म घेऊन कोणीतरी दिसला. चौकशी केल्यावर कळलं की वरती सहाव्या माळ्यावर एल.आय.सी.चं ऑफीस आहे. तिथे गेलो. मला वाटतं काही पैसे देऊन अर्जाचा फॉर्म विकत घेतला व एल.आय.सी.त अर्ज केला. तो जून महिना असावा (१९५८). एक महिन्यात मला परिक्षेला बसण्याचा कॉल आला. मी बोरीबंदर समोरच्या भारडा हायस्कूलच्या हॉलमध्ये ह्या परीक्षेला बसलो. एस.एस.सी.ला मला एक टक्का गुण जरी कमी असते तरी मला हा कॉल आला नसता. एके दिवशी मी माझ्या ऑफीसमध्ये काम करीत असताना सकाळी दहा वाजता यशवंत (बाळा बामण आळकरांचा मुलगा) माझ्या ऑफीसमध्ये आला व त्याने माझ्या हातात इंटरव्ह्यूसाठी आलेलं पत्र दिलं. हे पत्र खरं पोस्टमनने घरात फेकून दिलं होतं. सुदैवाने यशवंतने ते पाहिलं. एक महिन्यात मी

सिलेक्ट झाल्याचं पत्र आलं आणि १० ऑक्टोबर १९५८ ला मी एल.आय.सी.त कायम नोकरीला लागलो. मी ताबडतोब आईला पत्र पाठवलं, आता मला दरमहा १३० रुपये पगार मिळणार, दरमहा घरी मी ६० रुपये पाठवीत जाईन. आता काळजी करू नकोस. १९५८ च्या ऑक्टोबरपासून १९६५ च्या सप्टेंबर पर्यंत म्हणजे डोंबिवलीची जागा घेईपर्यंत मी आईला अखंडित दरमहा पैसे पाठवीत आलो आहे. दिवाळीला दरवर्षी भात घेण्यासाठी ज्यादा पैसे पाठवीत होतो. हे सर्व सांगण्याचा उद्देश मला परवाच आमच्याच एका जवळच्या माणसाने विचारलं की तू घरासाठी काय केलंस?

मी ज्या ठिकाणी नोकरी करीत होतो ते कामगार वस्तीचं ठिकाण नव्हतं. कमर्शियल ॲक्टिव्हीटीनी गजबजलेलं ते एक आंतरराष्ट्रीय ठिकाण होतं. सकाळी दहा पासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत हा भाग गजबजलेला असायचा. इथे गचाळ वस्ती नव्हती, चाळी नव्हत्या, पाव उसळ खाणारे कामगार नव्हते. कोकणातला कोणी भेटला तर तो प्यून वगैरे असायचा. इथे सगळे उच्च विद्याविभूषित पारशी तरी दिसायचे किंवा मद्रासी स्टेनोग्राफर. माझ्या ऑफिसमध्ये मी आणि माझा मित्र केळकर असे दोघेच आम्ही आमच्या एसएससीच्या गुणावर नोकरीस लागलो होतो. बाकी सारे कोणी बीकॉम, कोणी बीएससी, कोणी बीएएलएलबी असे सगळे ग्रॅज्युएट होते. आपण डिग्रीहोल्डर नाही हे शल्या त्यामुळे टोचत असे. एक तऱ्हेचा न्यूनगंड. पण हे महत्त्वाकांक्षेला इंधन चांगलं होतं. ह्या क्षेत्रात हेवा वाटण्यासारखी संधी आपल्याला मिळाली ह्याचा आनंद पण असे. त्यामुळे जरी सेक्युरिटी असली तरी आता लालबाग, परळ ह्याठिकाणी खोली घेऊन संसाराला लागावं असं वाटलं नाही. रोज नवीन आव्हानं स्वीकारावी आणि इतरांवर मात करावी असं वाटत होतं.

१९६० च्या दरम्यान भाई मधू खानोलकरच्या शिरोडा – रेडी येथे मँगनीझच्या खाणीवर नोकरीला लागला. बेबी अधूनमधून वेंगुर्ल्याच्या आजीकडे तिला मदत करण्यासाठी जात असे. तिथे त्या आजीने श्री. रामचंद्र (दादा) तेंडोलकर बरोबर तिचे लग्न जुळवून दिले. बेबीला चांगलं स्थळ मिळालं होतं. फार आनंद झाला. शक्य तेवढे पैसे मी कर्ज काढून आईला पाठवले. दादा तेंडोलकर हे एक सज्जन गृहस्थ आहेत व मुंबईला गिरगावातच असल्याने फार बरं वाटलं. दादा दुसऱ्यांना मदत करायला सदैव तत्पर. त्याचप्रमाणे कमालीचे शांत व सज्जन. मला नवीन जागा घेण्यासाठी पाच हजार

रुपये कमी पडत होते हे त्यांच्या कानावर गेलं. लगेच त्यांनी मला पाच हजार रुपये आणून दिले. (मला वाटतं यासाठी कदाचित आपलं फिक्स डिपॉझिट पण मोडलं असेल.) माझी गरज भागवली. भाईचं पण पत्र आलं की त्याचं पण लग्न ठरलं.

त्याला आपा आजोबांनी आणि विष्णुमामांनी लग्न करण्यास भाग पाडलं. अर्थात त्याचं वय पण झालं होतं. पण त्या नोकरीत आणि परिस्थितीत त्याने लग्न करणं योग्य नव्हतं असं मला वाटत होतं आणि मी त्याला तसं लिहिलं होतं.

भाईचं लग्न मामेबहीण - बाबी हिच्याबरोबर झालं. भाई-बाबी खाणीवर खोली घेऊन रहात असत व १९५९ च्या दरम्यान त्यांना मुलगी झाली. तिचे नाव त्याने अंजली ठेवलं.

मी १९६१ च्या दरम्यान गावाला गेलो होतो. मुंबईहून मळगावला जाताना मी बेळगाववरून गेलो होतो. बेळगावला आल्यावर मला प्रथम विष्णुमामांनी काय प्रश्न केला असेल तर अरे तो तानाजीचा मुलगा कसा फुगला आहे. तू का फुगला नाहीस मुंबईला जाऊन? त्यांच्या कल्पना साचेबंद होत्या. त्यात काही आश्चर्य वाटलं नाही. माणूस मुंबईला गेला व त्याला मग कसलीही का असेना नोकरी मिळाली म्हणजे त्याची भविष्याची काळजी मिटली. कारण नोकरी हेच साध्य. दोन वेळा जेवण, कुठेतरी लालबाग, परळला जिन्याखाली राहायची व्यवस्था, मग लग्न आणि मग माणूस कृतकृत्य झाला.

माझे विचार जरा वेगळे होते. नोकरी लागल्यावर माणसाला जे परिपूर्णतेचं समाधान वाटतं ते तर माझ्या बाबतीत दूरच, पण दिवसेंदिवस मी जे काय माझ्या नोकरीच्या परिसरात पहात होतो ते विचारांना चालना देणारं, आपल्यात असलेल्या उणिवा दाखवणारं असायचं. दिवसेंदिवस महत्त्वाकांक्षा वाढत होत्या, ईर्ष्या वाढत होत्या. आपण सामना कसा करायचा, आव्हानं कशी पेलायची ह्याची काळजी असायची.

●●●

माझी ही नोकरी म्हणजे पुढच्या प्रगतीची पहिली पायरी आणि इतर लोक समजत होते की नोकरी मिळाली आता पुढे काही करण्याची जरूरी नाही. कुठेतरी खोली घ्यावी लग्न करावं जमल्यास आईबापाला पैसे पाठवावे. वर्षा–दोन वर्षांतून गावाला जाऊन चार दिवस मटण–मासे खावे. येताना काहीतरी विकून मुंबईत यावं.

त्यावेळी पैसे मिळवून मोठं व्हावं असं वाटत नव्हतं. पण आपण शेकडो लोकांना मॅनेज करावं, मॅनेजर म्हणून आपल्या हातात सत्ता असावी, स्वत:ची चेंबर असावी, टेलीफोन असावा व कार असावी असं वाटत असे. आणि यासाठी वेगळ्या धर्तीचे कष्ट करणं भाग होतं. माझ्या प्रेरणा वेगळ्या होत्या.

अंजलीच्या जन्मानंतर बाबी (वहिनी) आजारी पडत चालली. शेवटी तिला घटप्रभेला ठेवावं लागलं कारण घरात ठेवणं हे इतरांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने ठीक नव्हतं म्हणून आबांनी तिला घटप्रभेला सॅनिटोरियमला ठेवले. त्याच दरम्यान भाईची '' न्यू इंडिया मायनिंग'' पण शेवटचे आचके देत होती. राजा पण शिक्षण सोडून मुंबईला बेबीकडे नोकरीच्या शोधात आला. मला वाटतं ते १९६२–६३ साल असावं. अंजली बेळगावला माईकडेच वाढत होती. पण आम्ही मुंबईहून देखील तिचे वाढदिवस साजरे करत होतो. मी त्याच वर्षी कॉलेज जॉईन केलं होतं. मी रेग्युलर कॉलेजमध्ये शिकूनच मुंबई युनिव्हर्सिटीची डिग्री घेण्याच्या प्रयत्नात होतो.

राजा नोकरीच्या शोधात होता. दादा तेंडोलकर त्याला शक्य ती मदत करत होते. त्याची जेवणाची सोय बेबीने आपल्याकडेच केली होती. तो रोज येऊन मला भेटायचा. मी त्यावेळी गिरगावात भाई जीवनजी म्हणजे ज्या ठिकाणी श्री. बाळा बामण आळकर रहात होते तिथेच रहात होतो व सत्कार राईसप्लेटची कूपन्स घेऊन जेवत होतो. त्या काळात आठ आण्यात चांगल्यापैकी राईसप्लेट मिळत असे. भाईचं अगदीच डळमळीत होतं. भाईला मुंबईला येऊन नोकरीची खटपट करावीशी वाटत होतं. त्याच दरम्यान म्हणजे १९६२/६३ साली भाईची नोकरी सुटण्याची बातमी आली. त्याच्या पदरी बायको, म्हणजे बाबी वहिनी आणि अंजली होती. राजाने माझ्याकडून पैसे घेऊन त्याची मुंबईला आणण्याची व्यवस्था केली. आणि तो आला. इमानेइतबारे त्याला नोकरी मिळविण्याचा प्रयत्न मी करीत होतो व दोन तीन प्रायव्हेट कंपनीत प्रयत्न चालू होते आणि जेवणासाठी सत्कार राईसची कूपन्स क्रेडीटवर देत होतो. कर्मधर्म संयोगाने

दादा तेंडोलकरांनी मोरेश्वर काका आजगावकरने स्वत:च्या इन्कम टॅक्स ऑफीसमध्ये दर महिना १२५ रुपये पगारावर त्याला लावलं. हे आजगावकर म्हणजे आमच्या वेंगुर्ल्याच्या चुलत मावशीचे यजमान. भाईचं व्यावहारिक ज्ञान चांगलं होतं. त्याचप्रमाणे बेरीज वजाबाकीमध्ये तो तल्लख होता. एवढ्यात श्री पण मुंबईला आला. तो पण नोकरीच्या शोधात होता. त्याची राहाण्याची सोय गिरगावात श्री गजानन आपाकडे झाली होती. तो पण सत्कार राईस प्लेटची कूपन्स घेऊन जेवत असे. एवढ्यात कमल पण बेळगाववरून नोकरीसाठी मुंबईत आली. ती थोडे दिवस बेबीकडे राहिली. मग गजानन आपाकडे राहिली. काळ कठीण होता. राजा, भाई मागून श्री व कमल मुंबईत येऊन ठाकली होती व अंशत: का होईना आपण मामाच्या ऋणातून मुक्त होऊ ही भावना ठेवून जी शक्य असेल ती मदत करावी असं मला वाटत होतं.

१९६४ च्या ७ मेच्या रात्री मी व भाई गिरगावातल्या बाबल्याच्या खोलीवर झोपलो असताना मळगाववरून श्रीराम अण्णांची बाबा निवर्तल्याची तार आली. आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी श्री दादा तेंडोलकरांकडून रु. ३०० उसने घेऊन एस.टी.ने मळगावला निघालो. सर्व आवरून दहा बारा दिवसांनंतर मुंबईला मी आलो. भाई बेळगावला अंजलीस, बाबीस भेटून मुंबईला आला.

मुंबईत मी, भाई, राजा, श्री व कमल चार ठिकाणी राहात होतो. रोज कुठेतरी जागा घेऊन सर्वांनी एकत्र राहाण्याचा विचार करीत होतो. हातात पैसा नव्हता. जागा घेणं कठीणच होतं. पण माझ्या गिरगावातल्या मित्रानी, ज्याचं नाव प्रभाकर साळगावकर, ह्याने मला ह्या बाबतीत मदत केली. मला त्यांनी दादर स्टेशनच्या बाजूला छापरा बिल्डींग मध्ये ८ x ८ ची जागा लीव्ह आणि लायसन्सवर मिळवून दिली. अर्थात मला ह्या जागेचे ५०० रुपये डिपोझिट भरणं पण कठीण होतं. पण सर्वजण एके ठिकाणी राहाणार म्हणून दिव्य करावं लागलं. कसला स्वार्थ होता यात? मी, भाई, राजा, श्री व कमल त्यात रहायला लागलो. ती फक्त एक टेंपररी अॅरेंजमेंट होती.

माझ्या बी.ए.च्या परीक्षेसाठी मी १९६४ च्या मार्चमध्ये फॉर्म भरला होता. त्याचवेळी माझी दुसरी इन्सुरन्सची परीक्षा होती. अर्थात बी.ए.ला ड्रॉप घेऊन इन्सुरन्सच्या परीक्षेला मी एप्रिल १९६४ ला बसलो. ऑक्टोबर १९६४ ला मी बी.ए.ची परीक्षा दिली आणि बी.ए. ऑनर्सची डिग्री घेतली. ह्या परीक्षेसाठी मी गोखरकर लायब्ररी व दादरच्या खोलीवर अभ्यास करीत असे. ह्या दरम्यान अभ्यास करताना व

सत्कार राईसप्लेटच्या कुपनाच्या बाबतीत मला थोडासा अनपेक्षित मानसिक त्रास सोसावा लागला. अर्थात ही पुढे येणाऱ्या त्रासाची केवळ नांदी होती हे त्यावेळी जाणवलं नाही.

दादरची खोली अगदीच अपुरी होती. बेळगावला बाबीची (वहिनीची) तब्येत जोरात सुधारत होती. आता ह्या दोघांना एकत्र आणणं व त्यांनी सुखाने संसार करावा असं मला वाटायला लागलं. म्हणून मी १९६५ च्या जूनपासून मोठी जागा घेण्याच्या मागे लागलो. माझ्या एका मित्राबरोबर श्री अशोक अभ्यंकर बरोबर मी डोंबिवलीला गेलो. त्यावेळी इतर ठिकाणपेक्षा डोंबिवलीला भाड्याने स्वस्त खोली मिळत असे. बावसकरांनी स्वत:च्या जागेत दोन मजली छोटी इमारत बांधली होती. मी पहिल्या माळ्यावर दोन रुमचा फ्लॅट व व्हरांडा घेण्याचं ठरवलं. पण रुपये ४५०० डिपॉझिट भरणं ही गोष्ट अशक्य होतं. म्हणून त्यांच्याकडून १०-१२ दिवसांची मुदत घेतली. सुदैवाने माझा मित्र श्रीरंग केणीनी मला सारस्वत बँकेचं कर्ज का काढत नाहीस म्हणून विचारलं. अर्थात तेव्हा माझा एकूण पगार रुपये २२५ पण नव्हता. कर्ज काढणं कठीण. मिळणं त्याहून कठीण व फेडणं तर अति कठीण. पण शेवटी या सगळ्यावर मात करण्याचे ठरविले. काय होईल ते होईल भाई, बाबी, श्री, कमल, राजा आणि मी सगळ्यांनी एकत्र राहायचं असं मी मनात ठरवलं व त्या दृष्टीने सर्व बळ एकवटून प्रयत्न केले. ताबडतोब तारणासाठी एक इंश्युरन्स पॉलिसी घेतली. माझा मित्र केणी हा सारस्वत बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरांना भेटला व कर्ज मिळवून देण्यास त्याने मोलाची मदत केली. झालं. कर्जाचे रुपये ४५०० दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या हातात पडले. भाईने ताबडतोब ती कॅश सौ. बेबीकडे नेऊन ठेवली. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही डोंबिवलीला जाऊन आमची तीन खोल्यांची जागा ताब्यात घेतली. राजा व श्रीनी अथक प्रयत्नानी एका दिवसात जागा सजवली. गॅस घेतला. कॉटस् घेतल्या व जागेत आम्ही सगळे म्हणजे भाई, राजा, श्री, कमल राहायला सुरुवात केली. लवकरच सौ. बाबी व अंजली पण आली.

ह्याच दरम्यान मी माझ्या इंश्युरन्स परिक्षेचा अभ्यास डोंबिवलीला करीत असे. कर्जाचे हप्ते भरणे, दुपारच्या ऑफिसच्या डब्याचं बील, आईला गावाला पैसे पाठवणं, यात माझा जीव मेटाकुटीस येत होता. मधेच थोडे दिवस आई डोंबिवलीला राहायला होती. सर्व व्यवस्थित चालू होतं. आमच्या आईनी निरर्थक गजाली सोडून चांगलं

वाचावं, तिच्या डोळ्यांनी दिसत नसेल तर तिला चष्मा द्यावा, तिचं काय दुखत-खुपत असेल तर तिला योग्य ती ट्रीटमेंट द्यावी, तिने एक उच्च समाधानी जीवन जगावं, फाल्तू नाटक आणि मंडळी नको, त्या गझाली तिने सोडाव्या. आपल्याला हवं असलेलं बिनदिक्कत मागावं. आमच्यावर तिने हुकुमत चालवावी असं मला नेहमी वाटत आलं. पण पाच मुलांच्या आईला हे जमणं शक्य नाही. मला वाटतं जिजाबाईचा दुसरा मुलगा (तिच्याबरोबर असता) तर महाराष्ट्राचा युगपुरुष शिवाजी महाराज दिसला नसता.

इथे डोंबिवलीच्या जागेत कमलचं लग्न ठरलं. आबा-माई लग्न लावायला आली होती.

भाई आता काका आजगावकरकडे तर काम करीत होताच पण प्रायव्हेट अकाऊंटस पण लिहून पैसे कमवायला लागला होता. १९६८ नंतर तो भरपूर पैसे कमवायला लागला.

१९६९ च्या जानेवारीत मी डोंबिवली सोडून अर्थात लग्नानंतर मुलुंडला माझ्या स्वत:च्या संपूर्ण मालकीच्या जागेत राहू लागलो. माझं लग्न शिक्षणमहर्षि - रामभाऊ परुळेकर ह्यांच्या नातीशी म्हणजे अरुणा परुळेकर हिच्याशी झालं. २४ जून १९७० माझ्या पहिल्या मुलीचा - लीनाचा जन्म झाला व त्यानंतर १६ सप्टेंबर १९७२ ला प्रणिता (बिंदी) हिचा जन्म झाला. थोडे दिवस राजा माझ्या जागेत राहायला होता. पण लवकरच त्याने मुलुंड सोडलं.

१९७१ च्या मे मध्ये मी गावाला गेलो होतो. मला वाटतं भाई पण आपल्या कुटुंबासह आला होता. आम्ही मुद्दाम वहिनी-आजीला भेटण्यासाठी परुळ्याला पण गेलो होतो. आमचं बरं चाललेलं ऐकून वहिनी-आजीला आनंद झाला कारण मागचा इतिहास आणि आमच्या परिस्थितीची ती साक्ष होती. एकदा बोलता बोलता ती म्हणाली चंपू (आमची आई) च्या अंगावर एक पण सोन्याचा डाग नाही. तुम्ही धडधाकट कमावती मुलं असून हे बरं दिसत नाही. झालं. आम्ही तिथल्या तिथे तिला वचन दिलं की सहा महिन्याच्या आत मी आणि भाई तिला एक तरी सोन्याचा दागिना करून घालू. वचन दिल्या प्रमाणे मी माझं वचन पार पाडलं. मागाहून कळलं की मी एवढा बालीशपणा दाखवून शब्दाला जागायला नको होतं.

मला वाटतं ह्याच दरम्यान राजानी लग्न केलं. लग्नाला दादा तेंडोलकर हजर होते. यजमानपणा मलाच करावा लागला. नाती बांधिलकीचं चांगलं दर्शन घडलं.

लवकरच भाईने मी घेतलेली डोंबिवलीची जागा सोडून सेल्फकंटेंड ब्लॉक डोंबिवलीतच घेतला. ती जागा माझ्या नावावर असल्याने डिपॉझिटचे पैसे माझ्या सहीशिवाय मिळणार नव्हते. मी हे डिपॉझिटचे पैसे घेतले व तो चेक भाईच्या स्वाधीन केला.

त्याचदरम्यान आपा मळगावला सेटल झाला होता. त्याने आपलं लग्न ठरवलं व भाईला पत्र पाठवलं. आपा लवकरच लग्न करायला मुंबईस आला. इथे माणुसकीचं, बांधिलकीचं, विश्वासाचं चांगलं दर्शन झालं.

१९७५ मध्ये आमची लीना ५ वर्षांची असताना आम्ही गोव्याला विमानाने जायचे ठरवले. शेवटी अरुणा तयार नव्हती म्हणून मी आणि लीनानेच हा पहिला विमान प्रवास केला.

यानंतर बाबी वहिनीला दिवस गेले होते. आणि अटळ होतं तेच झालं. ती आजारी पडली. या आजारात भाईची आर्थिक परिस्थिती फार चांगली होती. तो विमान प्रवास करू शकत होता. औषधासाठी हवा तेवढा पैसा खर्च करू शकत होता. मुंबईला डॉ. दुधवाडिया व डॉ. रांगणेकरांसारख्या स्पेशालिस्टना दाखवलं पण गुण काही येत नव्हता. प्रत्येक ठिकाणी मी भाईबरोबर जात होतो. शेवटी भाई तिला विमानानं बेळगावला घेऊन गेला. तिथे काही तब्येतीत फरक पडत नव्हता. तिला बेळगावच्या घरी राहणं अशक्य होतं, कारण ती टी.बी.ची शेवटची स्टेज होती. म्हणून तिला बेळगावच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये नेऊन ठेवावं लागलं. मी रजा घेऊन बेळगावला गेलो. धो धो पावसात आम्ही बेळगावला फिरत होतो. शेवटी मी चिफ सर्जन डॉ. राजशेखरना भेटलो. त्यांनी मला स्पष्टच सांगितलं. भाईने मला मुंबईला जा म्हणून सांगितलं. मी मुंबईला आलो. दोन दिवसांनी त्या परिस्थितीत वहिनीला घेऊन भाई माझ्या घरी आला. आजाराला मिठी मारायची आमची तयारी नव्हती. आजारी वहिनीची सर्व तऱ्हेची सुश्रुषा सौ. अरुणाने त्या दोन दिवसात केली. मग ते बिछान्यावर बसून भरवणं असू दे किंवा हाताला धरून संडासात घेऊन जाणं असू दे, ज्या बाईला मेडीकल सायन्सचं चांगलं ज्ञान आहे त्या माझ्या बायकोला हे अपेक्षित नव्हतं. पण ती रिस्क तिने घेतली. घरात दोन लहान मुली असून. डॉ. आबा परुळेकर (अरुणाचे काका) ह्यांच्या सांगण्यावरून स्पेशालिस्टना घरी आणून तिला तपासलं व मला डॉ. बोलले की ती आता टी.बी. शेवटच्या स्टेजमध्ये आहे. तुमच्या घरात लहान मुली व

तुम्ही दोघांना त्याची लागण लागेल म्हणून तुम्ही तिला ठेवून घेऊन नका. भाई आणि मी मुलुंडमध्ये कुठे सॅनीटोरीयम वगैरे मिळतं काय म्हणून जंग जंग पछाडलं. पण कुठेही वहिनीला राहायला जागा मिळेना. सोसायटीत एक ब्लॉक रिकामा होता. पण अशा पेशंटला घरात ठेवणं जेवढं वाईट तेवढच सोसायटीच्या परिसरात ठेवणं पण. सिव्हीक सेन्स नसल्यासारखं होईल म्हणून तो विचार पण मी मनातून काढून टाकला. भाई तिला स्पेशल कार करून डोंबिवलीला घेऊन गेला आणि ह्यानंतर घडले व ऐकले ते बरोबर नव्हतं.

यानंतर भाई काश्मीरला अंजलीसह जाऊन आला. खरं आमच्याच नव्हे तर जवळपासच्या असंख्य कुटुंबांतून भारताच्या नंदनवनात पाऊल ठेवणारा प्रथम पुरुष म्हणजे आमचा भाई. यानंतर भाईने आपले लग्न ठरवलं. त्याला सुविद्य पत्नी मिळाली व परत त्याने संसाराला जोमाने सुरुवात केली. योग्यवेळी त्याला मुलगा झाला. या दरम्यान अंजली ग्रॅज्युएट झाली. अंजली घरी रिकामीच होती. तिला नोकरी करायची हुक्की आली. म्हणून माझ्या ऑफिसमधे तिला नोकरी दिली. तिला नोकरीची गरज नव्हती. मला वाटतं तिने लवकरच ती नोकरी सोडून पण दिली.

१९७९-८० सालापासून आमच्या वसंतमामांची मुलं आमच्याकडे रहाण्यास आली. ती एक दोघे जण व मी, अरुणा आणि माझ्या मुली आम्ही एकत्र रहात होतो. १९८१ साली मी मार्केटिंग साईडला सिलेक्ट झालो होतो. मला नवीन करकरीत प्रिमीयर पद्मिनी डिलक्स कार, केबीन, ऑफिसमध्ये स्वतंत्र फोन, घरी फोन मिळाला होता. माझ्या जवळ कार असल्याने कार घेऊनच आम्ही अंजलीचं लग्न ठरवायला सोलापूरला गेलो. नंतर हा आनंद वाटण्यासाठी बेळगावला गेलो. मळगावला पण गेलो. आम्ही विजापूरला गेलो व अंजलीचं लग्न - डॉ. परुळेकर बरोबर ठरवलं व झालं.

भाईची फॅमिली व माझी फॅमिली मिळून आम्ही महाबळेश्वर, माथेरान, मुरूड-जंजीरा अशी बरीच ठिकाणं फिरलो. ह्या सगळ्या ट्रीप लक्षात रहाण्यासारख्या ठरल्या.

•••

# कुडाळ

१९८३ साली मी कुडाळला गेलो. मला एल.आय.सी. ने कुडाळला नवीन ब्रांचची स्थापना करण्यासाठी नियुक्त केलं होतं. मी ''ब्रँच मॅनेजर'' झालो होतो. तिथे कुडाळ, सावंतवाडी व वेंगुर्ले या तीन तालुक्यांचा संपूर्ण कारभार मी चालवीत होतो. मी कुडाळात एकटाच गेल्याने घरात फक्त सौ. अरुणा व दोन मुली आणि आमची काम करणारी बाई. घरात पुरुष कोणीच नव्हता. सौ. अरुणा तर त्यावेळी नोकरी करीत होती.

कुडाळमध्ये मी दोन वर्ष होतो. तिथे परुळ्याच्या पुराणिकनी मला आमच्या कुडाळ देशकरांच्या इतिहासाची आठवण करून दिली. नियतीने मला स्वप्नात नसताना या परिसरात काम करण्याची संधी दिली होती की जिथे आमचे पूर्वज एकेकाळी राज्य करीत होते. त्यांच्या घोड्यांच्या टापा जिथे पोहोचल्या असतील तिथे माझी कार रात्रंदिसवस फिरत होती. एल.आय.सी. ने या तीन तालुक्यांचे संपूर्ण अधिकार मला दिले होते. आंबोली घाटाच्या माथ्यापासून तेरेखोलच्या खाडीपर्यंत आणि मालवणच्या सिंधुदुर्गापासून गोव्याच्या सीमेपर्यंतच्या संपूर्ण भागाचा कारभार जणू काय एखाद्या राजासारखा माझ्या हातात होता. ही इतिहासाची जाणीव मला पुराणिकनी करून दिली. ह्यात त्यांनी आपल्या मनाचा मोठेपणा, सुसंस्कृतपणा दाखवला. कुणाला नोकरी हवी असेल तरच मला कोणी भेटायला येत असे. आमची कुडाळची ब्रांच भारतात पहिल्या क्रमांकावर आली होती. मी व माझ्या सहकाऱ्यांचा सन्मान झाला व भारताला कुडाळची ओळख झाली.

•••

## अमरावती

कुडाळहून आल्यावर मला काही वर्षांनी अमरावतीला जावं लागलं. अमरावती ही पुराण प्रसिद्ध भूमी. इथे रुक्मिणीचे देऊळ आहे. विदर्भाच्या तीन जिल्ह्यांचा कारभार इथून चालतो. त्यात अमरावती, अकोला, यवतमाळ आणि इथले लोक किती लाघवी आणि प्रेमळ आहेत याचं दर्शन अशोकच्या ठाण्यामध्ये झालेल्या अपघाताच्या वेळी झालं.

मी त्या दिवशी वणी नावाच्या गावाला ऑफिसच्या कामानिमित्त होतो. वणी हे गाव अमरावतीपासून २०० कि.मी. दूर आहे. त्या दिवशी दुपारी मला माझे वरिष्ठ श्री. विश्वास दांडेकरांचा फोन आला. तो फोन ते अमरावतीवरून करत होते. अशोकच्या अपघाताची बातमी अरुणाने त्यांना फोनवर सांगितली होती. मला त्यांनी फोन करून ताबडतोब निघायला सांगितले, असेल त्या व्हेईकलने नीघ असे ते म्हणाले व त्यांनी आमच्या यवतमाळच्या ऑफिसमधून ब्रँच मॅनेजरला कार घेऊन मला वाटेत गाठण्यासाठी निघायला सांगितले. यवतमाळ व वणी यात ८० कि.मी.चे अंतर आहे. मी एका डेव्हलपमेंट ऑफिसरच्या मोटारसायकलनी भरधाव निघालो. अर्ध्या वाटेवर यवतमाळचे ब्रँच मॅनेजर आपली कार घेऊन मला भेटले. वेळ भरभर निघत होती. कुठल्याही परिस्थितीत धामणगावला दुपारी साडेचारपर्यंत पोहोचणं आवश्यक होतं, तरच ट्रेन मिळून मुंबईला लवकर येणं शक्य होतं.

इकडे अमरावतीवरून माझी बॅग व इतर आवश्यक सामान घेऊन बरोबर कार, सात-आठ माणसं घेऊन दांडेकर निघाले होते. कारण ट्रेनचं रिझर्व्ह टिकीट मिळण्यासाठी सर्व प्रकारे खटपट करायची होती. ते धामणगावला वेळेवर पोहोचले. त्यांच्या हातात एक कॅन्सल केलेलं रिझर्व्हेशन मिळाले. सगळा लवाजमा जवळ जवळ वीस पंचवीस माणसांना घेऊन माझी वाट पहात ते धामणगावला रेल्वे स्टेशनवर उभे होते. ट्रेन स्टेशनात आली होती. शेवटची शिटी झाली तेव्हा मला घेऊन येणारी कार त्या सर्वांना दिसली. सगळे लोक इंजिन ड्रायव्हरला अर्धा मिनीट ट्रेन थांबवून धरण्याची विनंती करीत असताना मी कारमधून उडी मारली व सगळ्यांनी मला माझ्या बॅगेसह ट्रेनमध्ये घुसवलं. दांडेकर पैशाचं बंडल माझ्या हातात खिडकीतून देण्याचा प्रयत्न करीत होते. मला मुंबईला पोहोचल्यावर पैशाची फिकीर नव्हती. मी तिकीट हातात गच्च पकडून ट्रेनमध्ये चढलो. हा एक सदैव आठवणीत राहणारा रोमहर्षक प्रसंग. अशी माणसं अशी ती माती याची आठवण झाली म्हणजे कृतज्ञतेने ऊर भरून जातो.

सुदैवाने अशोक वाचला होता. त्याला ठाण्याच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते.

५ ऑक्टोबर १९९५ ला मी एल.आय.सी.मधून (डिव्हीजनल मॅनेजर – ठाणे डी.ओ.)रिटायर झालो. त्याच दरम्यान म्हणजे ५ नोव्हेंबर १९९५ मध्ये आमच्या लीनाचं लग्न, आंदुर्ल्याच्या अनंत पाटील ह्यांच्या ज्येष्ठ मुलाशी – हर्षद पाटील ह्यांच्याशी झालं. हर्षद हे V.J.T.I. चे मेकॅनिकल इंजिनीयर आहेत. त्यांच्या दोघांचा इंजिनियरींग प्रॉडक्टस्‌चा स्वतंत्र व्यवसाय आहे. ३० जुलै १९९६ ला आम्हाला पहिला नातू झाला. त्याचं नाव – निशांत. फारच आनंद झाला. १९९९ मध्ये बिंदीचं लग्न उत्तम ग्रामोपाध्ये ह्यांच्याशी झालं. हे दोघेही चार्टर्ड अकाऊंटंट आहेत. बिंदी एका नामांकित कंपनीत 'डायरेक्टर' आहे व उत्तमची स्वत:ची फर्म आहे. त्यांनाही एक मुलगा आहे, त्याचं नाव – अरीन.

रिटायरमेंटनंतर मी पुण्याच्या M.I.T. (महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) इथे सीनीयर फॅकल्टी मेंबर म्हणून शिकवत होतो. इथे तीन वर्षं शिकवल्यानंतर M.I.T. ने ठाण्याला दुसरी शाखा काढली व ती चालवण्यास मला सांगितलं. ती इंन्स्टिट्यूटची शाखा मी २००२ पर्यंत चालवत होतो. एल.आय.सी.चे पेपर्स तपासायचं काम मी रिटायर झाल्यानंतर अखंड करीत होतो.

•••

# आठवणी एक कृतज्ञता

आमच्या मळगावच्या घरासमोरच्या उद्‌ध्वस्त वडाच्या झाडामुळे माझ्या आठवणी जागृत झाल्या. वडाच्या झाडापेक्षा कितीतरी जास्त आठवणी आमच्या घरासमोरच्या फणसाशी निगडीत आहेत. दुर्दैवाने तो पण आधीच बळी गेला होता. हा फणस म्हणजे आमच्या घराचाच नव्हे तर सबंध आवाराचं सौभाग्य होतं. त्या फणसासारखं झाड सबंध मळगावच्या रस्त्यावर दिसणार नाही. तो फणस आजीने पण लावला नसेल व बाबांनी पण लावलेला नाही. आम्ही जागा घेण्याच्या आधीपासून तो फणस तिथे होता. ह्या फणसाच्या झाडाला लागून एक रामफळाचं पण झाड होतं. फणसाच्या झाडाची एकेक फांदी म्हणजे एकेक स्वतंत्र वृक्ष होता. आणि त्या प्रत्येक फांदीवर थंडी आली म्हणजे एकेक फणस तुटताना दिसायचा. प्रत्येक फणस प्रचंड असायचा. एक पण फणस असा निर्जीव किंवा रिकेटी नसायचा. फणसातील प्रत्येक गरा सुमधुर असायचा. फणस पिकला म्हणजे घमघमाट सबंध रस्त्यावर सुटायचा. मग 'गे वहिनी फणस पिकलो असं वाटतो' असं बोलून बलीकाका न्हावी किंवा दत्तू नाईक नाहीतर बाबी नाईक यापैकी कोणीतरी म्हणायचं. मग दोरखंड आणि कोयती घेऊन वर चढून फणसाला घट्ट बांधून एका बाजूनी मी किंवा भाई किंवा राजा तो दोरखंड पकडत असू व अलगद फणस उतरवित असू. ह्यात जे थ्रील असायचं ते महत्त्वांचं. आम्हाला गरे खाण्यात क्वचितच स्वारस्य होतं. पण पडत्या काळात ह्या फणसानी आम्हाला मदत केली आहे. हा फणस असताना त्याच्या सावलीत बैलगाड्या दुपारच्या वेळी सोडल्या जात. बैल वैरण खात असताना गाडीवाले आमच्याच जागेत फणसाच्या खाली तीन दगडांची चूल फेकून दुपारचं जेवण बनवीत असत. त्यात प्रामुख्याने मेळेवाडचा कुण्या गाडीकर.

आज ती फणसानी व्यापलेली जागा उद्‌ध्वस्त वाटते. एकवेळ अशी आली होती की फणसावर लागलेल्या लीलावात कोणीतरी तो फणस घेतला व आपली त्या फळावर मालकी सांगायला आलेल्या माणसावर आमची आजी चंडिकेचं रौद्र रूप घेऊन धावली होती व त्या माणसाला समज दिली होती की याद राख, माझ्या फणसाला हात लावशील तर. मला वाटतं माझ्या आजीच्या उपस्थितीत त्या फणसाच्या झाडावर कोणी कुऱ्हाड घातली असती तर तिने त्याला सांगितलं असतं ह्या झाडावर कुऱ्हाड घालण्यापूर्वी माझ्यावर पहिली कुऱ्हाड मार. तिला ती फणसाची करुण किंकाळी

ऐकवली नसती. आमच्या आड्यात एक सदा बहरलेलं पिवळ्या काजीचं झाड होतं. काही कारण नसताना ह्याच्यावर कुऱ्हाड चालवली गेली. बाबांनी आणि आजीने रक्ताचं पाणी करून या उकीरड्याचं नंदनवन केलं. त्याच्या खुणा पण आम्हाला जपता येऊ नयेत हे आमचं सर्वोच्च दुर्दैव आहे. पण या मळगावच्या जागेचं भाग्य थोर दिसतं. खरं पाहिलं तर आपा आमच्या पायावर पाय ठेवून मुंबईला यायला हवा होता. त्याचे तसे प्रयत्न पण होते. पण सुदैवाने त्याला शिक्षकी पेशा आवडला आणि तो मळगावातच स्थाईक झाला. नाहीतर ती जागा नक्कीच ओस पडली असती. आपल्या परीनं त्यात लक्ष घातलं. विहीर बांधली, झाडं लावण्याचा प्रयत्न केला पण वाळवीची जमीन आणि पाण्याचं दुर्भिक्ष्य यामुळे त्याला थोडं आपल्या ह्या जागेच्या बाबतीत वैफलय आलेलं दिसतं. पण आपली ती वास्तू टिकून आहे व आम्ही आज बिनदिक्कत आमच्या घरी जाऊ शकतो हेही काही कमी नाही.

द्वेषाच्या झेंड्याखाली आम्ही अनुयायी गोळा करीत असतो व खिशात चार पैसे असले म्हणजे हे जमतं. असो. अशा गोष्टी प्रत्येक घरात होत असतात. कुठे द्वेष, कुठे मत्सर, कुठे स्वत:ची प्रतिष्ठा या क्षुल्लक गोष्टीमुळे असं होतं. प्रत्येक जण आपल्या प्रतिष्ठेला, Ego ला मुलामा चढवीत असतो. त्याला माझ्यासह अपवाद कोणी नाही. ह्यात आपण किती मागासलेले आहोत हे दिसून येतं.

एक काळ असा होता की भात पेरणीच्या वेळी त्या मातीशी माझे संवाद चालत. भात कापणीच्या वेळीपण असाच ऊर भरून येई. आमच्या गाईच्या काळ्या वासराला ह्या मातीत फिरवताना त्याच्याशी ह्याच मातीत संवाद चालत. आंब्याचा पहिला मोहोर पाहिल्यावर रोज त्या कलमाशी आमचे संवाद होत. तसंच काजूच्या झाडाचा पहिला बोंडू, डहाळीमधून डोकावणारी कुईरी ह्या सर्वांशी गुजगोष्टी चालत. कलमावर आंबे तयार झाले म्हणजे प्रत्येक झाडावर चढून ते आंबे काढण्याचं काम फार आवडीचे असायचे. दुपारी शाळेतून येऊन जेवण झाल्यावर परत कलमावर चढून एखादा अर्धवट पिकलेला आंबा दिसतो काय, हे पाहण्यास मजा वाटे. आंबे खाण्यापेक्षा आंबे काढून आढी घालण्यात मजा वाटे. वर्षानुवर्षे हे माझं काम असायचं. दुर्दैवाने या कार्यक्रमाला मला वाटतं १९८२ सालात खीळ घातली गेली. शेवटचे भरघोस आंबे तेच असावेत. राम गणेश गडकऱ्यांच्या भाषेत सांगायचं तर ''कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही.''

मला नोकरी लागून मी व्यवस्थित बस्तान बसवल्यावर मला पहिल्यांदा काय वाटले असेल तर आईला जरा सुखात ठेवावी. वयाच्या १४ वर्षापर्यंत मी सतत आईच्या सान्निध्यात होतो. तिच्याबद्दल माझ्या कल्पना होत्या की तिला चांगल्या गोष्टींबद्दल आवड आणि वाईट गोष्टींची चीड असायची. मी पहिल्यांदा तिचे डोळे तपासून घेतले. चांगला चष्मा घेऊन दिला. घरी मुद्दाम आणून तिला रहायला सांगितलं. माझ्याकडे घरात काम करायला कायमची बाई असल्यामुळे तिच्याकडून कोणत्याही मदतीची मला अपेक्षा नव्हती. तिने चांगली पुस्तके वाचावी म्हणून मराठी भगवद्गीता पुराणं अशी लाखमोलाची पुस्तकं तिला वाचायला दिली. पण आईचा ओढा कुठे वेगळ्याच ठिकाणी व वेगळ्या विषयात.


काळ झपाट्याने पुढे चालला आहे. विशेषत: १९५० ते १९७० पर्यंत एकसंध आयुष्य माणसं जगत होती. हातात पैसा नव्हता, काळज्या होत्या. पण त्याचबरोबर एक समाधानी जीवन माणसं जगत होती. पण १९८० नंतर आपल्या देशाची संबंध इकॉनॉमी प्रचंड बदलत चालली. प्रत्येकाच्या हातात विपुल पैसा तोही थोड्याशा श्रमाने येऊ लागला. दिवसाला रुपये दोनशे देऊन मजुरीने काम करणारा माणूस पण दुर्मिळ झाला. आजकाल पाकीटमार पण दुर्मिळ झालेत. पाकीट मारण्यापेक्षा हाशीश, ब्राऊन शुगर, बेवडा, पत्त्याचे डाव, जुगार यात सहज पैसा मिळू लागला. आमच्या घरासमोरच्या काका नेवगीचा मुलगा पण शिक्षण नसताना अत्याधुनिक कार घेऊन आज फिरत आहे. दारू आणि आकड्यांचा धंदा करणाऱ्यांची आज चलती आहे. हेच लोक चार पैसे हातात आले म्हणजे आपल्या सज्जन बापासमोर दारू प्यायला कचरत तर नाहीच उलट आपल्या बापालाच विचारतच आमची काय घरात व्यवस्था असा की नाय? आज मळगावला गेलो तर माझ्याबरोबर सकाळी उठून रानात जायला किंवा दुपारी मासे गरवायला माणूस सापडणार नाही. तीच गोष्ट परुळ्याची. डोंगरात जाऊन काजी काढायला आज कुणालाच स्वारस्य राहिलेलं नाही. आमचाच एखादा भाऊ परुळ्याच्या पवित्र तुळशीवृंदावनावर बसून दारू प्यायला लागला तर त्याच्या मुस्कुटात मारायची हिंमत आज कोणात आहे?

**कालाय तस्मै नम:**

•••

# माझे बाबा

(५.१०.१९३७ – १३.०९.२०२२)



बाबा हे संपूर्णत: निरोगी आयुष्य जगले. वयाच्या ८५ वर्षापर्यंत त्यांना कुठलाही आजार नव्हता. डॉक्टर, औषधे, आजारपण अशी पाने त्यांच्या आयुष्यासाठी लिहिलीच गेली नव्हती. खरच आश्चर्याची गोष्ट आहे की अशी माणसे सुद्धा ह्या जगात असतात ज्यांना वयाच्या ८५ वर्षी सुद्धा साध्या कॅलशियम, विटॅमिन्सच्या गोळ्यांची आवश्यकता भासत नाही. नुसतेच जीवन नाही तर मृत्यु ही असा की बाजूच्या माणसालाही कळणार नाही. Switch off होतो तसे अचानक ते एके दिवशी झोपले असताना गेले. लाखा-लाखांमधून देव एकाला निवडतो व त्याला असं 'निरोगी आयुष्याचं' वरदान देतो. बाबा त्यापैकी 'एक' व मृत्युही अशा दिवशी की स्वर्गाचे दरवाजे उघडलेले – 'पितृपक्ष'. हल्लीच्या कॅन्सर, करोना अशा भयानक आजारांनी ग्रस्त असलेल्या जीवनात अशी माणसे मिळणं दुर्मिळच.

मध्यम उंची, सडपातळ बांधा, स्मित हास्य व तरातरा चालणं ही त्यांची काही वैशिष्ट्ये. सडसडीत अंगकाठी असल्याचा तो एक फायदा असतो, वजन एखाद-दुसरं किलो कमी झालं किंवा वाढलं, फारसा फरक दिसून येत नाही. दुसरं त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे ते फार कमी बोलायचे. Introvert by nature and a man of few words - that's what I can say. आता तुम्ही विचाराल की निरोगी आयुष्याचा राज काय? तर मी म्हणीन – 'नियमित दिनचर्या व 'संतुलीत आहार'. घडाळ्याच्या काट्याप्रमाणे ते चालायचे. He was a man of discipline. उठणं-झोपणं, त्यांचा दिनक्रम ठरलेला. त्यात बदल नाही. ऊन असो किंवा पाऊस, थंडी-वारा ते नियमितपणे बाहेर पडायचे व त्यांची कामे करायचे. करोना पण त्यांची दिनचर्या विस्कळीत करू शकला नाही. म्हणतात ना ...

**खुद को कर बुलंद इतना कि हर तक़दीर से पहले,**
**खुदा बंदे से खुद पूछे, बता तेरी रज़ा क्या है।**

कष्टाचे आयुष्य जगल्याने प्रत्येक पैशाची त्यांना किंमत होती. मग साधी रद्दीसाठी सुद्धा ते चार पैसे जास्त घ्यायला बघायचे. पायी किंवा बसने फिरणं त्यांना आवडायचं व अगदी ८५ वर्षी सुद्धा ते पायी अथवा बसनेच फिरायचे. रिक्षाचा उपयोग फार कमी व आवश्यक असेल तरच. पुस्तके वाचायला त्यांना फार आवडायची व ते कायम निरनिराळी पुस्तके, मासिके लायब्ररी मधून आणून वाचत. ते नेहमी बेडवर झोपून पुस्तके वाचायचे. दोन उशांवर डोकं ठेवून व गळ्यात एक टॉवेल नेहमी असायचा. बाबांची ही स्टाईल माझ्या डोळ्यांसमोर नेहमीच येते. पत्त्यांमध्ये ब्रिज गेम त्यांचा आवडीचा. ब्रिज खेळण्याचा त्यांचा छंद होता. ब्रिज गेमच्या मित्रांचा त्यांचा गृप ही होता व ते विकेंडस्‌ला ब्रिज खेळत असत. त्यात त्यांना बक्षीसेही मिळाली होती.

कमी आहार असला तरी ताटात नेहमी चार-सहा जिन्नस हे असायचेच. एक मोठ्या ताटात ३-४ छोट्या वाट्या व प्रत्येक वाटी निरनिराळ्या पदार्थांनी भरलेली. एकात सुकी भाजी तर दुसऱ्यात रस्सा भाजी, एकात उसळ तर दुसऱ्यात झुणका; बरोबर भात किंवा चपाती आणि बाजूला Fish fry किंवा कोलंबी अथवा बांगड्यांची भाजाणी/आमटी असली तर...! अशा तऱ्हेने त्यांचं ताट नेहमी भरलेलं. कोकणी माणसाला अजून काय पाहिजे?


एल.आय.सी. मधून रिटायर झाल्यावर त्यांना पेन्शन असल्याकारणाने ते कधीच कुणावर डिपेंडंट नव्हते. ८५ वर्षी सुद्धा त्यांना आई गेल्यावर एकटच राहायचं होतं. ही त्यांची जिद्द होती. If you are physically and mentally fit तरच तुम्ही हे धाडस करू शकता. त्यांचं फ्रीडम, त्यांचं इंडिपेंडंट लाईफ त्यांना लाख मोलाचं होतं.

हल्लीच मी 'Ruskin Bond' ह्या लेखकाचं 'How to Live your Life' हे पुस्तक वाचलं. पुस्तक वाचून मला क्षणभर वाटलं... उगीचच वाचलं... How To Live Your Life याचं ज्वलंत उदाहरण माझ्यासमोर आहेत, "माझे बाबा" ज्यांना मी दररोज पहाते...

**- लीना पाटील**


## आई–बाबा











लीना

प्रणिता (बिंदी)




मुलुंड



मळगाव

# वंशावळी



बाबुराव लक्ष्मण सामंत (आजोबा) + राधाबाई बाबुराव सामंत (आजी)
लक्ष्मण बाबुराव सामंत (वडील) + सावित्री लक्ष्मण सामंत (आई)
साळगावची आते
भीमा
काशी
मंजुळा
बाळकृष्ण
काशीबाई (बेबी)
बाबुराव
राजाराम
भिकाजी
अशोक
अंजली
सिद्धार्थ
अलका
स्मिता
लीना
प्रणिता
पिंकी
मेधा
सार्थ
संकेत
निवेद
निशांत
अरीन
अमित
आशिश
अंशिता
वंशिता
सानिका
शुभम
पराग
प्रशांत
सिया
रेवा
अद्वैत
अस्मी